CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

दर्बी
क्लॉथ मार्केट
सुटींग । शर्टिंग । लिनन । सिल्क
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ) सोलापूर.
9130008644 | 9422459645

सोलापूर | सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक ३३४ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महापालिका निवडणूक; अंतिम प्रभाग रचना आज होणार जाहीर

**● बदल होणार की नाही याकडे राजकारण्यांसह शहरवासीयांचे लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

सोलापूर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीची अंतिम प्रभाग रचना आज सोमवार दि. १३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता जाहीर होणार आहे, अशी माहिती म हापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर महापालिकेच्या वेबसाईटवर आणि महापालिका कौन्सिल हॉल सभागृहाशेजारी ही अंतिम प्रभाग रचना माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे. नागरिकांना ही रचना पाहता येणार आहे. प्रभाग रचनेत बदल होणार की नाही ? याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.महापालिकेची प्रारूप प्रभाग रचना दि.



३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यावर नागरिक, माजी नगरसेवक, तसेच विविध राजकीय पक्षांकडून एकूण ३८ हरकती दाखल करण्यात आल्या होत्या. या हरकतींची सुनावणी १३ ते २२ सप्टेंबर या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. त्यानंतर २३ ते २५ सप्टेंबर दरम्यान त्या संदर्भातील शिफारसी प्राधिकृत अधिकाऱ्यांनी नगरविकास विभागास पाठवल्या, तर २६ ते ३० सप्टेंबर या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाकडे अंतिम अहवाल सादर करण्यात आला. शेवटच्या दिवशी शहरातील विविध प्रभागातून १६ हरकती व सूचना दाखल झाल्या होत्या.

विशेष म्हणजे, सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे यांनी शहरातील अनेक प्रभागांसंदर्भात मुद्देनिहाय हरकती सादर केल्या आहेत. या हरकतींमध्ये लोकसंख्येतील वाढ (९.५ लाखांवरून १२.५ लाखांपर्यंत), प्रभागातील असमतोल मतदारसंख्या, हद्दवाढ भागांवरील अन्याय, राजकीय हेतूंचा संशय, तसेच सिंगल वॉर्ड प्रणालीची मागणी यांसारख्या मुद्द्यांचा समावेश आहे. शहरातील माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे, चंद्रकांत सोनवणे, समीर शेख, अमोल जगताप, रियाज मोमीन, मिलिंद क्षीरसागर, अंजली वलसा, नटराज कांबळे, मनीष गायकवाड आदींनी देखील आपली हरकत नोंदविली आहे. आता सर्वांचे लक्ष राज्य निवडणूक आयोगाकडे आहे - अंतिम प्रभाग रचनेत कोणते बदल होणार, कोणते प्रभाग कायम राहतील, आणि कोणत्या वॉर्डमध्ये राजकीय समीकरणे बदलणार, यावर शहरातील आगामी निवडणुकीचे चित्र अवलंबून असेल.


**सरासरी ३७ हजार ३१६ लोकसंख्येचे प्रभाग**

प्रभागांची एकूण संख्या – २६ असून चार सदस्यीय प्रभाग २४ तर तीन सदस्यीय प्रभाग २ (प्रभाग क्र.२५ व २६) आहेत. सोलापूर महानगरपालिका क्षेत्राची २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या – ९ लाख ५१ हजार ५५८ आहे. यामध्ये अनूसुचित जातीची लोकसंख्या – १ लाख ३८ हजार ७८, अनुसूचित जमातीची लोकसंख्या – १७ हजार ९८२ आहे. यासाठी चार सदस्यीय प्रभाग सरासरी ३७ हजार ३१६ लोकसंख्या तर तीन सदस्यीय प्रभागात सरासरी २७ हजार ९८७ लोकसंख्या धरण्यात आली आहे. निवडून दयावयाच्या महानगरपालिका सदस्यांची संख्या – १०२ आहे.

**सन २०१७ मध्ये असे होते पक्षीय बलाबल**

सोलापूर महापालिकेच्या स्थापनेनंतर प्रथमच सन २०१७ मध्ये सोलापूर महापालिकेत भाजपाची सत्ता प्रस्थापित झाली. यावेळी असलेले एकूण १०२ जागांपैकी पक्षीय बलाबल असे – भाजपा – ४९, शिवसेना – २१, काँगेस – १४, राष्ट्रवादी काँग्रेस – ४, एमआयएम – ९, बसपा –४, माकपा –१. यापूर्वी महापालिका निवडणूक २०१७ मध्ये चार सदस्यांचा एक प्रभाग होता. यात प्रत्येकी दोन जागा महिलांसाठी तर दोन जागा सर्वसाधारण अशी रचना होती. त्यामुळे सर्वांना संधी उपलब्ध झाली होती.

### विचारपुष्प



नि अनुकूल व्यक्तींचा उपयोग करायचा आणि प्रतिकूल विचारांच्या व्यक्तींशी संपर्क ठेवत राहायचा, तो वाढवायचा. अशा प्रतिकूल व्यक्तींच्या बाबतीत एखादा सुखाचा-आनंदाचा प्रसंग असो किंवा दु:खाची घटना असो, त्यावेळी कोणताही भेदभाव-मानपान मनात न ठेवता त्या प्रसंगी त्या व्यक्तीला सर्व तऱ्हेने सहकार्य करण्याचा आटोकाट प्रयत्न करा.

**लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

## बिहारात 'एनडीए'चे ठरले
### जागावाटपाची घोषणा




| एकूण जागा : २४३ | |
|---|---|
| भाजपा | १०१ |
| जदयू | १०१ |
| लोजपा (आर) | २९ |
| आरएलएम | ०६ |
| हम | ०६ |

◆ **नवी दिल्ली, १२ ऑक्टोबर**

नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने जागावाटप निश्चित केले आहे. २४३ जागांपैकी भारतीय जनता पक्ष आणि संयुक्त जनता दल प्रत्येकी १०१ जागांवर लढणार आहेत. चिराग पासवान यांच्या नेतृत्वातील लोकजनशक्ती पार्टीला (रामविलास) २९ तर, हिंदुस्थानी अवामी मोर्चा आणि राष्ट्रीय लोक मोर्चा यांच्या पदरात प्रत्येकी सहा जागा पडल्या.

बिहारमध्ये ६ आणि ११ नोव्हेंबर,अशा दोन टप्प्यांत निवडणूक होणार आहे. १४ तारखेला निकाल जाहीर होईल. ६ ऑक्टोबरला निवडणूक आयोगाने निवडणूक तारखांची घोषणा केल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांनी जागा वाटप निश्चित करण्यासाठी बैठकांचा सपाटा लावला. मात्र, मनासारख्या जागा मिळत नसल्याने नाराजी उफाळून येत होती. रालोआतील घटक पक्ष लोजपाला ३५ तर, जीतनराम मांझी यांच्या पक्षाने १५ जागांची मागणी केली होती. सहकारी पक्षांमध्ये राजी-नाराजी सुरूच होती.

अखेर ११ ऑक्टोबरला दिल्लीत झालेल्या बैठकीत जागा वाटपाला अंतिम स्वरूप देण्यात आले आणि जागांवरून सुरू असलेले राजकीय भांडण अखेर संपले. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी जागावाटपाची अधिकृत घोषणा रविवारी केली. रालोआच्या चारही पक्षांनी जागावाटपावर सहमती दर्शविली असून, बिहारात पुन्हा आमचेच सरकार येणार असल्याचे भाजपचे बिहार प्रभारी विनोद तावडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. ◂*(वृत्तसंस्था)*

## अफगाणचा पाकिस्तावर हल्ला; ५८ सैनिक ठार

**२५ चौक्यांवर ताबा; कंधारसह पाच शहरांवर पाकचे ड्रोन हल्ले**

**काबुल, १२ ऑक्टोबर**

पाकिस्तानच्या वायुदलाने दोन दिवसांपूर्वी अफगाणिस्तानची राजधानी काबुलवर केलेल्या हवाई हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून तालिबानच्या नेतृत्वाखालील अफगाण फौजांनी शनिवारी रात्री पाकिस्तानच्या कुनार आणि हेलमंद प्रांतासह सीमेवरील अनेक भागांत हल्ले चढविले. त्यात ५८ पाकिस्तानी सैनिक ठार, तर ५० पेक्षा अधिक जखमी झाले. हल्ल्यानंतर पाकिस्तानी सुरक्षा दलाचे जवान चौक्या सोडून पळून गेले.

तालिबानी सैन्याने त्यांच्या २५ चौक्या ताब्यात घेतल्या. या संघर्षात २० तालिबानी ठार झाले. हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने रविवारी अफगाणच्या कंधार आणि इतर पाच शहरांवर ड्रोन हल्ले केले. त्यात १५ नागरिकांचा मृत्यू झाला, तर अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या. या संघर्षात आम्ही ५८ पाकिस्तानी सैनिक मारले आणि आमचे २० जवान ठार झाले आणि १६ जखमी आहेत. **पाकिस्तानचा विनाश कुणीही रोखू शकणार नाही** : अफगाणिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते इनायतुल्लाह खोवराझमी यांनी म्हटले की, पाकिस्तानने अफगाण हवाई क्षेत्राचे उल्लंघन केल्यामुळे हे प्रत्युत्तर देण्यात आले. विरोधी बाजूने पुन्हा हवाई क्षेत्राचे उल्लंघन केले, तर पाकिस्तानचा विनाश कुणीही रोखू शकणार नाही.



### महत्त्वाचे

**शाळेचे शुल्क आता यूपीआयने भरणे शक्य**

**नवी दिल्ली** : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने राज्यांना पारदर्शकता सुधारण्यासाठी आणि पालकांच्या सोयीसाठी यूपीआय वापरून शालेय शुल्क संकलन प्रक्रिया आधुनिकीकरण करण्यास सांगितले आहे. राज्ये आणि इतर भागधारकांना लिहिलेल्या पत्रात, त्यांना प्रशासकीय प्रक्रियांचे आधुनिकीकरण करून शालेय शिक्षण सोपे करण्यासाठी युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस स्वीकारण्याला प्रोत्साहन देण्यास सांगितले आहे. या उपक्रमामुळे शाळांना सुरक्षित आणि पारदर्शक डिजिटल पद्धतींद्वारे प्रवेश आणि परीक्षा शुल्क वसूल करता येते. विभागाने राज्ये आणि मंत्रालयाच्या अंतर्गत एनसीईआरटी, सीबीएसई, केव्हीएस आणि एनव्हीएसला अशा यंत्रणांचा शोध घेण्यास आणि अंमलात आणण्यास प्रोत्साहित केले आहे. ■

## राज ठाकरे पुन्हा मातोश्रीवर

**मुंबई** : महापालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर मुंबईत घडामोडी घडताना दिसत आहेत. त्यातच मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे रविवारी सहकुटुंब मातोश्रीवर दाखल झाले. स्नेहभोजनासाठी ही भेट झाल्याचे सांगण्यात येत असले तरी



राज आणि उद्धव ठाकरे यांच्यात तब्बल पावणे तीन तास चर्चा झाल्याची माहिती आहे. गेल्या काही दिवसांपासून राज ठाकरे आणि उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यामध्ये सातत्याने भेटीगाठी होत आहेत. मराठीच्या मुद्यावरून हे दोन बंधू एकत्र आले. त्यानंतर आजची ही त्यांची सहावी भेट होती. राज ठाकरे हे सहकुटुंब उद्धव ठाकरेंचे निवासस्थान मातोश्रीवर पोहोचले. त्यावेळी उद्धव ठाकरे यांच्यासोबत त्यांची जवळपास तीन तास चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. ही चर्चा नेमक्या कोणत्या मुद्यावर झाली, मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर चर्चा झाली का, हे मात्र स्पष्ट झालेले नाही. राज ठाकरेंच्या मनसेकडून दिवाळीत शिवाजी पार्कमध्ये दीपोत्सवाचे आयोजन करण्यात येते. त्या कार्यक्रमाला राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंना निमंत्रण दिल्याची शक्यता आहे.

## जम्मू-काश्मीर भारताचेच

**अफगाणिस्तानचे वक्तव्य, पाकिस्तानचा थयथयाट**

◆ **नवी दिल्ली, १२ ऑक्टोबर**

जम्मू-काश्मीर भारताचेच असल्याचे वक्तव्य अफगाणिस्तानने केल्यानंतर पाकिस्तानचा थयथयाट सुरू झाला आहे. अफगाणिस्तानचे वक्तव्य म्हणजे सुरक्षा परिषदेच्या ठरावाचे उल्लंघन असल्याचा आरोप केला आहे.



भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर आणि अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री आमिर खान मुत्तकी यांनी शुक्रवारी संयुक्त निवेदन जारी केले. जम्मू-काश्मीर भारताचे असल्याचे या निवेदनात नमुद केले आहे. यावर रविवारी पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने वक्तव्य जारी करीत अफगाणिस्तानने घेतलेल्या भूमिकेचा निषेध केला.

**खनिज, कृषी, क्रीडा क्षेत्रात भारत करणार गुंतवणूक:मुत्तकी**

काबूल आणि दिल्ली दरम्यानच्या विमानसेवांची संख्या वाढविणे, दोन्ही देशांमध्ये व्यापाराला बळकटी देण्यासाठी वाघा सीमा खुली करणे आणि खनिज, कृषी आणि क्रीडा क्षेत्रात गुंतवणूक करण्यासंदर्भात भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्यासोबत झालेल्या चर्चेत सहमती झाल्याची माहिती अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्तकी यांनी रविवारी पत्रपरिषदेत दिली. यावेळी महिला पत्रकारांची उपस्थिती होती.

मुत्तकी म्हणाले, जयशंकर यांच्यासोबत झालेल्या चर्चेत भारत आणि अफगाणिस्तानमधील व्यापारासाठी सर्वात जलद आणि सोपा मार्ग असलेली वाघा सीमा उघडण्याची आम्ही विनंती केली, ती मान्य करण्यात आली.

त्यांनी पुढे सांगितले, की अफगाणिस्तानचा उलेमा मदरसे आणि दारुल उलूम देवबंदशी खोल संबंध आहे. सध्या अफगाणिस्तानमधील शाळा आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये १ कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, ज्यात २८ लाख महिला आणि मुलींचा समावेश आहे.

धार्मिक मदरसे पदवीपर्यंत शिक्षण देतात. त्यांनी मान्य केले की काही क्षेत्रांमध्ये महिलांच्या शिक्षणावर मर्यादा आहे, परंतु याचा अर्थ असा नाही की ते शिक्षणाला विरोध करतात. शिक्षण धार्मिकदृष्ट्या निषिद्ध घोषित केलेले नाही, उलट ते पुढील सूचना येईपर्यंत पुढे ढकलण्यात आले आहे. ◂*(वृत्तसंस्था)*

### भारताचा सलग दुसरा पराभव

**विशाखापट्टणम** : महिला एकदिवसीय विश्वचषकात यजमान भारताचा सलग दुसरा पराभव झाला. दक्षिण आफ्रिकेला पराभूत केल्यानंतर, भारतीय महिला संघाचा गतविजेत्या ऑस्ट्रेलियाकडून तीन विकेट्सने पराभव झाला. रविवारी विशाखापट्टणम येथे भारताने ३३० धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने ४९ षटकांत सात विकेट्स गमावून लक्ष्य गाठले.

ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिलीने १४२ धावांची सामना जिंकणारी खेळी खेळली. एलिस पेरीने अखेर ४७ धावांची खेळी करत विजय निश्चित केला. गोलंदाजीत ॲनाबेल सदरलँडने फक्त ४० धावांत पाच विकेट्स घेतल्या. भारताकडून स्मृती मंधाना यांनी ८० आणि प्रतिका रावल यांनी ७५ धावा केल्या. श्रीचरणीने तीन विकेट्स घेतल्या. शर्मा आणि कौर यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. एकदिवसीय इतिहासात ऑस्ट्रेलियाने सर्वाधिक लक्ष्याचा पाठलाग केला. संघाने २०२४ मध्ये आफ्रिकेविरुद्ध ३०५ धावा करणाऱ्या श्रीलंकेचा विक्रम मोडला.

## केळी भरलेला ट्रक उलटून दोन ठार, ५ जखमी

◆ **टुनकी, १२ ऑक्टोबर**

केळी भरलेला ट्रक उलटून झालेल्या अपघातात दोन जण ठार तर, ५ जण जखमी झाले. ही घटना सोनाळा-टुनकी मार्गावर साईकृपा पेट्रोलपंपाजवळ घडली. नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी पोहचून मदतकार्य केले.

केळीचे क्रेट भरलेला भरधाव ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रक उलटून मोठा अपघात झाला. निष्काळजीपणाने वाहन चालवल्या प्रकरणी सोनाळा पोलिसांनी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ११ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास जळगावकडून (जा) आकोटकडे केळीचे क्रेट भरलेला अशोक लेलॅण्ड ट्रक सुसाट वेगाने जात होता. टुनकीनजीक साईकृपा पेट्रोलपंपजवळ ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने तो उलटला. नीलेश देविदासराव चव्हाण व बाळुभाऊ गुणवंत रायबोले अशी मृतांची नावे आहेत. जखमींमध्ये गुणवंत रामदास चव्हाण, वनदेवराव जगनराव वानखेडे, इद्रीस खान इब्राहीमखान पठाण, शाहीद खान पठाण यांचा समावेश आहे. पुढील तपास सोनाळा पोलिस करीत आहेत.



उलटलेला ट्रक क्रेनच्या साहाय्याने उचलताना बचाव पथक

घटनेची माहिती मिळताच सोनाळाचे ठाणेदार चंद्रकांत पाटील, उपनिरीक्षक महादेव खोने, विनोद शिमरे, बीट जमादार वानखडे, वाहतूक नियंत्रण पोलिस महादेव शिपे ताफ्यासह तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिस व नागरिकांच्या मदतीने मदतकार्य करून जेसीबीच्या साहाय्याने ट्रक उचलून खाली दबलेल्या मजुरांना बाहेर काढले व सोनाळा प्राथमिक आरोग्य केंद्राची रुग्णवाहिका उपलब्ध करून जखमींना उपचारासाठी प्रथम वरवट (बकाल) व पुढील उपचारासाठी शेगाव व अकोल्याला हलवण्यात आले. ◂*(तभा वृत्तसेवा)*

तुमच्या जुन्या बँक खात्यांमध्ये पैसे विसरला आहात का?



ते पुन्हा मिळवण्यासाठी आरबीआय तुम्हाला मदत करेल.

बँकेतील तुमच्या निष्क्रिय खात्यातील (2 वर्षांपेक्षा जास्त आणि 10 वर्षांपेक्षा कमी निष्क्रिय असलेले खाते) पैसे / दावा न केलेल्या ठेवीतील (10 वर्षांपेक्षा अधिक काळ) पैसे आरबीआयच्या डीईए निधीमध्ये हस्तांतरित केले जातात. तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस त्यावर कधीही दावा करू शकतो.

तुमच्या पैशांवर दावा करण्याच्या 3 सोप्या स्टेप्स

1. तुमच्या बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या, ती तुमची नेहमीची शाखा नसली तरीही चालेल.
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदाता ओळखपत्र, किंवा ड्रायविंग लायसन्स) फॉर्म सादर करा
3. पडताळणी केल्यानंतर, जर असतील तर पैसे व्याजासह परत मिळवा

तुम्ही दावा न केलेली रक्कम शोधण्यासाठी

तुमच्या बँकेची वेबसाइट शोधा किंवा आरबीआयचे UDGAM पोर्टल (https://udgam.rbi.org.in) पहा, ज्यात सध्या 30 बँका आहेत.

ऑक्टोबर ते डिसेंबर 2025 दरम्यान देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या दावा न केलेल्या संपत्तीच्या खास शिबिरांमध्ये भेट द्या




अधिक माहितीसाठी भेट द्या:
https://rbikehtahai.rbi.org.in
अभिप्राय देण्यासाठी इथे लिहा: rbikehtahai@rbi.org.in
क्यूआर कोड स्कॅन करा
अधिकृत व्हॉट्सॲप नंबर 99990 41935

जनहितार्थ जारी
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### खडकवासला धरण भरले; शेतकऱ्यांना दिलासा

**पुणे** : खडकवासला धरणसाखळीत २९.०४ टीएमसी म्हणजे ९९.६५ टक्के पाणीसाठा आहे. गतवर्षीही एवढाच साठा होता. त्यामुळे जिल्ह्यातील एक कोटी रहिवाशांसह ६६ हजार हेक्टर शेतीला मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाले आहे. १५ मे पासून ५ ऑक्टोबरपर्यंत म्हणजे जवळपास साडेचार महिने धरणक्षेत्रात दमदार पाऊस पडला. त्यामुळे जादा पाणी सोडूनही धरणसाखळी शंभर टक्के भरली आहे. खडकवासला धरणाच्या लाभ क्षेत्रातील इंदापूर, दौंड परिसरात जोरदार पाऊस पडला आहे. त्यामुळे अद्यापही रब्बी आवर्तनाची मागणी आली नाही.

### अमीर खान मुत्ताकींचा आग्रा दौरा रद्द


**आग्रा** : अफगाणिस्तानचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अमीर खान मुत्ताकी यांनी रविवारी आग्रा दौरा रद्द केला, अशी माहिती सूत्रांनी दिली. रद्द करण्याचे कोणतेही कारण अधिकाऱ्यांनी सांगितले नाही. मुत्ताकी ताजमहाल पाहण्यासाठी आग्रा येथे जाणार होते. दिल्लीला परतण्यापूर्वी मुत्ताकी ताज महाल येथे दीड तास घालवणार होते. सहा दिवसांच्या दौऱ्यावर गुरुवारी नवी दिल्लीत आलेले मुत्ताकी हे चार वर्षांपूर्वी सत्ता काबीज केल्यानंतर भारताला भेट देणारे पहिले वरिष्ठ तालिबानी मंत्री आहेत. भारताने अद्याप तालिबानला मान्यता दिलेली नाही. त्यांनी शनिवारी सहारनपूरमधील दारुल उलुम देवबंदला भेट दिली.

### कोट्यवधींचे हेरॉईन जप्त; तीन तस्करांना अटक

**इम्फाळ** : ईशान्य राज्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये मणिपूर पोलिसांच्या एका रायफलमनसह तीन जणांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून तीन किलो हेरॉईन, इतर मादकपदार्थ आणि सुमारे ९.६ लाख रुपये रोख जप्त करण्यात आले, असे रविवारी एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे. शुक्रवारी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यात रायफलमन मोहम्मद वहिदुर रहमान याला अटक करून सेम्प्लेक्सप्लस औषधाच्या ५४४ कॅप्सुल जप्त करण्यात आल्या, असे पोलिस निवेदनात म्हटले आहे. शुक्रवारी थौबल जिल्ह्यातील लिलोंग आणि इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील खेस्त्रीगाव येथून आणखी दोन अमलीपदार्थ तस्करांना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून सुमारे तीन किलो हेरॉईन, सायकोट्रॉपिक सिरप टसरेक्स-टीआरच्या आठ बाटल्या आणि ९.५७ लाख रुपयांची रोकड, एक एसबीबीएल बंदूक आणि दोन काडतुसे जप्त करण्यात आली, असे त्यात म्हटले आहे.

### 'मनाचे श्लोक' चित्रपटाचे नाव बदलणार

**मुंबई** : अभिनेत्री आणि दिग्दर्शिका मृण्मयी देशपांडे यांनी 'मनाचे श्लोक' चित्रपटाचे नाव बदलणार असल्याची माहिती दिली. पुणे, छ. संभाजीनगर आणि महाराष्ट्रातील इतर ठिकाणी काही लोकांनी नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'मनाचे श्लोक' या मराठी चित्रपटाच्या प्रदर्शनात अडथळा आणल्याबद्दल निराशा व्यक्त केली आहे. काही व्हिडीओंमध्ये संत-कवी समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रसिद्ध श्लोक संग्रहाच्या नावावरून या चित्रपटाचे प्रदर्शन रोखताना भगवे कपडे घातलेले लोक दिसत आहेत आणि या शीर्षकामुळे त्यांचा अपमान होत असल्याचा आरोप केला आहे. व्यावसायिक मराठी चित्रपटाचे नाव मनाचे श्लोक हे पवित्र हिंदू संस्कृतीचा अनादर करते, असा आरोप त्यांनी केला आहे. हा चित्रपट १० ऑक्टोबर रोजी राज्यभर प्रदर्शित झाला. चित्रपटाचे दिग्दर्शक आणि मुख्य कलाकार देशपांडे यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट करीत पुणे, छ. संभाजीनगर आणि पश्चिम महाराष्ट्रात त्यांच्या चित्रपटाचे प्रदर्शन थांबवण्यात आल्याने दुःख झाले. हा चित्रपट आता राज्यभरातील चित्रपटगृहांमधून काढून टाकण्यात आला आहे आणि १६ ऑक्टोबर रोजी तो नवीन शीर्षकासह पुन्हा प्रदर्शित केला जाईल, असे म्हटले आहे. मनाचे श्लोक मानवी मनाला धार्मिकता, आत्मचिंतन आणि तर्कशुद्ध विचारांकडे मार्गदर्शन करते.



### सराफा

| | | |
|---|---|---|
| सोने | (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२१,८०० |
| चांदी | (प्रतिकिलो) | रु. १,६६,७०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३४.२ | २०.८ |
| अमरावती | ३३.२ | १८.८ |
| भंडारा | ३०.० | २१.० |
| बुलडाणा | ३१.० | १८.० |
| चंद्रपूर | ३३.० | २३.० |
| गडचिरोली | ३३.० | २३.० |
| गोंदिया | ३०.० | २०.० |
| नागपूर | ३२.४ | १९.९ |
| वर्धा | ३२.८ | २०.८ |
| वाशीम | २९.८ | १७.२ |
| यवतमाळ | ३३.० | १९.६ |

# गोंदियात रात्रभर वाघाचा थरार!

## जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जेरबंद

**गोंदिया, १२ ऑक्टोबर**

रात्रीच्या सुमारास वाघाने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात डरकाळी फोडली आणि परिसरातील नागरिकांची पाचावर धारण बसली! हा वाघ साधारणत: साडेअकरा वाजताच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात दाखल झाला. नंतर डरकाळी फोडल्याने परिसरातील नागरिकांची झोप उडाली. रविवारी पहाटेपर्यंत हा थरार सुरू होता. वनविभागाच्या पथकाने पहाटे ४.३० वाजता या वाघाला जेरबंद करून नागपुरातील गोरेवाडा बचाव केंद्रात हलविले. त्यानंतर भीतीने गाळण उडालेल्या नागरिकांचा जीव भांड्यात पडला.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या वाढविण्यासाठी वनविभाग प्रयत्नरत आहे. एनएनटीआर वाघ जिल्ह्याची शान ठरत आहे. जिल्ह्यात वाघांची संख्या वाढू लागली आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या चौफेर वाघांचे अस्तित्व जाणवते. त्यातच आता संरक्षित क्षेत्राबाहेरही वाघांचे अस्तित्व असल्याचे काही घटनांवरून पुढे आले आहे. शनिवारची रात्र गोंदियातील नागरिकांना जागवणारी ठरली. वाघाने थेट शहरात प्रवेश केला आणि पळापळ सुरू झाली.

शहरातील सारस चौकात जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद तसेच पोलिस अधीक्षक कार्यालय असून, याच परिसरात जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्यासह जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षकांचे निवासस्थान आहे. दरम्यान, रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास या ठिकाणी वाघ दिसला आणि नागरिकांची भीतीने गाळण उडाली. ही माहिती वनविभागाला तत्काळ देण्यात आली. वनविभागाच्या आरआरटी पथकाने घटनास्थळ गाठून वाघाला पकडण्यासाठी हालचाली सुरू केल्या. तोपर्यंत दीड ते दोन हजार नागरिक जमले होते. त्यामुळे पोलिस पथकाला पाचारण करावे लागले.

पहिल्यांदाच वाघ शहराच्या निवासी भागात आल्याने बघ्यांची गर्दी वाढत होती. त्यातच काळोखामुळे वाघाला पकडण्यात अडचणी येत होत्या. नाईट व्हिजन थर्मल ड्रोनने वाघाचा ठिकाणा शोधण्यात आला आणि वाघापर्यंत पोहोचण्यासाठी जेसीबीने रस्ता तयार करावा लागला. या परिसरात घरे, कार्यालये असल्याने हे अभियान राबविताना पथकाची चांगलीच दमछाक झाली. मात्र, पहाटे ४.३० च्या सुमारास वाघाला बेशुद्ध करण्यात यश आले. त्यानंतर या वाघाला नागपूर येथील गोरेवाडा बचाव केंद्रात हलविण्यात आले. (तभा वृत्तसेवा)



जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात वावरणाऱ्या वाघास जेरबंद करणारे पथक

### वनविभागाकडून शर्थीचे प्रयत्न


वाघाला जेरबंद करण्यासाठी वनविभागाच्या पथकाने शर्थीचे प्रयत्न केले. यावेळी उपवनसंरक्षक पवन जोग, सहायक वनसंरक्षक सचिन डोंगरवार, विजय धांडे, वनपरिक्षेत्र अधिकारी दिलीप कौशिक यांच्या मार्गदर्शनात अमोल चौबे, अमित राऊत, सतीश शेंदरे, विक्रांत ब्राह्मणकर, शुभम मेश्राम, राजेश ढोक, पृथ्वी सय्याम, वाहनचालक टिकेश्वर डोंगरवार, दिनेश सोनवाने यांनी वाघाला जेरबंद केले. यावेळी गोंदिया ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सिंगनजुडे यांच्या पथकाने नागरिकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवले.

"शहरात वाघ दाखल झाल्याचे कळताच वाघाला पाहण्यासाठी दीड ते दोन हजार नागरिकांनी गर्दी केल्याने छोटीशी चूकसुद्धा एखाद्याच्या जीवावर बेतू शकत होती. अशावेळी पथकाने शर्थीचे प्रयत्न करतानाच सर्व परिस्थितीवर मात करून वाघाला पकडण्यात यश मिळविले."

**- दिलीप कौशिक,** वनपरिक्षेत्राधिकारी

# अभिजात संगीताचा दस्तावेज आता उपलब्ध : सदानंद मोरे

## 'हिंदुस्थानी अभिजात संगीताचा इतिहास' ग्रंथाचे प्रकाशन



हिंदुस्थानी अभिजात संगीताचा इतिहास' ग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. विकास कशाळकर, डॉ. गो. बं. देगलूरकर, सदानंद मोरे आणि अंजली मालकर

**पुणे, १२ ऑक्टोबर**

हिंदुस्थानी अभिजात संगीताच्या इतिहासाचा परिपूर्ण दस्तावेज आपल्याकडे नव्हता, ती उणीव 'हिंदुस्थानी अभिजात संगीताचा इतिहास' च्या दोन खंडांनी भरून काढली आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आणि विचारवंत सदानंद मोरे यांनी व्यक्त केले. प्रसिद्ध गायिका आणि संगीतज्ञ अंजली मालकर यांनी लिहिलेल्या 'हिंदुस्थानी अभिजात संगीताचा इतिहास' या ग्रंथांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. मूर्तीशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर, ज्येष्ठ गायक, संगीतज्ञ डॉ. विकास कशाळकर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ निर्मित या ९०० पानी ग्रंथांचे प्रकाशन एसएनडीटी महाविद्यालयाच्या सभागृहात संगीत क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत नुकतेच झाले. श्री. मोरे म्हणाल, संगीताचा इतिहास लिहिताना बऱ्याच आख्यायिका लिहिल्या जात होत्या, पण या ग्रंथाच्या माध्यमातून संगीताचा ७०० वर्षांचा विश्वासार्ह इतिहास अभ्यासक आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झाला आहे. याच काळातील वाद्य संगीताचाही इतिहास लिहिला गेला पाहिजे. डॉ. गो. बं. देगलूरकर म्हणाले, गायनाच्या इतिहासावरील हा एक मौलिक ग्रंथ झाला आहे. मंदिरांच्या शिल्पांवर अनेक सूरसुंदरीच्या हातात अनेक वाद्य दिसतात. त्यांचा देखील असा इतिहास लिहिला जावा.

पुस्तकाच्या मिर्मितीत योगदान देणारे श्री. विजय जोशी (मुद्रणशोधन), श्री. प्रभाकर भोसले (मुखप्रुष्ठ), ऋचा कुलकर्णी आणि मानसी परशुरामकर (शब्दसूची), अंजली दाणी (सहाय्यक) यांचा यावेळी पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्र संचालन स्वरदा कुलकर्णी यांनी केले तर यमाजी मालकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास निर्मलाताई गोगटे, डॉ. हरी सहस्त्रबुद्धे, श्री. राम कोल्हटकर मनशक्तीचे गजानन केळकर, भारतीय विद्याभवनचे नंदकुमार काकिर्डे, भारती विद्यापीठाचे शारंगधर साठे असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

### ७०० वर्षांचा इतिहास उपलब्ध

डॉ. विकास कशाळकर म्हणाले, 'खरे तर २०-२५ जणांनी करावायचे काम श्रीमती मालकर यांनी केले असून मराठीमध्ये असा ७०० वर्षांचा विस्तृत इतिहास त्यामुळे प्रथमच उपलब्ध झाला आहे. प्रबंधगायकीपासून ख्याल गायनापर्यंतची सविस्तर माहिती या पुस्तकात सोदाहरण आली आहे.' सुरवातीस श्रीमती अंजली मालकर यांनी या ग्रंथ लेखनाचा प्रवास आपल्या मनोगतात उलगडून सांगितला. त्या म्हणाल्या, 'मध्ययुगीन काळापासून आधुनिक काळापर्यंत बदललेल्या संगीत प्रवाहांना एका सूत्रात बांधता आले, याचे समाधान या लेखनामुळे मला मिळाले. (वृत्तसंस्था)

# तामिळनाडू सरकारचे केंद्राच्या सूचनांकडे दुर्लक्ष

## तीन कंपन्यांवर कारवाईचे दिले होते आदेश

**नवी दिल्ली, १२ ऑक्टोबर**

श्रीसन फॉर्मास्युटिकल कंपनीने बनविलेल्या प्राणघातक कोल्ड्रिफ कफ सिरपमुळे झालेल्या २४ मुलांच्या मृत्यू प्रकरणासाठी केंद्रीय औषध नियंत्रक विभागाने निवेदन जारी करून तामिळनाडू सरकारच्या अन्न व औषध विभागाला जबाबदार ठरविले आहे. त्यांना २०२३ मध्येच कोल्ड्रिफ औषध बनवणाऱ्या श्रीसन औषध कंपनीसह तीन कंपन्यांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या, परंतु त्यांनी दुर्लक्ष केले. पर्यायाने या कंपन्यांतून होणाऱ्या उत्पादनांचा देशभर पुरवठा करण्यात येत होता.

केंद्रीय औषध नियंत्रक विभागाने निवेदनात म्हटले की, तामिळनाडू सरकारचा अन्न व औषध विभाग आणि राज्य ओषध प्राधिकरणाला २०२३ मध्ये श्रीसन औषध कंपनीसह तीन औषध कंपन्यांचे परवाने रद्द करण्याचे निर्देश दिले होते, मात्र त्यांनी शिफारसीकडे दुर्लक्ष केले. त्यांनी औषध कंपनी श्री सनच्या कामकाजाचे योग्य निरीक्षण न करता उत्पादनासाठी परवाने देण्यात आले आणि ते केंद्रीय मार्गदर्शक तत्त्वांचे उलंघन आहे. तामिळनाडू औषध नियंत्रण प्राधिकरणाने आपली जबाबदारी पार पाडली नाही. ऑक्टोबर २०२३ मध्ये, सर्व राज्यांना औषध कंपन्यांची आणि तेथे उत्पादन होणाऱ्या ओषधींच्या गुणवत्तेची माहिती सादर करण्यास सांगितले होते. मात्र तामिळनाडूच्या सरकारच्या संबंधित विभागाने कोणतीही माहिती पाठवली नाही. केंद्रीय औषध नियंत्रक विभागाच्या पथकाने श्रीसन फार्मसह तीन कंपन्यांची तपासणी केली असता, औषधीच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून संबंधिक कंपन्यांवर कारवाई करण्याच्या सूचना राज्य सरकारला केल्या. (वृत्तसंस्था)

### मध्य प्रदेशच्या घटनेनंतरही सहकार्य नाही

कोल्ड्रिफ कफ सिरपमुळे मध्य प्रदेशात झालेल्या मुलांच्या मृत्यूनंतरही तामिळनाडू सरकारचे संबंधित विभाग गप्प राहिले. मध्य प्रदेश सरकारच्या विनंतीवरून तामिळनाडू सरकारच्या अन्न व औषधी विभागाने १ आणि २ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री सन फार्माचे ऑडिट केले. ही माहिती केंद्रीय एजन्सीपासून लपवण्यात आली. जेव्हा केंद्रीय एजन्सीला हे कळले, तेव्हा केंद्रीय पथक ३ ऑक्टोबर रोजी कारखान्याचे ऑडिट करण्यासाठी तामिळनाडूतील कांचीपुरम येथे पोहोचले. त्यावेळी संबंधित विभागाने सहकार्य केले नाही. त्यानंतर पथकाने स्वतःचे ऑडिट केले आणि परवाना रद्द करण्याची शिफारस केली.

# फिलिपाईन्समध्ये भारतीयांना आता व्हिसामुक्त प्रवेश

**अहमदाबाद, १२ ऑक्टोबर**

फिलिपाईन्स भारतीयांसाठी आग्नेय आशियातील एक आघाडीचे पर्यटन स्थळ बनण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे फिलिपाईन्समधील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. भारत आणि फिलिपाईन्समधील प्रादेशिक संपर्क वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून, एअर इंडियाची दिल्ली ते मनिला थेट विमानसेवा १ ऑक्टोबरपासून सुरू झाली. फिलिपाईन्सने जूनमध्ये भारतीयांसाठी व्हिसा-मुक्त प्रवास सुरू केला. भारतीय पर्यटकांसाठी आमच्या व्हिसा-मुक्त पद्धती आणि १० वर्षांनंतर भारत आणि फिलिपाईन्स दरम्यान थेट विमानसेवा पुन्हा सुरू झाल्यामुळे, आम्ही तुमचे स्वागत करण्यास तयार आहोत, असे भारतातील फिलिपाईन्सचे राजदूत जोसेल एफ. इग्नासिओ म्हणाले. (वृत्तसंस्था)

### चिनी जहाजाची फिलिपाईन्सच्या नौकेला धडक

**बीजिंग, १२ ऑक्टोबर**

चिनी तटरक्षक दलाच्या एक जहाजाने फिलिपाईन्सच्या नौकेला रविवारी धडक दिली. चिनी तटरक्षक दलाच्या जवानांनी पहिले फिलिपाईन्सच्या नौकेवर पाण्याचा मारा केला. नंतर त्याला धडक दिली. यात फिलिपाईन्सच्या नौकेचे नुकसान झाले. यामुळे दक्षिण चीन समुद्रातील वाद पुन्हा एकदा चिघळण्याची शक्यता आहे.

फिलिपाईन्समधील मासेमारांची नौका एका बेटाजवळ नांगर घालत असताना चिनी जहाजाने त्याला धडक दिली. चीन संपूर्ण दक्षिण चीन समुद्रावर दावा करतो. फिलिपाईन्ससह इतर अनेक देशही त्याच्या काही भागांवर दावा करतात. हा वादाचा मुख्य मुद्दा आहे. चीनने यापूर्वीही फिलिपाईन्सच्या जहाजांवर पाण्याचा मारा केला आहे. पण, नौकेला धडक देण्यासारखा प्रकार पहिल्यांदाच केला आहे. (वृत्तसंस्था)



# विवेकानंद केंद्र येथे संस्कृत अभ्यास वर्ग उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१२ ऑक्टोबर-**

विवेकानंद केंद्र येथे संस्कृत अभ्यास वर्ग दि. १२ जुलै ते १२ आक्टोबर असा तीन महिने घेण्यात आला. यामध्ये संस्कृत विविध श्लोक विवरण, संस्कृत संभाषण वर्ग घेण्यात आला. वय वर्षे १२ ते ७० या वयोगटातील एकूण ४५ जणांनी सहभाग नोंदविला.

या वर्गाचा समारोप प्रमुख अतिथी केंद्र प्रकल्प प्रमुख सुहास देशपांडे व मीराताई यांच्या उपस्थितीत झाला. प्रास्ताविक शुभांगी कुलकर्णी यांनी केले. यावेळी श्लोक, सुभाषित, मुकनाट्य, संवाद, अनुभव कथन, कथा, गीत संस्कृतमधून सादर केले. प्रमुख अतिथी श्री.देशपांडे यांनी आपल्या मनोगतातून संस्कृत भाषेचे महत्त्व व प्रकल्पाचे उपक्रम सांगितले. सर्वांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. हा वर्ग शुभांगी कुलकर्णी व निखील बडवे यांनी घेतला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशांत याने केले. केंद्र प्रार्थना व पसायदानाने सांगता झाली. आनंद टाके व श्रीनिवास कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले.

# मंगळवेढ्यात पुरवठा विभागातील महिला कर्मचाऱ्यास दमदाटी; उसळली संतापाची लाट

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १२ ऑक्टोंबर**

मंगळवेढा येथील पुरवठा विभागात कार्यरत एका महिला कर्मचाऱ्यास खाजगी एजंटदाराने कार्यालयात येवून अरेरावी करुन अर्वाच्य भाषा वापरण्याचा प्रकार घडला असून या घटनेमुळे तहसील कार्यालय परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान ही घटना महसूलचे वरिष्ठ अधिकारी याच कार्यालयात असताना घडल्याने ते अधिकारी त्या एजंटवर काय कारवाई करणार याकडे कर्मचारी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

खाजगी एजंटदार अनेक वर्षापासून या परिसरात व गोडावून परिसरात सातत्याने वावरत असतो. पुरवठा विभागात अनेक कुटूंबाचे रेशन कार्ड काढण्यासाठी नागरिकांना ये जा करावे लागते. येथे कुणाचा कुणाला मेळ नसल्यामुळे रेशनकार्ड व अन्य कामात मोठी दिरगांई होत असल्याने या कार्यालयावर सगळेच संतापून आहेत. मध्यंतरी लाचलुचपत विभागाचा छापा पडणार असल्याची कुणकुण लागताच कार्यालयाला पंधरा दिवस कुलूप ठोकले होते. परिणामी अनेक नागरिकांची गैरसोय झाल्याने तक्रारी वाढल्यामुळे पुन्हा कार्यालय उघडण्यात आले. मध्यंतरी एका कार्यकर्त्याने नागरिकांच्या रेशन कार्डाची कामे होत नसल्याने आक्रमक पवित्रा घेत खुर्च्यांची आदळाआपट केल्याने पुरवठा विभागाने जिल्हा अधिकाऱ्यांकडे तशी माहितीही कळवून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. मागील दोन दिवसापुर्वी त्या एजंटदाराने पुरवठा विभागात येवून सदर कर्मचारी महिलेला अरेरावी करुन अर्वाच्य भाषा वापरल्याचे सांगण्यात आले.

यावेळी कार्यालयात वरिष्ठ महसूल अधिकारी असल्याने त्यांच्या कानावर ही घटना गेली व त्यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असल्यचे सांगण्यात आले. दरम्यान ते अधिकारी आता सदर खाजगी एजंटावर काय कारवाई करणार? याकडे तमाम नागिरकांचे लक्ष लागून राहिले आहे.

# विषाक्त स्थितीत आयुर्वेदिक योग उपयुक्त

**नागपूर, १२ ऑक्टोबर**

श्री वैद्यनाथ आयुर्वेद भवनचे संस्थापक पंडित रामनारायण शर्मा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भारतीय वैद्यकीय समन्वय समिती संचालित श्री आयुर्वेद महाविद्यालयात अगाध तंत्र या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादाचे उद्घाटन भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाचे आयुर्वेद सल्लागार डॉ. कौस्तुभ उपाध्याय यांनी केले. प्राचीन आयुर्वेदिक ग्रंथांमध्ये उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग सध्याच्या विषारी आहारात अत्यंत उपयुक्त आहे, असे त्यांनी भाषणात सांगितले.

भारतीय वैद्यकीय समन्वय समितीचे सचिव डॉ. गोविंद प्रसाद उपाध्याय यांनी आयुर्वेदातील परिसंवादाचा इतिहास आणि आयुर्वेदाच्या होणाऱ्या विकासावर प्रकाश टाकला. संघटन सचिव डॉ. अश्विन निकम यांनी परिसंवादात समाविष्ट असलेल्या विषयांची माहिती दिली. जागतिक आरोग्य संघटनेचे तांत्रिक सल्लागार डॉ. पवन गोडातवार यांनी मानसिक विषारीपणाला आजच्या डिजिटल युगात एक गंभीर आरोग्य आव्हान म्हणून वर्णन केले आणि या विषयावर स्वतंत्र परिसंवाद आयोजित करण्याची शिफारस केली.




स्वदेशी औषध आयोगाचे सदस्य डॉ. अतुल वार्ष्णेय यांनी अन्नातील भेसळीमुळे होणाऱ्या विषारी पदार्थांवर उपचार करण्याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश शर्मा यांनी अगदतंत्राद्वारे प्राचीन काळात वापरल्या जाणाऱ्या विषारी पदार्थांवर उपचार करण्याबाबत माहिती दिली.

व्यासपीठावर पुखराज बंग, डॉ. संतोष शर्मा, मृत्युंजय शर्मा आणि विद्यापीठाचे नियुक्त पर्यविक्षक डॉ. मनोज निंबाळकर उपस्थित होते. वैज्ञानिक सत्रांमध्ये अतिथी व्याख्यानांमध्ये डॉ. सत्यनारायण बी. (मणिपाल), डॉ. गोपीकृष्ण (कोट्टक्कल) आणि डॉ. रविकुमार श्रीवास्तव (जबलपूर) यांनी विचार मांडले. या परिसंवादात ८५० हून अधिक सहभागी उपस्थित होते आणि २०० संशोधन पत्रे सादर करण्यात आली. यावेळी डॉ. ब्रिजेश मिश्रा यांचे अष्टांग हृदय विमर्श आणि डॉ. विनोद चौधरी यांचे संधि शरीरम् पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले तसेच संशोधन पत्रांवर आधारित स्मरणिकाही प्रकाशित करण्यात आली.

# 'भैरवनाथ' चे यंदा सहा लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट

## नंदशेवर मठाचे बाळासाहेब महाराजांचे हस्ते बॉयलर अग्नी प्रदीपन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १३ ऑक्टोबर-**

लवंगी (ता.मंगळवेढा) येथील भैरवनाथ शुगरचा बॉयलर पूजन व १२ वा गळीत हंगाम नंदेश्वरचे मठाधिपती श्री.स.स. बाळासाहेब महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भैरवनाथ उद्योग समुहाचे चेअरमन अनिल सावंत, व्हा.चेअरमन केशव सावंत व रतनचंद शहा बँकेचे चेअरमन राहुल शहा आदी उपस्थित होते.



यावेळी सत्यनारायण पुजा श्रीपती माने व चंद्रप्रभा माने तसेच देवानंद पासले व प्रिती पासले या दांपत्यांच्या हस्ते झाली. यावेळी चेअरमन सावंत म्हणाले, कारखान्याचे संस्थापक माजी मंत्री प्रा.डॉ.तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली ११ गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्ण केले. यंदा कारखान्याचे ६ लाख मे.टन गाळपाचे उदिष्ट आम्ही पूर्ण करू. यावेळी माजी पालकमंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, श्री संत दामाजी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन तानाजी खरात, संचालक बसवराज पाटील, राष्ट्रवादी शहर प्रमुख चंद्रशेखर कोंडुभैरी, मुजफ्फर काझी, सचिन नकाते, माऊली काळे, सुधीर भोसले, राजकुमार पाटील, तुकाराम भोजने, भीमराव मोरे, संतोष रंधवे, साहेबराव पवार, अनिल पाटील, दादासाहेब पवार, शिवशंकर कवचाळे, संगीताताई कट्टे, स्मिताताई अवघडे, जमीर इमानदार व श्रीपती माने सरकार, रामचंद्र जाधव, चंद्रकांत देवकर, तानाजी चव्हाण,समाधान जाधव, शाम गोगाव, नितीन पवार, लक्ष्मण पवार, सिताराम भगरे, संगीता पुरमे व भैरवनाथ शुगरचे जनरल मॅनेजर बाळासाहेब शिंदे, नानासाहेब पोकळे, शिवाजी चव्हाण, कृष्णदेव लोंढे, चीफ अकौंटंट देवानंद पासले, एच आर मॅनेजर संजय राठोड, ई.डी.पी मॅनेजर गजानन माने-देशमुख, सुपरवायझर शंकर पाटील, केदार साबणे, संतोष माळी, प्रकाश कमळे, अभिजीत पवार आदी उपस्थित होते.

# माजी प्राचार्य डॉ. नागेश तालीकोटी यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि १२ ऑक्टोबर-**



माजी प्राचार्य डॉ. नागेश बसप्पा तालीकोटी यांचे रविवार दि.१२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सात वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा सोमवार दि. १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांनी आपल्या सेवाकालात शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ संभाजीनगर येथे विविध पदावर काम केले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व मुलगी व नातवंडे आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘ऑपरेशन ब्ल्यू स्टार’ मोठी चूक

### पी. चिदम्बरम् यांना उपरती



◆ **नवी दिल्ली, १२ ऑक्टोबर**

१९८४ मध्ये करण्यात आलेले ‘ऑपरेशन ब्ल्यू स्टार’ ही एक मोठी चूक होती, अशी उपरती काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री पी. चिदम्बरम् यांना झाली. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना या निर्णयाची मोठी किंमत चुकवावी लागली, असे त्यांनी सांगितले.

मला कोणत्याही लष्करी अधिकाऱ्याचा अनादर करायचा नाही. पण, सुवर्ण मंदिर परत मिळवण्याचा तो चुकीचा मार्ग होता. काही वर्षांनंतर आम्ही सैन्याला बाहेर ठेवून ते परत मिळवण्याचा योग्य मार्ग दाखवला. ब्ल्यू स्टार हा चुकीचा मार्ग होता आणि त्या चुकीची किंमत इंदिरा गांधी यांना मोजावी लागली, यावर मी सहमत आहे, असे चिदम्बरम् यांनी कसौली येथे एका आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले.

हा लष्कर, पोलिस, गुप्तचर आणि नागरी सेवेचा एकत्रित निर्णय होता. तुम्ही केवळ इंदिरा गांधी यांना दोष देऊ शकत नाही, असे चिदम्बरम् यांनी म्हटले.

**काँग्रेसने केला हल्ला**

पी. चिदम्बरम् यांच्या वक्तव्यावर काँग्रेसने संताप व्यक्त केला. ऑपरेशन ब्ल्यू स्टार योग्य होते अथवा चुकीचे ही वेगळी गोष्ट आहे. मात्र, ते झाल्यावर ५० वर्षांनी चिदम्बरम् यांना या मुद्यावर काँग्रेस आणि इंदिरा गांधींवर टीका करण्याची कोणती गरज होती? ते कोणत्या गोष्टीमुळे विवश झाले, असा प्रश्न काँग्रेसचे नेते आणि माजी राज्यसभा सदस्य राशीद अल्वी यांनी उपस्थित केला.

पी. चिदम्बरम् भाजपा आणि पंतप्रधानांप्रमाणे बोलत आहेत, ही अत्यंत दु:खाची गोष्ट आहे. चिदम्बरम् यांच्या विरोधात न्यायालयात खटला सुरू आहे. त्यामुळे काँग्रेसवर हल्ला करावा, यासाठी त्यांच्यावर कोणता दबाव तर नव्हता, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**भाजपाचा घणाघात**

काँग्रेसने केलेल्या चुका कबूल करण्यासाठी पी. चिदम्बरम् यांनी खूप विलंब केला, असा घणाघात केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी केला. मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिका आणि इतर विदेशी शक्तींच्या दबावामुळे भारत पाकिस्तानवर हल्ला करू शकला नाही, अशी कबुली चिदम्बरम् यांनी काही दिवसांपूर्वी दिल्याची आठवण रिजिजू यांनी करून दिली. आता चिदम्बरम् ऑपरेशन ब्ल्यू स्टार चुकीचे असल्याचे म्हणत आहेत. मात्र, त्यांनी खूप उशीर केल्याचे रिजिजू यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



विवाह या संकल्पनेवर आधारित राजस्थानच्या जयपूर येथे रविवारी आयोजित फॅशन शोमध्ये पारंपरिक राजस्थानी वेशभूषेत रॅम्पवर चालताना मॉडेल

# टीएलपी आंदोलक शिरले पाकिस्तानच्या राजधानीत

### रेल्वे, मेट्रोसेवा ठप्प ● संघर्षात मृत्यूचा आकडा २२ वर ● हिंसाचाराने शाहबाज सरकार अडचणीत





◆ **लाहोर, १२ ऑक्टोबर**

पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्याविरोधात पाकिस्तानच्या विविध शहरात चार दिवसांपासून सुरू असलेले तहरीक-ए-लब्बैक पाकिस्तान अर्थात् टीएलपीच्या नेतृत्वात सुरू असलेल्या आंदोलनाला सामान्य नागरिकांचा पाठिंबा वाढत आहे. त्यातच लष्कराचा वेढा फोडून आंदोलक इस्लामाबादची सीमा पार करीत शनिवारी रात्री शहरात शिरले. त्यांनी रेल्वे, मेट्रो इतर सेवा बंद पाडल्या आणि त्यांनी संसदेकडे जाण्याचा प्रयत्न केला.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, सुरक्षा दलासोबत झालेल्या संघर्षात आतापर्यंत २२ नागरिकांचा मृत्यू झाला असून, जखमींची संख्या १०० वर पोहोचली आहे. टीएलपीच्या आंदोलनाला आता इतर कट्टरपंथी संघटनांनी पाठिंबा दर्शवल्याने मुनीर आणि शरीफ यांच्या अडचणी वाढल्या आहे. लाहोरमधील मुलतानपासून सुरू झालेल्या टीएलपी प्रमुख साद रिझवी यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या आंदोलनाने संपूर्ण देश व्यापला आहे.

इस्लामाबाद शहराच्या सीमेवर लष्कराला तैनात करण्यात आले असताना टीएलपी आंदोलक शहरात दाखल झाले आणि त्यांनी धुडगूस घातला. शासकीय इमारती, रेल्वे आणि मेट्रो स्थानकावर त्यांनी निदर्शने केली. यतीम खाना चौक, चौबुर्जी, आझादी चौक आणि शाहदरा यासारख्या महत्त्वाच्या चौकांवर टीलपीचे समर्थकांनी जाळपोळ आणि तोडफोड केल्याने परिस्थिती चिघळली आहे. काही टीएलपी समर्थकांनी ऑरेंज लाईन मेट्रो ट्रॅक ताब्यात घेतले. त्यांनी सुरक्षा दलांवर दगडफेक केली, ज्यामध्ये अनेक पोलिस अधिकारी जखमी झाले.

**सरकारी वाहनांवर ताबा**

निदर्शकांनी लाहोर वेस्ट मॅनेजमेंट कंपनी आणि पंजाब पोलिसांच्या क्रेनसह सरकारी वाहनांवर ताबा मिळवला आहे. सुरक्षा दलाने गर्दी पांगवण्यासाठी अश्रुधुराचा मारा आणि गोळीबार करूनही आंदोलक मागे हटायला तयार नाहीत. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, संघर्षात आतापर्यंत ३० पेक्षा अधिक अधिकारी जखमी झाले. टीएलपीचा दावा आहे की, त्यांचेही अनेक कार्यकर्ते मारले गेले आणि जखमी झाले आहेत.

**११० कार्यकर्त्यांना पोलिस कोठडी**

लाहोरमधील दहशतवादविरोधी न्यायालयाने ११० टीएलपी कार्यकर्त्यांना १२ दिवसांसाठी पोलिस कोठडी सुनावली. त्यांच्यावर निषेधादरम्यान अधिकाऱ्यांवर हल्ला करण्याचा आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याचा आरोप आहे. नवानकोट पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरमध्ये या गटावर सुरक्षा कर्मचाऱ्यांवर गोळीबार आणि हिंसाचाराचा केल्याचा आरोप आहे. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशात १५ लष्करी अधिकाऱ्यांना अटक

### मानवतेविरुद्धचे कथित गुन्हे

◆ **ढाका, १२ ऑक्टोबर**

आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार बांगलादेश लष्कराने १५ सेवारत अधिकाऱ्यांना अटक केली. माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या कार्यकाळात मानवतेविरुद्धच्या कथित गुन्ह्यांसाठी या अधिकाऱ्यांची चौकशी सुरू आहे.

बांगलादेश लष्कराने निवेदनात म्हटले की, आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार १५ सेवारत अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली. मानवतेविरुद्धच्या कथित गुन्ह्याचा आरोपात त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. माजी पंतप्रधानांचे लष्करी सचिव म्हणून काम करणारे मेजर जनरल कबीर अहमद बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे.

आतापर्यंत कारवाई झालेल्या लष्करी अधिकाऱ्यांमध्ये दोन मेजर जनरल, सहा ब्रिगेडियर जनरल आणि कर्नल आणि लेफ्टनंट कर्नल यांचा समावेश आहे. लष्करी अधिकाऱ्यांवर नागरी किंवा लष्करी न्यायालयात खटला चालवला जाईल की नाही, यासंदर्भात अद्याप माहिती देण्यात आलेली नाही. माजी संरक्षण सल्लागार मेजर जनरल तारिक अहमद सिद्दीक हे देखील आरोपींमध्ये आहेत आणि ते फरार आहे. (वृत्तसंस्था)

# डॅन स्कॅव्हिनो व्हाईट हाऊसचे कार्मिक कार्यालय प्रमुख


**वॉशिंग्टन** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये राष्ट्राध्यक्षांच्या वैयक्तिक कार्यालयाच्या प्रमुखपदी डॅन स्कॅव्हिनो यांची नियुक्ती केली आहे. ट्रुथसोशल या समाज माध्यमांवरील पोस्टमध्ये अध्यक्ष ट्रम्प यांनी ही घोषणा केली. ट्रम्प प्रशासनाच्या प्रशासकीय टीमला बळकटी देण्यासाठी आणि पात्र व्यक्तींची नियुक्ती सुनिश्चित करण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

ट्रम्प प्रशासनात पूर्वी डेप्युटी चीफ ऑफ स्टाफ म्हणून काम केलेले डॅन स्कॅव्हिनो हे सर्जियो गोर यांची जागा घेतील. त्यांना अलीकडेच अमेरिकन सिनेटने भारतातील पुढील अमेरिकन राजदूत म्हणून मान्यता दिली आहे आणि ते सध्या सहा दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. हे जाहीर करताना आनंद होत आहे की, डॅन स्कॅव्हिनो, उर्वरित डेप्युटी चीफ ऑफ स्टाफ व्यतिरिक्त, व्हाईट हाऊस कार्मिक कार्यालयाचे नेतृत्व करतील. सर्जियो गोर यांनी या पदावर उत्तम काम केले आणि आता ते भारतात अमेरिकेचे राजदूत म्हणून काम करणार आहेत. ■

# मणिपूरमध्ये तीन बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ, १२ ऑक्टोबर**

मणिपूरच्या बिष्णुपूर आणि थौबल जिल्ह्यांमध्ये सुरक्षादलांनी बंदी घातलेल्या संघटनेच्या वेगवेगळ्या गटांशी संबंधित तीन बंडखोरांना अटक केली, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. शनिवारी बिष्णुपूर शहरात बंदी घातलेल्या कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टी (पीडब्ल्यूजी) च्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली. मोइरंगथेम मोहेन सिंह असे या बंडखोराचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून एक एसएम कार्बाइन, तीन मॅग्झिन्स आणि एके रायफलीची २४ काडतुसे जप्त करण्यात आली, असे पोलिसांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. शनिवारी थौबल जिल्ह्यातील यायरीपोक बाजार येथून प्रतिबंधित संघटना कांग्लेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या (अपुनबा) आणखी एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली. शुक्रवारी बिष्णुपूर जिल्ह्यातील ओम्बा हिल क्रॉसिंग परिसरातून केसीपी (तैयबांगनबा) संघटनेच्या एका बंडखोराला अटक करण्यात आली. हेस्नाम सनाथोई म्हणून ओळखला जाणारा तो मोइरंग भागात जनतेकडून खंडणी वसूल करण्यात सहभागी होता. (वृत्तसंस्था)



बीएसएफ एअर विंगच्या पहिल्या महिला फ्लाईट इंजिनीअर म्हणून इन्स्पेक्टर भावना चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली. दिल्ली येथील कार्यालयात बीएसएफचे महासंचालक दलजित सिंह चौधरी यांनी त्यांना फ्लाईंग बॅज प्रदान केला. त्यांनी दोन महिन्यांत १३० तासांचे प्रशिक्षण पूर्ण केले आह

# बंगाल नगरपालिका भरती घोटाळाप्रकरणी ईडीचे छापे

◆ **कोलकाता, १२ ऑक्टोबर**

पश्चिम बंगालमधील दक्षिण डमडम नगरपालिकेत भरतीतील घोटाळाप्रकरणी टाकलेल्या छाप्यांमध्ये अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) ४५ लाख रुपयांची बेहिशेबी रोख, गुन्हेगारी कागदपत्रे व डिजिटल उपकरणे जप्त केली आहेत.

घोटाळ्याच्या चौकशीच्या संदर्भात शुक्रवारी एजन्सीच्या कोलकाता क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी कोलकाता आणि जवळपासच्या १३ ठिकाणी छापे टाकले, यात पश्चिम बंगालचे अग्निशमन मंत्री सुजित बोस यांचे निवासस्थान आणि कंपनीचा समावेश आहे.

तपासादरम्यान, मालमत्ता, डिजिटल उपकरणे व ४५ लाख रुपयांच्या बेहिशेबी रोख रकमेसह विविध गुन्हेगारी कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत, असे ईडीने निवेदनात म्हटले आहे.

ईडीच्या पथकांनी शुक्रवारी मंत्र्यांचे साल्ट लेक येथील निवासस्थान व कार्यालय, नागरबाजार परिसरातील नगरसेवकाचे घर आणि दक्षिण डमडम नगरपालिकेच्या माजी अधिकाऱ्यांच्या घरांवर छापे टाकले.ईडीने विधानसभा निवडणुकीपूर्वी आपल्याला राजकीयदृष्ट्या लक्ष्य केले आहे, असा आरोप बोस यांनी केला आहे. ईडीने यापूर्वी माझ्या मालमत्तेवर छापे टाकले आहेत व त्यांना माझ्याविरुद्ध काहीही दोषी आढळले नाही. निवडणुकीपूर्वी दबाव आणण्याची ही एक रणनीती आहे, असेही बोस म्हणाले. (वृत्तसंस्था)

# तस्कराला अटक, कोट्यवधींचे सोने जप्त

◆ **कोलकाता, १२ ऑक्टोबर**

सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) जवानांनी पश्चिम बंगालच्या नादिया जिल्ह्यातील भारत-बांगलादेश सीमेजवळ एका तस्कराला अटक केली व त्याच्या ताब्यातून २० किलो सोन्याची बिस्किटे जप्त केली.

होरांडीपूर बीओपी येथे तैनात असलेल्या बीएसएफ ३२ बटालियनला विश्वासार्ह गुप्त माहिती मिळाली की, सीमेजवळील मुस्लिमपारा गावातील एक भारतीय नागरिक होरांडीपूर परिसरातून बांगलादेशातून सोन्याची तस्करी करणार आहे. ही माहिती मिळताच कर्तव्यावर असलेल्या जवानांना सतर्क करण्यात आले, असे निमलष्करी दलाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. शनिवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास बीएसएफ जवानांना एका व्यक्तीला बांबूच्या दाट जंगलामागे फिरताना पाहिले. त्याला ताबडतोब घेरण्यात आले आणि अटक करण्यात आली. त्याची झडती घेतल्यानंतर त्याच्याकडून एक प्लास्टिक पॅकेट जप्त करण्यात आले व ते उघडल्यावर त्यात सुमारे २.८२ कोटी रुपये किमतीचे २० सोन्याचे बिस्किटे आढळले, असे निवेदनात म्हटले आहे. तस्कराला पुढील चौकशीसाठी होरांडीपूर बीओपी येथे आणण्यात आले. जप्त केलेले सोन्याचे बिस्किट व अटकेतील तस्कराला पुढील कायदेशीर कारवाईसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आले, असे निवेदनात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### ‘ड्रीमलायनर’ची तपासणी करून अहवाल सादर करा

**नवी दिल्ली** : वैमानिक संघटनेने बोईंग ७८७ ड्रीमलायनर या प्रवासी विमानातील तांत्रिक त्रुटीच्या आक्षेपाची दखल घेत नागरी विमान वाहतूक महासंचालनालय अर्थात डीजीसीएने एअर इंडिया आणि बोईंग कंपनीला पत्र पाठवत या विमानांची तपासणी करून अहवाल सादर करण्याचा निर्देश दिला.

डीजीसीएने पाठविलेल्या पत्रात म्हटले की, सर्व बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमानांमधील रॅम एअर टर्बाइन, पॉवर कंडिशनिंग मॉड्युलमध्ये अनेक त्रुटी असल्याचे नुकत्याच झालेल्या तांत्रिक बिघाडातून समोर आले. ■



रा. स्व. संघाच्या शतकपूर्ती उत्सवानिमित्त बंगळुरू येथील स्वयंसेवकांनी शहरात रविवारी पथसंचलन केले. यावेळी शिस्तीत उभे असलेले स्वयंसेवक

# इस्रायली ओलिसांची आजपासून मुक्तता

### हमास २० जिवंत, २८ मृतदेह सोपविणार



◆ **गाझा, १२ ऑक्टोबर**

गाझा युद्धबंदी कराराच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत दहशतवादी हमास संघटना सोमवारी सकाळी ४८ ओलिसांची सुटका करणार आहे. ज्यामध्ये २० जिवंत नागरिक आणि २८ मृतदेह इस्रायलकडे सुपूर्द करण्यात येईल. त्याचवेळी हमासने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जारी केलेल्या शांतता करारातील काही मुद्यांवर असमहती दर्शवली आहे. दुसरीकडे इस्रायली सैन्याने शनिवारपासून गाझातून माघारी परतण्यास सुरुवात केली आहे.

अमेरिकेचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ यांनी सांगितले की, हमास सोमवारपासून ओलिसांच्या मुक्तता करण्यास सुरुवात करणार आहे. त्यांना ७२ तासांत सर्व ओलिसांना इस्रायलला सोपवायचे आहे. त्याचवेळी इस्रायल २००० पॅलेस्टिनी कैद्यांना मुक्त करणार आहे. रेडक्रॉसची आंतरराष्ट्रीय समिती या देवाणघेवाणीचे निरीक्षण करेल.

ट्रम्प सकाळी ९:२० वाजता इजिप्तच्या बेन गुरियन विमानतळावर उतरतील आणि ते नेसेटमध्ये संसदेला संबोधित करतील. त्यापूर्वी ते पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांची भेट घेणार आहे. त्यानंतर ते सोमवारी इजिप्तमधील शर्म अल शेख येथे होणाऱ्या शांतता शिखर परिषदेलाही उपस्थित राहणार आहेत. (वृत्तसंस्था)

### शस्त्र समर्पणाला विरोध : होसम बद्रान

हमासने सोमवारी इजिप्तमध्ये होणाऱ्या गाझा शांतता शिखर परिषदेच्या अधिकृत स्वाक्षरी समारंभाला उपस्थित राहण्यास नकार दिला आहे. हमासचे वरिष्ठ नेते होसम बद्रान म्हणाले की, ते कराराच्या काही मुद्यांवर असहमत आहेत. आम्हाला आमच्यात भूमीतून बाहेर काढणे हास्यास्पद आहे. कराराच्या दुसऱ्या टप्प्यातील वाटाघाटी गुंतागुंतीच्या आणि कठीण आहे. गाझामध्ये सत्ता सोडली तरी नि:शस्त्रीकरण केले जाणार नाही. ■

### एसटी कर्मचाऱ्यांचे आजपासून बेमुदत आंदोलन



**मुंबई** : एसटी कर्मचाऱ्यांची प्रलंबित चार हजार कोटींची थकबाकी तातडीने द्यावी, या मागणीसाठी सोमवारपासून महाराष्ट्र एसटी कामगार संघटना कृती समितीने बेमुदत ठिय्या आंदोलनाची घोषणा केली आहे. आंदोलनात १८ संघटनांचा समावेश असणार आहे. आझाद मैदानावर धरणे आंदोलनाची सुरुवात करण्यात येणार असून, तोडगा न निघाल्यास संपावर जाण्याचा इशारा कृती समितीचे पदाधिकारी हनुमंत ताटे यांनी रविवारी पत्रपरिषदेतून दिला. दिवाळी तोंडावर प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीची बैठक बोलावली आहे. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची उपस्थिती राहणार आहे. ■

# गाझा शांतता शिखर परिषदेसाठी पंतप्रधान मोदींना निमंत्रण

### ट्रम्प यांची घेणार भेट, व्यापार करारावर चर्चेची शक्यता

◆ **नवी दिल्ली, १२ ऑक्टोबर**

गाझात शांततेसाठी दहशतवादी हमास आणि इस्रायल यांच्यात अमेरिकेच्या मध्यस्थीने झालेल्या करारावर सोमवारी स्वाक्षरी होणार आहे. यासाठी इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष फराह अल-सिसी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गाझा शांतता करार स्वाक्षरी समारंभासाठी निमंत्रित केले आहे.

यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची उपस्थिती राहणार आहे. समारंभात मोदी आणि ट्रम्प यांची भेट होणार असून दोन्ही नेत्यांमध्ये प्रलंबित व्यापार करारावर चर्चा होण्याची शक्यता आहे. तथापि, पंतप्रधान मोदी इजिप्तला जाणार की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. शांतता शिखर परिषद आंतरराष्ट्रीय बैठकांसाठी प्रसिद्ध असलेल्या शर्म अल-शेख येथे होत आहे. ट्रम्प यांच्यासह जगभरातील २० नेते या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे. विशेष असे की, समारंभासाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी परराष्ट्र राज्यमंत्री कीर्तिवर्धन सिंह इजिप्तला जाणार असल्याच्या वृत्ताला भारताने आधीच दुजोरा दिला आहे. शनिवारी इजिप्तच्या राष्ट्राध्यक्षांनी मोदी यांच्याशी फोनवर संवाद साधत त्यांना सोमवारी होणाऱ्या गाझा शांतता करार स्वाक्षरी समारंभात येण्याची विनंती केली. त्यामुळे पंतप्रधान या कार्यक्रमाला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, भारताने नेहमीच शांतता आणि संयमाला पाठिंबा दिला आहे. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# तालिबानच्या विश्वासार्हतेचा मुद्दा

मुस्लिम जगतात युद्धे, लढाया, वांशिक संघर्ष, गृहयुद्धे आणि रक्तपात झाला नाही, असे एकही दशक २० व्या शतकात दृष्टिपथास पडणार नाही. पहिल्या महायुद्धात तुर्कस्तानचा दारुण पराभव झाल्यानंतर विजयी अमेरिका, ब्रिटनच्या नेतृत्वातील मित्र देशांनी विशाल अशा ऑटोमन साम्राज्याची शकले केली. पाश्चिमात्य देशांच्या या कृतीमुळे जगभरातील मुस्लिमांमध्ये संतापाची लाट उसळली. कधीकाळी शक्तिशाली असलेल्या ऑटोमन साम्राज्याचे तुकडे तुकडे झालेले पाहून खिलाफत चळवळीला प्रारंभ झाला. त्याचे पडसाद जगभर उमटले. हा कालखंड आणि भारताच्या फाळणीचा काळ वगळता १९२४ ते १९६० पर्यंत युरोप, मध्यपूर्व, दक्षिण आशिया आणि आफ्रिका खंडातील मुस्लिम देशांमध्ये बऱ्यापैकी शांतता नांदत होती. काबुल, तेहरान, बगदाद, सना या शहरांमध्ये पाश्चिमात्य संस्कृती रुळली होती. मुस्लिम जगतात अशांततेला प्रारंभ झाला तो पॅलेस्टाईन आणि इस्रायल यांच्यातील संघर्षाने. इस्लामिक दहशतवादाचा उदय येथूनच झाला. १९६७ मध्ये इस्रायल आणि अरब देशांमध्ये युद्धाचा भडका उडाला. १९७९ मध्ये इराणमध्ये धार्मिक क्रांती झाली, तर रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण केल्याने दीर्घकालीन संघर्षाला प्रारंभ झाला. दरम्यानच्या काळात १९६५ आणि १९७१ या काळात भारत-पाकिस्तान यांच्यात युद्ध भडकले होते. तिकडे इराणमध्ये पहेलवी घराण्याची सत्ता उलथून लावत सत्तेवर आलेल्या रुहुल्लाह खोमेनी यांनी शरियतचे कायदे लागू केले. १९८० मध्ये इराक-इराण यांच्यात लक्षावधी नागरिकांचे बळी घेणारे युद्ध सुरू झाले, जे आठ वर्षे चालले. मुस्लिम देशांमध्ये सुरू झालेले हे संघर्ष दहशतवादाच्या उदयाचा काळ ठरला. भारताचा शेजारी असलेल्या अफगाणिस्तानात तर गृहयुद्ध भडकले होते. रशियन आक्रमणाच्या विरोधात अमेरिका, पाकिस्तान आणि अरब देशांच्या मदतीने दहशतवाद्यांचे तांडेच्या तांडे तयार झाले. कंदहारमध्ये कट्टर जिहादी मानसिकता असलेल्या मुल्ला ऊर्फ मोहम्मद उमरने तालिबान संघटनेची स्थापना केली. थोड्याच काळात गुरिल्ला युद्धात निष्णात असलेल्या तालिबानने कंदहार, हेरतसह अर्ध्या अफगाणिस्तानवर नियंत्रण मिळविले.

या मोहिमांमध्ये तालिबानला पाकिस्तान, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात हे देश तर हक्कानी गट आणि ओसामा बिन लादेनच्या अल-कायदाचे मनुष्यबळ आणि आर्थिक सहकार्य मिळाले. काबुलवर चढाई करण्यापूर्वी कंदहार येथे मुल्ला उमरने बोलावलेल्या बैठकीत आयएसआय या पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. काबुल ताब्यात आल्यानंतर तालिबानचा वापर भारताविरोधात करण्याचा पाकिस्तानचा कुटिल डाव होता. पण, तसे काही घडले नाही. शस्त्रसज्जता झाल्यानंतर ऑगस्ट १९९६ मध्ये काबुलच्या दिशेने कूच करीत तालिबानने प्रथम जलालाबाद घेतले आणि काबुलला वेढा दिला. यावेळी अफगाणिस्तानचे अध्यक्ष मोहम्मद नजिबुल्लाह आणि त्यांच्या बंधूने युनोच्या दूतावासात आश्रय घेतला होता. पुढे तालिबानने काबुलवर ताबा मिळविला. नजिबुल्लाह आणि त्यांच्या भावाचे गोळ्यांनी चाळणी झालेले मृतदेह आढळून आले. तालिबान्यांनी क्रौर्याची सीमा पार करीत दोघांचे मृतदेह ट्रकला मागे बांधून काबुलच्या रस्त्यावरून फरफटत नेले. नंतर चौकात आणून विजेच्या खांबावर लटकविले. तालिबानच्या या कृत्याचा जगभरातून निषेध करण्यात आला. तालिबानच्या सत्तेला पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरात यांनी ताबडतोब अधिकृत मान्यता दिली. तर, अमेरिका, रशिया, भारत, इराण यांनी तालिबानला मान्यता दिली नाही. युनोनेही तालिबानला नाकारले. तेथे खरोखर महिला आणि मुलांचे जिणे नरकासमान झाले होते. तालिबानच्या आश्रयाने राहणाऱ्या ओसामा बिन लादेनने न्यू यॉर्कच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर भीषण दहशतवादी हल्ला चढविला. या हल्ल्याने जागतिक राजकारणाची दिशाच बदलून गेली. या हल्ल्याने अमेरिकेचे नाक कापले गेले. हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या आणि अफगाणिस्तानात लपलेल्या लादेनला सोपविण्याची मागणी अमेरिकेने केली. पण, अहंकारी मुल्ला उमरने ही मागणी फेटाळली. एक काळ असा होता की रशियाला शह देण्यासाठी तालिबानला अमेरिका आणि पाकिस्ताननेच पोसले. तीच तालिबान संघटना मुजोर झाली.

त्यानंतरच्या काळात अमेरिकेने हल्ला करून अवघ्या तीनच महिन्यांत तथाकथित तालिबानची इस्लामिक राजवट उलथून टाकली. मुल्ला उमर फरार झाला. पण, तालिबानने विरोध करणे सुरूच ठेवले. तब्बल दोन दशके अफगाणिस्तान गृहयुद्धात भरडला गेला. या काळात लक्षावधी नागरिकांचा मृत्यू झाला. दोन दशकांच्या संघर्षानंतरही काहीच ठोस हाती न लागल्याने अमेरिका, नाटोने अफगाणिस्तानातून काढता पाय घेतला. तालिबानला पुन्हा संधी मिळाली आणि मे २०२१ मध्ये पुन्हा एकदा तालिबान्यांनी काबुलच्या दिशेने कूच केले. अध्यक्ष अश्रफ गनी देश सोडून पळाले आणि तालिबानने काबुलचा ताबा घेतला.

हा काळ भारतासाठी कसोटीचा होता. गनी सरकारच्या काळात अफगाणिस्तानात भारताने अनेक विकास प्रकल्प हाती घेतले होते. रस्ते तयार करणे, रुग्णालये बांधणे आणि धरणांच्या निर्मितीपासून तर अगदी संसद भवन बांधून देण्याचे काम भारताने केले. तालिबान सत्तेवर येताच सर्वांत जास्त आनंद झाला तो पाकिस्तानला. भारत आता दोन्ही बाजूंनी ठेचला जाणार आणि अफगाणिस्तानात विविध प्रकल्पांवर कार्यरत असलेले अधिकारी, तज्ज्ञ, दूतावासातील अधिकारी मारले जाणार, या स्वप्नात आयएसआय आणि पाकिस्तानी लष्कर होते. काबुल तालिबानच्या ताब्यात आल्यानंतर भारतासाठी पहिल्या पाच-सहा महिन्यांचा काळ कसोटीचा होता. बोटावर मोजता येतील एवढेच शीख, हिंदू काबुलमध्ये उरले होते. जिवाच्या भीतीने तेही भारतात परतले. १९७० मध्ये अफगाणिस्तानात हिंदू आणि शिखांची संख्या दोन लाखांच्या आसपास होती. आज ती फक्त दोनशेच्या आसपास आहे. या पृष्ठभूमीवर २०१९ मध्ये भारताने ३७० कलम रद्द केल्याने पाकिस्तानचा तिळपापड झाला. तालिबान सरकार स्थिरस्थावर झाले की भारताविरोधात कारवाया करण्यासाठी अफगाणी भूमीचा उपयोग करायचा, असे मनसुबे पाकिस्तान आखत होता. पण, भारताने पारंपरिक परराष्ट्र नीतीत कालानुरूप बदल करताना वेट अ‍ॅण्ड वॉच धोरणाचा अवलंब केला. २०२३ पासून भारत-तालिबान यांच्यात पडद्याआड चर्चा सुरू झाली. नोव्हेंबर २०२४ मध्ये भारताचे राजनैतिक अधिकारी जे. पी. सिंग यांनी काबुलमध्ये अफगाणिस्तानचे कार्यकारी संरक्षण मंत्री मुल्ला मुहम्मद याकुब यांची भेट घेतली. हा याकुब म्हणजे तालिबानचा संस्थापक मुल्ला उमरचा पुत्र. जानेवारी २०२५ मध्ये परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दुबईत मुत्तकी यांची भेट घेतली होती. दरम्यान, भारताकडून अफगाणिस्तानला मदत सुरूच होती. गहू, औषधांचा पुरवठा करण्याबरोबरच भूकंप आला असता अफगाणिस्तानात मदत घेऊन पोहोचणारा भारत हा पहिला देश होता. त्यामुळे केवळ इस्लामच्या नावावर तालिबानचा भारताविरुद्ध वापर करण्याचे पाकिस्तानचे मनसुबे पार धुळीस मिळाले. ४० वर्षांपासून सुरू असलेल्या गृहयुद्धामुळे तेथील जनतेचे हाल झाले. भारताने गरजू अफगाणींना मदत करण्याचे धोरण सतत राबविले. २०२१ मध्ये काबुलमध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर भारताच्या भूमीवर पाय ठेवणारे अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री आमिर खान मुत्तकी हे पहिलेच तालिबानी नेते. अलिकडच्या सहा दिवसांच्या भेटीत त्यांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेण्याबरोबरच उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथील देवबंद मदरशालाही भेट दिली. तेथे त्यांनी भारताचे अफगाणिस्तानशी रुहानी (आत्मीय) संबंध असल्याचे विधान केले. १९९० पूर्वी अफगाणिस्तानातील विद्यार्थी, विचारवंत, धार्मिक नेते देवबंद येथे शिक्षणासाठी येत असत. येथील इस्लामिक विचार आणि शिक्षणाचा प्रसार अफगाणिस्तानात जाऊन करीत असत. पण, गृहयुद्धामुळे ते थांबले होते. मुत्तकी यांच्या भेटीनंतर दोन्ही देशांत पुन्हा धार्मिक आणि सांस्कृतिक संबंध स्थापित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. असे असले तरी भारतानेही अफगाणिस्तानच्या शासकांना मर्यादितच ठेवले आहे. भारताने अजूनही काबुलमधील तालिबान सरकारला मान्यता दिलेली नाही. परंतु, राजनैतिक चर्चा-भेटी सुरू झाल्या हे चांगले झाले. अर्थात, मूलतत्त्ववादी विचारांवर विश्वास असलेल्या तालिबानवर किती विश्वास ठेवायचा हे भारतालाही टप्प्याटप्प्याने ठरवत राहावे लागणार आहे हेच खरे.

---

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# खुदा मेहेरबान, तो..!

‘खुदा मेहेरबान, तो गधा पहेलवान’! ही म्हण पाकिस्तानसाठी बरोबर लागू ठरत आहे. पाकिस्तानची स्थिती काय आहे हे साऱ्या जगाला माहीत आहे. पण, सध्या पाकिस्तानवर ‘खुदा’ म्हणजे अमेरिका मेहेरबान आहे असे दिसते. चीनने पाकिस्तानला शस्त्रसज्ज करण्याचा जणू निर्धार केला असताना, आता अमेरिकाही यात सहभागी झाली आहे. अमेरिकेने पाकिस्तानला अत्याधुनिक अशी ‘ॲमराम’ जातीची प्रक्षेपणास्त्रे विकण्याचा निर्णय घेतला आहे. भारतासाठी हा निर्णय काहीसा धक्कादायक असा राहणार आहे. अमेरिकेच्या भारतविरोधी निर्णयात हा एक मोठा टप्पा मानला जातो. यासंदर्भात गदारोळ सुरू झाल्यानंतर अमेरिकेने एक स्पष्टीकरण देत असा नवा कोणताही निर्णय झाला नसल्याचे म्हटले आहे. याचा दुसरा अर्थ म्हणजे विद्यमान व्यवस्थेतच या प्रक्षेपणास्त्रांचा पुरवठा पाकिस्तानला केला जाणार आहे.

**रेथॉनचे उत्पादन** : अमेरिका युक्रेनला तोमहॉक प्रक्षेपणास्त्र देण्याबाबत विचार करीत असल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी प्रसारित झाले होते. तोमहॉकचे उत्पादन करणाऱ्या रेथॉन कंपनीने हे ॲमराम म्हणजे ॲडव्हान्स मीडियम रेंज एअर टू एअर मिसाईल तयार केले असून अमेरिकेने ते पाकिस्तानला विकत देण्याचा निर्णय घेतला आहे. तोमहॉकचे एक प्रक्षेपणास्त्र काही कोटींचे आहे तर ॲमराम हे प्रक्षेपणास्त्रही किमती असल्याचे मानले जाते.

**एफ-१६ साठी** : पाकिस्तानजवळ एफ-१६ जातीची ५२ विमाने आहेत. अमेरिकेने ही विमाने काही वर्षांपूर्वी पाकिस्तानला विकली आहेत. या विमानांची देखभाल करण्यासाठी फेब्रुवारी महिन्यात अमेरिकेने मोठी रक्कम मंजूर केली होती. आता ॲमराम विकण्याचा जणू बोनस या देशाला दिला जात आहे. ॲमराम प्रक्षेपणास्त्रे एफ- १६, एफ-२२ व एफ-३५ या तीन जातींच्या विमानांमध्ये वापरली जाऊ शकतात. यातील एफ-१६ विमान पाकिस्तानजवळ आहे.

**इतिहास बालाकोटचा** : २०१९ च्या बालाकोट संघर्षात पाकिस्तानने भारताचे मिग-२१ विमान पाडले होते, त्यासाठी एफ-१६ चा वापर करण्यात आला होता आणि ॲमरामच्या प्रक्षेपणास्त्राचा वापर करीत पाकिस्तानने भारताचे हे विमान पाडण्यात यश मिळविले होते. आता या प्रक्षेपणास्त्रांचा मोठा साठा पाकिस्तानला देण्याचा निर्णय अमेरिकेच्या सरंक्षण मंत्रालयाने घेतला असल्याचे अधिकृतपणे जाहीर करण्यात आले आहे.

**ऑपरेशन सिंदूर** : मे महिन्यात झालेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानने चिनी विमानांचा वापर केला होता. यात जेएफ-१० व जेएफ-१७ थंडर यांचा प्रामुख्याने समावेश होता. या विमानांमध्ये पीएल-१५ या प्रक्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला होता. या प्रक्षेपणास्त्रांची मारक क्षमता १५० किलोमीटरची असली तरी चीनने स्वत:साठी विकसित केलेले ३०० किलोमीटर मारक क्षमता असलेले प्रक्षेपणास्त्र पाकिस्तानला दिले होते. त्याचाच वापर त्याने भारताच्या विरोधात केला होता असे म्हटले जाते. मात्र ही प्रक्षेपणास्त्रे एफ-१६ जातीच्या विमानात वापरली जाऊ शकत नाहीत. पाकिस्तानने ही बाब लक्षात घेत अमेरिकेकडे ॲमराम प्रक्षेपणास्त्रांची याचना केली होती असे म्हटले जाते. यासाठी पाकिस्तानचे हवाई दल प्रमुख बाबर सिद्धू यांनी जुलै महिन्यात अमेरिकेला भेट दिली. आता त्यांच्या मागणीनुसार ॲमराम प्रक्षेपणास्त्रे पाकिस्तानला विकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रक्षेपणास्त्रांची मारक क्षमता १६० किलोमीटर असल्याचे मानले जाते.

**फायर अ‍ॅण्ड फरगेट** : फायर अ‍ॅण्ड फरगेट हे या प्रक्षेपणास्त्राचे वैशिष्ट्य मानले जाते. वैमानिक हे प्रक्षेपणास्त्र सोडून नंतर दुसरीकडे लक्ष देऊ शकतो. आणि मग या प्रक्षेपणास्त्रात असलेले रडार त्याला त्याच्या नियोजित लक्ष्यावर घेऊन जाते. अचूक नेम धरण्यासाठी ते प्रसिद्ध आहे. अमेरिकेच्या या निर्णयाने पाकिस्तानला भारताविरोधात मुजोरी करण्यात ताकद मिळणार आहे. किंबहुना त्यासाठीच त्याला हे प्रक्षेपणास्त्र विकण्याचा निर्णय ट्रम्प प्रशासनाने घेतला असल्याचे मानले जाते. ट्रम्प यांनी एकापाठोपाठ एक असे भारतविरोधी निर्णय घेण्याचा सपाटा लावला आहे.

**तोमहॉक आणि ॲमराम** : अमेरिका युक्रेनला तोमहॉक हे लांब पल्ला असणारे प्रक्षेपणास्त्र देण्याबाबत विचार करीत आहे. याचा वापर रशियाविरुद्ध केला जाणार हे स्पष्ट आहे. तसेच पाकिस्तानला दिले जाणारे ॲमराम प्रक्षेपणास्त्र भारताविरोधात वापरण्यासाठी दिले जात आहे हेही स्पष्ट आहे. आम्ही ही विमाने पाकिस्तानला स्वसंरक्षार्थ दिली हे अमेरिका सांगत होती, तरी बालाकोट युद्धात एफ-१६ चा वापर भारताविरोधात झाला हे सर्वांना माहीत आहे. आता ॲमरामचा वापर भारताविरोधात केला जाणार नाही हे अमेरिकेने पुढे मागे सांगितले तरी त्यांचा वापर भारताच्या विरोधातच होणार हे ठरले आहे.

**भारतासमोरील पर्याय** : चीन व अमेरिका या दोन्ही देशांनी पाकिस्तानला जणू शस्त्रसज्ज करण्याचा निर्णय घेतला असल्यासारखे दिसत असताना भारताजवळ रशिया वा फ्रान्स यांच्याकडून अत्याधुनिक लढाऊ विमाने विकत घेण्याचा पर्याय शिल्लक राहणार आहे. रशियाचे सुखोई-५७ हे लढाऊ विमान अमेरिकेच्या एफ-१६ विमानाच्या बरोबरीचे मानले जाते. मात्र हे विमान खरेदी करण्याच्या वाटाघाटीत काही समस्या असल्याचे म्हटले जाते. फ्रान्सकडून रफाल विमाने घेण्याचा निर्णय भारताने अगोदरच घेतला आहे. याला रशियाच्या सुखोई-५७ जातीच्या विमानाची साथ मिळाल्यास भारताची हवाई मारक क्षमता निश्चितच वाढेल असे समजते. मात्र या विमानाचे तंत्रज्ञान भारताला देण्यास रशिया तयार नसल्याचे मानले जाते.

**चिनॉकला उत्तर** : केवळ दोन महिन्यांपूर्वी ऑगस्ट महिन्यात पाकिस्तानने झेड-१० एमई जातीचे लढाऊ हेलिकॉप्टर आपल्या ताफ्यात सामील करण्याचा निर्णय घेतला व तो लागू केला. भारताने अमेरिकेकडून घेतलेले चिनॉक हे लढाऊ हेलिकॉप्टर आपल्या लष्करात सामील केले आहे. त्याला उत्तर म्हणून पाकिस्तानने हे हेलिकॉप्टर आपल्या ताफ्यात सामील केले आहे. पाकिस्तानला चीनकडून हे हेलिकॉप्टर मिळाले असावे असे मानले जाते. कारण, पाकिस्तानजवळ स्वत: ते विकसित करण्याची क्षमता नाही. मात्र, अमेरिका व चीन या दोन्ही देशांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्रांनी सुसज्ज करून टाकले आहे यात शंकाच नाही.

**चवथा- ‘ए’** : पाकिस्तानचे अस्तित्व अल्ला, आर्मी व अमेरिका या तीन ‘ए’वर असल्याचे म्हटले जात असे, ते पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. त्यात आणखी एका ‘ए’ची भर पडली आहे. नवा ए- म्हणजे ॲमराम.

**आणि बगराम** : ॲमरामप्रमाणेच चर्चा सुरू आहे ती अफगाणिस्तानातील बगराम हवाई तळाची. चीनच्या सीमेपासून १०० किलोमीटरवर असलेला बगराम हवाई तळ अमेरिकेने काही वर्षांपूर्वी उभारला होता, तो परत मिळविण्याचा प्रयत्न राष्ट्रपती ट्रम्प करीत असताना, भारतासह काही देशांनी अमेरिकेच्या या प्रयत्नांना विरोध दर्शविला आहे. वास्तविक बगराम हवाई तळ अमेरिकेला परत मिळणे भारताच्या हिताचे मानले जाते. याने अमेरिका व चीन यांच्यातील तणाव अधिक वाढला असता. अमेरिका व पाकिस्तान संबंधातही कटुता तयार झाली असती. भारताने या वादापासून दूरच राहावयास हवे होते असे मानले जात असताना, भारतानानेही आपला विरोध नोंदविला आहे. याने तालिबान राजवट सुखावणार असली तरी या राजवटीवर कोणताही विश्वास ठेवता येणार नाही असा तालिबानचा इतिहास आहे. बगराम आणि ॲमराम दोन्ही अमेरिकेचे. एक हवाई तळ आणि दुसरे हवाई प्रक्षेपणास्त्र. भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान या त्रिकोणात बगराम आणि ॲमरामचा कसा व किती प्रभाव पडतो हे लवकरच दिसणार आहे.

---

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# भारतीय मानसिक आरोग्याचे तत्त्वज्ञान

नुकताच १० ऑक्टोबरला ‘‘वर्ल्ड मेंटल हेल्थ डे’’ जागतिक मानसिक आरोग्य दिवस साजरा करण्यात आलेला आहे. ज्या देशांमध्ये हा मानसिक आरोग्य दिवस साजरा करण्यात आला, त्यांची विचारसरणी ही मानवाला शरीर मानणारी आहे. परंतु, आपल्या ऋषिमुनींनी मनुष्याच्या शरीराचा विचार करताना त्याच्या मन, बुद्धी, भावना यांचाही सुद्धा विचार केलेला आहे. आमच्या ऋषिमुनींना हे माहीत होते की, मनुष्य म्हणजे शरीर, मन, बुद्धी, भावना आहे. त्यामुळे या सर्वांचेच संतुलन आरोग्यासाठी आवश्यक आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी सुद्धा जे ‘‘एकात्म मानव दर्शन’’ सांगितले आहे, त्यामध्ये सुद्धा मनुष्याच्या शरीर, मन, बुद्धी आणि भावना यांचा विचार करण्यास सांगितलेले आहे. मनुष्य म्हणजे जर शरीर असेल, तर शरीराला अन्न, वस्त्र, निवारा या त्याच्या मूलभूत गरजा दिल्यास तो आनंदी आणि स्वस्थ राहायला पाहिजे. परंतु, असे होताना दिसत नाही. आज सरकार दोन रुपये किलो तांदूळ देते की, जेणेकरून कोणीही उपाशी राहू नये. त्याचे पोट भरले पाहिजे. राहायला घर बांधून देते, घरकूल देते, सरकारी इस्पितळांमध्ये नि:शुल्क उपचारांची व्यवस्था केली जाते. अनेक संस्था नि:शुल्क कपड्यांचे वाटप सुद्धा करतात. मनुष्याला ढोबळमानाने शरीर मानून त्याला आनंदी करण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू असतात. परंतु, ज्यांच्याजवळ हे सर्व आहे म्हणजे राहायला घर आहे, घालायला कपडे आहेत, खायला उत्तम अन्न आहे असे सर्वच लोक आनंदी आहेत का? त्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम आहे का? तर असे लक्षात येते की, अशाही लोकांच्या जीवनात आनंद नाही, मानसिक शांती नाही, सुख-समाधान नाही. एखादा गरीब माणूस सुद्धा आनंदी राहू शकतो आणि एखादा श्रीमंत माणूस सुद्धा दु:खी राहू शकतो. आनंद हा पैशाने विकत मिळाला असता, तर भारतातील आणि जगातील सर्व पैसेवाले लोक आनंदी राहिले असते. परंतु, एखादी व्यक्ती झोपडीत सुद्धा आनंदी असू शकते आणि एखादा मनुष्य महालात बसून सुद्धा दु:खी राहू शकतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी म्हटले आहे ‘‘राजास जी महाली सौख्ये कधी मिळाली, ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या.’’ संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे ‘‘मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण’’, ‘‘छोटे मनसे कोई बडा नहीं होता, और हारे मनसे कोई खडा नहीं होता.’’

भारतीय संस्कृतीने फक्त आध्यात्मिक तत्त्वज्ञानच नव्हे, तर मानसिक संतुलन आणि आंतरिक शांती देणारी जीवनपद्धती सुद्धा दिलेली आहे. पाश्चिमात्य मानसशास्त्रात जे आज मानसिक आरोग्य (मेंटल हेल्थ) म्हणून ओळखले जाते, ते आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये हजारो वर्षांपूर्वी स्पष्ट केले गेले आहे. आयुर्वेदामध्ये सांगितले आहे की-



**‘‘प्रसन्नात्मेन्द्रियमन: स्वस्थ इत्यभिधीयते’’ (सुश्रुत संहिता)**

म्हणजे शरीर, इंद्रिये, मन आणि आत्मा प्रसन्न असतील, तरच मनुष्य खरोखर ‘स्वस्थ’ असतो. हेच मानसिक आरोग्याचे खरे लक्षण आहे. भगवद्गीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात,‘‘समत्वं योग उच्यते.’’ समत्वभाव म्हणजे आनंद-दु:ख, लाभ-हानी, यश-अपयश यात मन स्थिर ठेवणे. आजच्या काळातील ‘‘तणावाचे व्यवस्थापन’’ (स्ट्रेस मॅनेजमेंट) म्हणजे गीतेतील हाच समत्वभाव होय. पतंजलींच्या योगसूत्रानुसार, ‘‘योगश्चित्तवृत्ती निरोध:.’’ मनातील अस्थिर विचारांचे नियंत्रण म्हणजे योग. ध्यान, प्राणायाम आणि आसन या साधनांनी मनाला शांती व स्थैर्य मिळते. उपनिषदात सांगितले आहे की ‘‘मन: प्रसादो धर्म:,’’ म्हणजे मनाचा प्रसन्नभाव म्हणजे धर्म आणि सुखाचे मूळ होय.

‘‘सत्य असत्यासी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता’’ आज समाजामध्ये वावरताना अनेक ठिकाणी सत्याशी तडजोड करावी लागते. त्यामुळे मनामध्ये अस्थिरता, असंतोष निर्माण होतो. नोकरी, कार्यालयामध्ये काम करीत असताना साहेबांनी एखादी चुकीची गोष्ट म्हटली, तरी आपल्याला मान डोलवावी लागते. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. त्यामुळे, जे मोठे अधिकारी आहेत, ते जे काही बोलतील, त्याला सत्य म्हणावे लागते. ज्ञान असूनही त्याचा उपयोग नाही, कला असूनही त्याचा उपयोग नाही. अशीही परिस्थिती असते. त्यामुळे व्यक्तीच्या मनामध्ये उद्वेग, निराशा, चिंता निर्माण होते. मानसिक अस्वस्थतेचे हेच मूळ कारण आहे. या अस्वस्थतेमुळे जगातील लाखो लोकांना झोप येत नाही. त्यांना झोपेच्या गोळ्या घ्याव्या लागतात. पश्चिमात्य विचारसरणी मनुष्याला शरीर मानते. समजा एखादा मनुष्य असेल, त्याला गुलाबजाम आवडत असेल, तर त्याला म्हटलं की, या खोलीत तू बस, तुला खव्याचे स्वादिष्ट गुलाबजाम खायला घालतो, फक्त अट एकच आहे, की मी तुला या खोलीतच कोंडून ठेवीन, तुला बाहेर जाऊ देणार नाही, तर थोड्या वेळाने आपण बंदिस्त आहोत, कोंडलेले आहोत, आपले स्वातंत्र्य हिरावून घेतलेले आहे, या भावनेने त्याचे मन दुखेल व त्याला दिलेला गुलाबजाम त्याला बेचव वाटायला लागेल. माणूस म्हणजे काही जनावर नाही की ज्याला दोन रट्टे मारल्यावर, सुद्धा त्याच्या समोर जे ठेवले आहे, ते तो नि:शंकपणे खात राहील. कारण आपण जगण्यासाठी खातो, खाण्यासाठी जगत नाही.

चांद्रयान-३ मध्ये आपण पाहिले की शेकडो शास्त्रज्ञ, कर्मचारी डोळ्यात प्राण आणून विक्रम रोव्हर चंद्रावर उतरतो की नाही, याची प्रतीक्षा करीत होते. हे सर्व करीत असताना, त्यांनी अनेक दिवस १६ तासांपेक्षा अधिक काम केले होते. त्यांना त्यांच्या तहान-भुकेची जाणीव नव्हती. फक्त त्यांच्यासमोर एकच ध्येय होते चांद्रयान-३ चे चंद्राच्या पृठभागावर उतरणे. यावरून असे लक्षात येईल, की तहान-भुकेच्या पलीकडे सुद्धा काही गोष्टी असतात. जीवनाची सार्थकता हा सुद्धा भारतीय संस्कृतीने दिलेला विचार आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, अमेरिकेतल्या एखाद्या शेतकऱ्याला सांगितले की, अमुक एका पहाडावर खूप मोठ्या प्रमाणावर सोने आढळते. तर तो कदाचित तेवढा पहाड चढून जाईल. परंतु, त्याला सांगितले की, त्या पहाडावर एखादा मोठा सिद्धी प्राप्त तपस्वी तपश्चर्या करीत बसलेला आहे, तर तू त्याच्या दर्शनासाठी जातोस का? कदाचित तो जाणार नाही. परंतु, तेच जर एखाद्या भारतीय शेतकऱ्याला सांगितले, तर तो म्हणेल एवढ्या मोठ्या पहाडावर जाऊन सोने आणण्यापेक्षा, मी तर माझ्या शेतातच सोने उगवू शकतो. परंतु, त्या तपस्वी साधूच्या दर्शनासाठी मात्र मी नक्कीच जाईन. त्याच्या दर्शनाने, मार्गदर्शनाने माझ्या जीवनाचे सोने नक्कीच होईल. पाश्चिमात्य आणि भारतीय विचारसरणीचा हा फरक आहे. शाळांमध्ये शिकणाऱ्या छोट्या मुलांपासून, तर कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या नोकरदारांपर्यंत सर्वांनाच आता मानसिक चिंता, भय, तणाव, अनिद्रा यांचा सामना करावा लागत आहे. अशा सर्व परिस्थितीत द्वेष आणि मत्सर यांचा त्याग करणे, मनामध्ये समाधान ठेवणे, जे पाहिजे त्यासाठी प्रयत्न करणे, परंतु यश आणि अपयश हे ईश्वरावर सोडून देणे आवश्यक आहे. ‘‘मानसिक आरोग्य हा वैश्विक मानवी अधिकार आहे’’ ही २०२५ यावर्षीची मानसिक आरोग्याची संकल्पना आहे. अशा परिस्थितीत भारतीय तत्त्वज्ञान, आमचे धर्मग्रंथ यांचा आधार घेतल्यास व त्याप्रमाणे जीवनरचना केल्यास, भारतालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला मानसिक आरोग्य लाभू शकेल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

---

## वेध

**अनिल फेकरीकर**

# तस्करीतील वाहन कायम जप्त व्हावे!

झटपट श्रीमंत व्हायचे असेल तर तस्करी करावीच लागेल, अशाच स्वरूपाचा फॉर्म्युला बहुतांश लोकांनी स्वीकारला आहे. तस्करीमुळे मूठभर गुन्हेगारांच्या समूहाचा फायदा होत असला तरी बहुसंख्य लोकांचे दूरगामी नुकसान यात आहे. मात्र त्याची पर्वा कुणालाही नाही. प्रत्येक जण केवळ स्वत:चा विचार करून मोकळा होत आहे. यामुळे खरोखरच राष्ट्राची प्रगती होईल का, याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. नागपूर जिल्ह्याचा अभ्यास करता सुगंधित तंबाखूची तस्करी, गोधनाची तस्करी, रेतीची तस्करी सुरूच आहे. आता या तस्करीवर आळा बसावा, असे अनेकांना मनापासून वाटते. पण कायदा आडवा येतो. महाराष्ट्रात सुगंधित तंबाखूवर शासनाने प्रतिबंध लावला आहे. मात्र मध्यप्रदेशात हाच सुगंधित तंबाखू खुलेआम विकला जातो. परिणामी नागपुरात सुगंधित तंबाखू हा पूर्णत: मध्यप्रदेशातून तस्करीच्या रूपाने आयात केला जातो. यात झारीतील शुक्राचार्यांचाही सहभाग असतोच. पण त्या सुगंधित तंबाखूचे सेवन करणारे तर आपले मरण जवळ करीत आहे ना, त्याचे काय? शिवाय महाराष्ट्रात गोहत्या बंदी कायदाही लागू आहे. पण तिथेही कायद्यातील पळवाटा आडव्या येतात. परिणामी गाईंना पकडून गोशाळेत टाकतात आणि वाहन सुपूर्द नाम्यावर सोडतात. पुन्हा तेच वाहन गोधनाच्या तस्करीसाठी वापरले जाते. तस्करी ही राष्ट्रविरोधी कृती आहे. म्हणून तस्करी रोखण्यासाठी प्रशासनाला काही कठोर निर्णय घ्यावे लागतील. त्यानुसार कुठल्याही तस्करीत वापरले जाणारे चारचाकी वाहन कायम सरकार दरबारी जप्त करून त्यांचा तीन महिन्यांच्या आत लिलाव केला जावा. त्यातून जो काही पैसा येईल, त्याचा उपयोग गोशाळेतील चारा पाण्यावर खर्च केला जावा. जेव्हा अशी कृती युद्धपातळीवर सुरू होईल तेव्हा तस्करी करण्याचे स्वप्नही गुन्हेगार पाहणार नाहीत. पण वर्तमान परिस्थिती खूपच विचित्र आहे. गाईंना पकडून गोशाळेत टाकले जाते, गुन्हेगारांना अटक करून त्यांनाही तातडीने कोर्टाच्या आदेशाने जामिनावर सोडले जाते अन् वाहन दोन चार आठ दिवस ठेवत सुपूर्दनाम्यावर दिले जाते. आता त्या तस्करांचे काय बिघडले, ते तर पुन्हा अधिक प्रमाणात हे झालेले नुकसान भरून काढतात. म्हणूनच गुन्हेगार म्हणतात, ‘आज जेल, कल बेल और परसो फिरसे खेल’ हा असुरी आनंद व्यक्त करून ते प्रशासनाला आव्हानच देतात. हा सर्व प्रकार माणुसकीला आणि भूतदयेला काळिमा फासणारा आहे. पण कायद्यात तशी तरतूद असल्याने प्रामाणिक पोलिस काहीही करू शकत नाही. अशा सर्व स्थितीचा विचार करून आता विधिमंडळाने कायद्यातील पळवाटा दूर करून या महाराष्ट्रातून तस्करी हा प्रकारच संपविण्यासाठी एक पाऊल टाकावे.

मध्यप्रदेशातून सुगंधित तंबाखू आणि गोधनाची तस्करी नरखेड, काटोल, केळवद, सावनेर, खापा, खापरखेडा, पारशिवनी, देवलापार, रामटेकमार्गे नागपुरात केली जाते. नंतर त्यांची विल्हेवाट लावणारी कार्यक्षम यंत्रणा तातडीने कामाला लागते. या स्थितीत सज्जन म्हणवून घेणारे केवळ पाहण्याचेच काम करू शकतात. ही हतबलता आता थांबावी. संपूर्ण जग जैविक शेतीकडे वळले आहे. पण आपण क्षुल्लक लाभासाठी जैविक शेतीचा मूळ स्रोत गाईंनाच संपविण्याचा संकल्प सोडला की काय, अशीच कृती करीत आहोत. रसायनयुक्त कृषी उत्पादनामुळे घरोघरी कर्करोगाचे रुग्ण वाढत आहे. त्यावर जैविक शेती हा रामबाण उपाय आहे. पण आपल्याला कर्करोगाचे वाढलेले प्रमाण चालते, मात्र गोधनाची तस्करी रोखण्यासाठी कठोर कायदे करण्याची गरज वाटत नाही, असे का व्हावे यावरही चिंतन आवश्यक आहे. तस्करी कुठल्याही स्वरूपात असली तरी त्यात होणारी राष्ट्रहानी पाहता वापरले जाणारे वाहन कायम सरकार दरबारी जप्त करायलाच हवे. शिवाय त्यातील गुन्हेगारांना जामीन मिळणार नाही, अशीही तजवीज कठोरतेने करायला हवी. आज ग्रामीण भागातील गोधन संपल्यात जमा आहे. हळूहळू ते नामशेष होईल अन् पुढच्या पिढीला गाई पाहायच्या झाल्यास त्या चित्राच्या रूपात दाखवाव्या लागतील. वेगाने होत असलेली गाईंची कत्तल संपूर्ण मानवजातीसाठी कर्दनकाळ ठरली आहे. या समस्येकडे आता मानवीय भूमिकेतून पाहावे अन् रामबाण तोडगा काढावा, अशीच अपेक्षा.

९८२२४६८६६०

---

## वाचक पत्रे

### तरुणाईच्या बळावर महासत्ता होऊ शकतो?

जगाच्या केंद्रस्थानी सध्या जेन झी पिढी आहे. जेन झी म्हणजे झुमर्स. म्हणजे १९९७ ते २०१२ च्या दरम्यान जन्मलेली मुले-मुली. या पिढीने अनेक देशांमध्ये कसे सत्तांतर घडवले याच्या जोरदार चर्चा सुरू आहेत. त्यात कौतुकच जास्त केल्याचे आढळते. युवाशक्तीच्या बळावर कोणताही देश विकासाची स्वप्ने पाहू शकतो. भारत तर विश्वगुरू होण्याची महत्त्वाकांक्षा राखून आहे. तथापि वैचारिक परिपक्वतेअभावी आणि ते ज्यांना नेते मानतात त्यांचे प्रभावशाली नियंत्रण नसेल तर ही पिढी भरकटत जाण्याचा आणि त्यांनी छेडलेले कोणतेही आंदोलन दिशाहीन होण्याचा मोठा धोका कोणीही नाकारणार नाही. अशी पिढी रस्त्यावर उतरली तरी सरकारी मालमत्ता भक्ष्यस्थानी पडते, जी नागरिकांच्या करातून उभी राहते. नेपाळ हे त्याचे सध्याचे ज्वलंत उदाहरण आहे. काठमांडूचे महापौर बालेन यांनी, लोकांनी शांतता राखावी, असे आवाहन केले आहे. पण विध्वंस तर घडून गेला आहे. त्यामुळे आवाहन अर्थहीन ठरू शकेल. बालेन शाह यांनी नेपाळचे नेतृत्व करावे असे युवांना वाटते. नेपाळमधील युवांचा संताप अनाठायी नव्हता. पण आंदोलकांवर कोणाचेही नियंत्रण राहिले नव्हते, नेपाळच्या विध्वंसाचे जे वृत्त प्रसिद्ध होत आहे ते या अर्थाने कमालीचे अस्वस्थ करणारे आहे. शासकीय कार्यालयांसह अनेक पायाभूत सुविधा उद्ध्वस्त आहेत. तुरुंगातून कैदी फरार आहेत. नेपाळ हा देश विकासाच्या रांगेत किमान पन्नास वर्षे मागे गेला आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये.

आपल्या भारत देशातही समाजमाध्यमांवरील तथाकथित अनेक प्रभावकांची म्हणजे इन्फ्लुएन्सर्सची वैचारिक प्रगल्भता चर्चेचा मुद्दा ठरू शकतो. मग त्यांना मानणाऱ्यांकडून त्यापेक्षा वेगळी अपेक्षा करता येऊ शकेल का, हा प्रश्न निर्माण होतो. वैचारिक समाजच विकासाचा मार्ग प्रशस्त करीत असतो. भारत तर हा तरुणांचा देश मानला जातो आणि याच तरुणाईच्या बळावर महासत्ता होऊ शकेल अशी आशा सातत्याने व्यक्त होत असते. जेन झी पिढी ताकदवान आहे आणि ते बदल घडवू शकतात हे अनेक देशांमध्ये अधोरेखित झाले आहे. तो बदल नकारात्मक घडवायचा की सकारात्मक या प्रश्नाचे सक्रिय उत्तर सर्वांनी मिळून शोधायला पाहिजे आणि धडा नेपाळने घालून दिला असे म्हणणे सयुक्तिक ठरू शकेल.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### उत्साहात साजरी करूया दिवाळी

शरद ऋतूतील शारदीय नवरात्र, दसरा आणि कोजागरीचा उत्सव झाला की दिवाळीचे वेध लागलेले असतात. मुलांच्या सुट्या, बोनस, भेटवस्तू, फराळ, फटाके वगैरे गमतीचे भाग आपण साजरे करतोच परंतु महत्त्वाचा मुद्दा असा की, घराची साफसफाई, स्वच्छता ही परंपरा, आध्यात्मिक शुद्धीकरण, लक्ष्मीला अपेक्षित सुशोभित स्थानाची योजना, जुन्या निकामी गोष्टींचे विसर्जन, नवीन ऊर्जेला सकारात्मकतेचे कोंदण असणे नक्कीच गरजेचे आहे. त्यासाठी वास्तूच्या स्वच्छतेचा योजनापूर्वक आराखडा बनवून नवीन ऊर्जा प्रस्थापित करावी व या सणाच्या आनंदाचा उपभोग घ्यावा. पूरग्रस्त, गरिबांना मदत करून त्यांनाही आपल्या आनंदात सहभागी करावे कारण दीपावली म्हणजे फक्त दिवे हा विषय नसून मनाची व घराची शुद्धता असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

---

## आजचे संघगीत-११

सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५

### हिंदुत्वाच्या जये निनादित

हिंदुत्वाच्या जये निनादित पुनश्च भू-स्वर्लोक करा
नगरी, ग्रामी, जनी, काननी स्वत्वाचा आलोक भरा ॥

पुन्हा एकदा दाहि दिशांना चौ पुरुषार्थे व्याप्त करा
मनामनातुन दिव्य आपुली धर्मज्योत प्रदीप्त करा
क्षात्रबलाने दमवा दुर्जन, निर्भय अवघे लोक करा ॥

दीन, दरिद्री, गिरिजन, हरिजन अवघे अपुले बंधू रे
त्यांस्तव कैसे सुकले अपुल्या स्नेहरसाचे सिंधू रे?
जनगण हा तर प्राण आपुला पाचामधला एक खरा ॥

भिन्न असू द्या भाषा अपुली, भिन्न दिसू द्या वरचे वेष
भारत-भूचे पुत्र सर्वही, रंक असो वा असो धनेश
कोटि स्वरातुन एक गीतिका एकत्वाची मुखी धरा ॥

ज्या धर्माने लौकिकास या अलौकिकाचा स्पर्श दिला
अन् मनुजाच्या जीवनगीता मुक्तीचा स्वर सापडला
त्या धर्माची ध्वजा केशरी उंच नभी बिनधोक धरी ॥

गीत- **सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

## महत्वाचे...



### बिल्डर्स असोसिएशन सेंटरतर्फे चादर व ब्लँकेटचे वाटप

**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

बिल्डर्स असोसिएशन सेंटरच्या वतीने सीना नदीला पूर आलेल्या नदीकाठच्या पूरग्रस्त गावातील ग्रामस्थांना चादरी व ब्लँकेट, बिस्कीटचे वाटप केले. यावेळी ज्येष्ठ सदस्य दत्ता सुरवसे, संतोष कलकुटगी, अशोक गांधी, दत्तात्रय मुळे, मनोज म्हेत्रस, अमर बिराजदार, हणमंतु कुलकर्णी, सतीश बोरा उपस्थित होते.



### लोकमंगल पतसंस्थेच्या कुंभारी शाखेचा वर्धापन दिन साजरा

**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित कुंभारी शाखेच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सत्यनारायण महापूजन, नवरात्र निमित्त नवदुर्गा महिलांचा सन्मान तसेच बचतगटांचा मेळावा घेण्यात आला. कार्यक्रम ादरम्यान आरोग्य केंद्रातील सर्व आशा वर्कर व सीआरपी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विभागीय अधिकारी महिबुबी शेख, स्मिता सोनवणे, मीनाक्षी पाटील उपस्थित होते.




### सरस्वती गॅलक्सी गृहनिर्माण संस्थेच्या चेअरमपदी स्वामीराव माशाळे

**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

जुळे सोलापूर कोणार्क नगर येथील सरस्वती गॅलक्सी सह. गृहनिर्माण संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध करण्यात आली असून चेअरमनपदी स्वामीराव माशाळे यांची एकम ताने निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. राजेश देशपांडे यांनी काम पाहिले. निवडणुकीनंतर डॉ. प्रगती बागल यांच्या मार्गदर्शनाखाली प्राधिकृत अधिकारी ॲड. राजेश देशपांडे यांच्या उपस्थितीत संचालकांची बिनविरोध निवड करण्यात आली. सचिवपदी प्रमोद पैठणकर, खजिनदारपदी अनुप जोशी, संचालकपदी संजय कुलकर्णी, वैभव शिरशिकर, पल्लवी पैठणकर, अनिता अलकुंटे, रविंद्र दिवाण यांची निवड झाली. यावेळी चंद्रकांत कुलकर्णी, रविंद्र सरदेशमुख, मंजिती कुलकर्णी, ॲड. मकरंद कुलकर्णी, राजीव कट्टी, अंबादास म्हेत्रे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रमोद पैठणकर यांनी केले तर आभार रविंद्र दिवाण यांनी मानले.

### कांदे विक्री करणाऱ्या वृध्द महिलेस मारहाण; घोंगडे वस्ती भाजी मार्केटमधील घटना

**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

कांदे विकायला बसू नको या कारणावरून कांदे विक्रि करणाऱ्या वृध्द महिलेस मारहाण करणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना घोंगडे वस्ती भाजी मार्केटमध्ये घडली. याबाबत रतनबाई पांडूरंग गायकवाड (वय ६२, रा. भवानी पेठ, मड्डी वस्ती, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन मोहसिन तांबोळी याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी चारच्या सुमारास रतनबाई गायकवाड या घोंगडे वस्ती भाजी मार्केट येथे कांदे विक्रि करीत होत्या. त्यावेळी मोहसिन तांबोळी हा तिथे दारू पिऊन आला व त्याने रतनबाई यांना तू येथे कांदे विकायला बसू नको असे म्हणून शिवीगाळ करू लागला. त्यावेळी मोहसिन तांबोळी याने रतनबाई यांना शिवीगाळ करून गालावर चापटा मारून मारहाण केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार ओव्हळ पुढील तपास करीत आहेत.

### आजपासून जैन फेडरेशनचा दिवाळी फराळ महोत्सव

**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर -**

जैन सोशल फेडरेशनचा दिवाळी फराळ महोत्सव आणि श्री सुधा सागर एनएक्स दालनाचा संयुक्त उत्सव १३ ते २३ ऑक्टोबर दरम्यान आयोजित केला आहे. त्याचे उद्घाटन १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता डफरिन चौकातील सारस्वत ब्राह्मण मंगल कार्यालयात विद्यार्थी विकास योजनाचे मुख्य प्रवर्तक रवींद्र कर्वे (ठाणे) यांच्या हस्ते होईल. अध्यक्षपदी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी असतील. यावेळी डॉ. अश्विन वळसंगकर आणि ज्येष्ठ पत्रकार अरुण करमरकर हेही उपस्थित राहणार असल्याचे आयोजक पराग शहा यांनी सांगितले. यंदा या महोत्सवात पहिल्यांदाच ''श्री सुधा सागर एनएक्स'' हे आकर्षक दालन असून, घराच्या गरजांपासून सौंदर्यवर्धनापर्यंत सर्व वस्तूंचा खजिना येथे आहे. किचनसाठी नामांकित ब्रँड्सचे मिक्सर, ग्राइंडर, स्टील सेट, नॉन-स्टिक भांडी, तसेच पूजेचे साहित्य, गृहसजावटीच्या वस्तू, सौंदर्यप्रसाधने आणि स्वच्छतेसाठी लागणाऱ्या वस्तू हे सर्व ५० ते ६० टक्क्यांपर्यंत सवलतीच्या दरात ग्राहकांना उपलब्ध असतील.

# आज ठरणार जिल्हा परिषदेचा संभाव्य अध्यक्षपदाचा गट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर -**



जिल्ह्यातील ६८ जिल्हा परिषद गटांच्या आरक्षणाची सोडत जिल्हाधिकारी कार्यालयात आज सोमवारी १३ ऑक्टोबरला काढण्यात येणार आहे. या गटांच्या आरक्षणावरच जिल्हा परिषदेचा संभाव्य अध्यक्ष ठरणार आहे. त्यामुळे या सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर जिल्ह्यात ६८ जिल्हा परिषद गट आहेत. लोकसंख्या वाढीनुसार गटांची संख्या वाढणार होती, मात्र न्यायालयाने २०१७ च्या रचनेनुसार निवडणूक घेण्याचे आदेश दिल्याने ६८ गटातील सदस्य निवडले जाणार आहेत. जिल्हा परिषदेचा अध्यक्षपद ओबीसी सर्वसाधारण प्रवर्गासाठी असल्याने या सोडतीत ओबीसी सर्वसाधारण प्रवर्ग निघालेल्या मतदारसंघातीलच अध्यक्ष होण्याची शक्यता आहे . त्यासाठी सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांचे आरक्षणाकडे लक्ष लागले आहे. विधानसभा निवडणूकीत अनेक दिग्गजांचे पराभव झाल्याने त्यांचेही आरक्षणाकडे नजरा लागले आहेत.

### जय भारत शाळेत म. गांधी, लालबहदूर शास्त्री जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**



जय भारत प्राथमिक शाळेत राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थनी संस्थेचे अध्यक्ष सिद्राम फुले गुरुजी तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव दिपक फुले, मुख्याध्यापक नाराय सूर्यवंशी होते. कार्यक्रमाची सुरवात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमा पूजनेने झाली. सूत्रसंचालन किरण गाटे, प्रास्ताविक रेश्मा म्हेत्रे, आभार कविता लेंगरे यांनी मानले.



# छत्रपती शिवाजी प्रशालेत आंतर शालेय सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत ३२ शाळांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर -**

छत्रपती शिवाजी प्रशालेतील इंग्रजी विभागामार्फत आंतरवर्गीय व आंतरशालेय स्पर्धा पार पडल्या. प्रशालेमध्ये सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर प्रशालेम ध्ये आंतरवर्गीय व आंतरशालेय स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेतील ३२ शाळांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून शालिनी बटगिरी, श्रीमंतराजे भोसले, धनश्री विधाते, हरिष गरड, समता रजुलवार, किरण डोपरे यांनी काम पाहिले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन व उत्तेजणार्थ)**

**पाचवी व सहावी** :आश्लेषा जाधव,अमृता काळे व आराध्या उंबरे, ईश्वरी हंचाटे, व सृष्टी निकम तसेच उत्तेजनार्थ पूर्वा मोरे

**सातवी व आठवी** : कमलेश जोशी, रमा पिंपळनेरकर, श्रावणी चौगुले, सर्वज्ञा गाढवे

**नववी व दहावी** : वैष्णवी कलशेट्टी, श्राव्या देशपांडे, विश्वभारती अंधारे, अस्मिता मोरे.

बक्षीस वितरण सम ारंभाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संगमेश्वर महाविद्यालयाचे डॉ. प्रा. गणेश मुढेगावकर, शालेय समिती चेअरमन शिवदास चटके, विद्यापीठातील उमाकांत जाधव, कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, उपमुख्याध्यापक श्रीपाद जगदाळे, पर्यवेक्षक सुरेश जगताप, किरण देशमुख, राजीव गायकवाड उपस्थित होते. सूत्रसंचालन सुवर्णा पाटील यांनी केले तर आभार म ारुती घोडके यांनी मानले.



### ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे माजी विद्यार्थी विशाल धडके यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर -**

ए.जी.पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांच्या हस्ते महाविद्यालयातील माजी विद्यार्थी विशाल धडके यांचा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या इरिगेशन डिपार्टमेंटची अभियांत्रिकी परीक्षा त्याने उत्तीर्ण केली व सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून पाटबंधारे विभाग माळशिरस येथे रुजू झाला. त्यानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. विशाल याने स्थापत्य अभियांत्रिकी पदविका एस.इ.एस. तंत्रनिकेतन या कॉलेजमधून पूर्ण केले व त्यानंतर ए.जी. पाटील अभियांत्रिकी मधील स्थापत्य अभियांत्रिकी मधून पदवी शिक्षण पूर्ण केले. संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, ट्रस्टी शिवानंद पाटील, डॉ. एम. ए. चौगुले यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेण्यासाठी नेहमी प्रोत्साहन देत असतात.

### बंदेनवाज कोरबू यांची तालुकाध्यक्षपदी फेरनिवड

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.१२ ऑक्टोबर**



शरदचंद्र पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अक्कलकोट तालुकाध्यक्षपदी तालुक्यातील जेऊर येथील बंदेनवाज कोरबु यांची उत्तम कामगिरीमुळे पुन्हा फेर निवड जाहीर केले आहे. जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख व जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांनी तालुकाध्यक्षपदी बंदेनवाज कोरबु हे तालुक्यात पक्षासाठी पूर्ण वेळ देऊन उत्तम कामगिरीमुळे पुन्हा फेर निवड जाहीर केली आहे.अकलूज येथे खासदार धैर्यशील मोहिते पाटील व माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी तालुक्यातील सौरभ लांडगे, सिद्धाराम पोतदार, स्वामीराव पोतदार, श्रीनिवास शिंदगीकर, बसवराज देशमुख, हाजीमलंग कोरबु आदी उपस्थित होते.

# शहर वातूक शाखेतील पोलिस अंमलदाराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर -**

शहर वाहतुक नियंत्रण शाखेत कार्यरत असलेल्या एका पोलिस अमंलदाराचा मृत्यू झाला आहे. तो झोपेमध्ये बेडवरून खाली पडला होता,डोक्याच्या पाठीम ागील बाजूस मार लागला होता. व त्याची उलटी ही झाली होती. त्यास उपचारासाठी खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाल्याचे तेथील डॉक्टरांनी घोषित केले होते.



संभाजी शिवाजी दोल-तोडे, (वय ३२, रा. घर नं. ११/१७ अरविंद धाम पोलीस वसाहत, सोल-ापूर, मुळचा उपळाई खुर्द,ता माढा)असे मयत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसांत झाली आहे. तो २०१३ साली पोलिस दलात रूजू झाला होता. सध्या ते शहर वाहतुक शाखा उत्तर या कार्यालयात कार्यरत होते. मयत पोलीस अंमलदार दोलतोडे यांच्या पत्नीने दिलेल्या माहितीनुसार त्यांचे पती रात्री बेड वरती झोपले होते. पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास सुमारास झोपेतच बेड वरून खाली पडले. त्यांना डोक्याच्या पाठीमागील बाजूस मार लागला व त्यामुळे त्यांना उलटी झाली. त्यांना साडे पाच वा. अश्विनी हॉस्पिटल येथे उपचाराकरिता दाखल केले. त्यावेळेस तेथील संबंधित डॉक्टरांनी मयत घोषित केले. पोलिस नाईक चव्हाण यांनी पंचनामा करून मरणोत्तर पंचनामा पूर्ण केला. मयताचे पीएम करून अंत्यविधी करिता त्यांचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. दोलतोडे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई-वडील,भाऊ असा परिवार आहे.

# अवंती नगर अपार्टमेंटमधील जबरी चोरीप्रकरणी पोलिसांना चोराची संशयित कार मिळाली

### पोलिसांचा शोध सुरूच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर -**

शहरातील जुना पूना नाका परिसरातील अवंती नगर हौसींग सोसायटी अपार्टमेंटमधील जबरी चोरीप्रकरणी पोलिसांना चोरीची एक संशयित कार मिळाली असून चोरटे याच कारमधून आले असल्याचा संशय पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे. पोलिसांकडून घटनास्थळाच्या आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करून तपास सुरु आहे.

अवंती नगर येथील अपार्टमेंटमधील फ्लॅटचे दरवाजे तोडून दोन घरातील लोकांना शस्त्राचा धाक दाखवून चौघां चोरट्यांनी १ लाख १४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेला असल्याची घटना शनिवारी पहाटे २ ते ३ च्या दरम्यान घडली. याबाबत सागर प्रदीप अन्नदाते (वय ४०, रा. बिल्डींग नं. डी-०९, फ्लॅट नं. बी - ५, तिसरा मजला, अवंती नगर हौसींग सोसायटी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात अज्ञात चार चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना उघडकीस आल्यानंतर श्वान पथक व फॉरेन्सीक पथकाला घटनास्थळी बोलाविण्यात आले होते. परंतु, त्यांचा काही उपयोग झालेला नाही. त्यामुळे पोलिसांकडून आजूबाजूच्या परिसरातील तसेच महत्वांच्या रस्त्यांवरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रीकरणाची तपासणी करण्यात येत आहे. दरम्यान, पोलिसांना एक संशयित कार मिळाली असून ती कार चोरीची असल्याचे निष्पन्न झाले आहे. या कारमधूनच चोरटे आले असल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत असून जबरी चोरी केल्यानंतर चोरटे ही कार सोडून इतर वाहनाने पसार झाले असावेत असा अंदाज पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे.



**सणासुदीच्या गर्दीत नवी पेठेत मोकाट जनावरांचा त्रास...**

**सोलापूर : सध्या दिवाळी सणाच्या खरेदीसाठी शहरातील सर्वच बाजारपेठांमधून नागरीकांची मोठी गर्दी होत आहे. अशा गर्दीच्या बाजारपेठांमधून मोकाळ जनावरांचा त्रास नागरीकांना सहन करावा लागत आहे. मनपाचे गुरे प्रतिबंधक पथक हे झोपी गेले आहे की काय असा सवाल नागरीकांमधून उपस्थित करण्यात येत आहे.**



# एसपी कलागौरव पुरस्कार उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर -**

अखिल भारतीय कराओके क्लब प्रस्तुत ड्रीम फाऊंडेशन अनन्या टूरिजम पुणे व वीरशैव कैकया समाज महिला प्रतिष्ठान सौजन्याने माजी राष्ट्रपती डॉ ए.पी.जे. अब्दुल कलाम व स्वर कोकिला लता मंगेशकर यांचा जयंती पार्शगायक स्व किशोर कुमार पुण्यतिथीनिम्मित हुतात्मा स्मृति मंदिरात तुम से मिलने की तमन्ना है हिंदी, मराठी सदाबहार गाण्यांची सुरेल मैफिल गीत संगीत कार्यक्रमचे एस पी स्टूडिओच्या वतीने आयोजन केले होते.

या कार्यक्रमात गेल्या अनेक वर्षापासून मनोरंजन दुनियात आपली कला सदर करून उल्लेखनीय कामगिरी केलेले सुप्रसिद्ध गायकाना एस.पी. गायन पुरस्कार २०२५ देऊन सम्मानित करण्यात आले. नागेश सांळूके, युसूफ पिरजादे, काशीनाथ भतगुणकी, हाजी तोफीक हत्तुरे, परशुराम माने, ड्युटीशन फॅशन डीजायनर अनिता कांबळे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात सदाबहार गीत संगीताचा वर्षाव करण्यात आला. युसूफ पिरजादे, रामअंकुश हुल्लेकर, अमरसिंह पाटिल, अल्फिया मुलानी, अनीता कोंका, प्रतिमा बेनगी, अंजलि, राजकुम ार कोकळ्ळली, मल्लिकार्जुन, नागेश वाघमारे, राजकुमार काटकधौंड, शब्बीर बीजापुर, अशोक मैदर्गीकर, रविंद्र अफजलपुरकर, संजीवनी सिद्धगणे, पूर्णिमा कंदगटला, एडविन पिंटू, प्रसाद भालके, अमर सोलापुरकर, सुनील पवार, या गायक कलाकारांचे गीतांची मेजवनी संगीत प्रेमी रसिक श्रोते या कार्यक्रम मंत्रमुग्ध झाले. हुतात्मा स्मृति मंदिर हॉल दुमदुमून गेले या सर्व कलाकाराना सनमान चिन्न प्रमाणपत्र देऊंन कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमात रसिक प्रेषक १० द लकी ड्रा काडण्यात येणार आहे. दिवाळी गिफ्ट देऊन सम्मान करण्यात येईल.

**या मान्यवराचा झाला पुरस्काराने सन्मान**

गायक : सिद्राम विभूते, अमरसिंह पाटील, आरिफ यलाल, अनिल लोंढ़े, अल्फिया मुलानी, अनीता अय्यर, सयाली साठे, मेघाभंरी सालुंके, पूनम लाड़े, अनुराधा गांगुल. सामाजिक, शैक्षणिक, क्रीड़ा व सामाजिक : क्रीडा शिक्षक संतोष जाधव, पत्रकार अशफाकशेख, रामचंद्र लंगोटे, यशवंत पवार, महेश कोरे, ॲड. अजमुद्दीन शेख, संगीता पाटील.

# बार्शीमध्ये पाणी पुरवठा विस्कळीत

**महिलांनी घागरी मांडून केला सोलापूर रस्ता बंद**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ ऑक्टोबर -**

बार्शी शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. तब्बल आठ ते बारा दिवस झाले तरी शहरातील अनेक भागांत पाणीपुरवठा सुरु न झाल्याने नागरिकांचा संताप उसळला. अखेर आज बार्शी-सोलापूर राष्ट्रीय महाम ार्गावर नागरिकांनी थेट रस्त्यावर उतरुन जोरदार आंदोलन छेडले.

संतप्त महिलांनी हातात रिकाम्या घागऱ्या घेऊन रस्त्यावर मांडल्या आणि 'पाणी द्या, नाहीतर रस्ता बंद राहील!' असा इशारा दिला. या आंदोलनामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पाण्याच्या टंचाईमुळे नागरिकांना पिण्यासाठी, स्वयंपाकासाठी आणि दैनंदिन गरजांसाठी अक्षरशः त्रास सहन करावा लागत आहे.स्थानिक प्रशासन आणि नगरपरिषदेकडून वेळोवेळी आश्वासने मिळत असली तरी प्रत्यक्षात पाणीपुरवठा सुरु झाला नसल्याने लोकांचा संयम संपला आहे. नागरिकांनी प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### युएई फिफा विश्वचषकात स्थान मिळवण्याच्या मार्गावर

**दोहा** : शनिवारी दोहा येथे मार्कस मेलोनी आणि कायो लुकासने उशिरा नोंदविलेल्या गोलच्या बळावर संयुक्त अरब अमिरातने (युएई) ओमानवर २-१ असा विजय मिळवला. कॉस्मिन ओलारोइयूच्या संघाने पुढील वर्षी होणाऱ्या विश्वचषकात पात्रता मिळवण्याच्या आशा जिवंत ठेवल्या. मेलोनीने ७६ व्या मिनिटाला हेडरने गोल करून कौमे कौआडिओचा आत्मघाती गोल रद्द केल्यानंतर काओ लुकासने वेळेच्या सात मिनिटांनी विजयी गोल केला. या विजयामुळे युएई १९९० नंतर विश्वचषकात पहिल्यांदाच सहभागी होत आहे. आशियातील प्राथमिक फेरीच्या चौथ्या टप्प्यात गट अ मध्ये विजेते म्हणून प्रगती करण्यासाठी ओलारोइयूच्या संघाला मंगळवारी कतारविरुद्ध केवळ बरोबरी साधायची आहे. सुरुवातीच्या काळात ओमानने धोक्याची घंटा वाजवली जेव्हा इस्साम अल-साभीने युएईच्या मध्यातच जागा ताब्यात घेतली आणि अखेर त्याचा शॉट ब्लॉक करण्यात आला तेव्हा आक्रमणाचा निकाल लागला.

### भारतीय नेमबाज अंतिम फेरी गाठण्यात अपयशी

**अॅथेन्स** : येथे सुरू असलेल्या जागतिक शॉटगन स्पर्धेत पुरुष किंवा महिला स्कीट स्पर्धेत एकाही भारतीय नेमबाजाला अंतिम फेरी गाठता आली नाही. महिला स्कीटमध्ये रायझा ढिल्लन ही सर्वोत्तम भारतीय होती. तिने १२५ पैकी ११६ गुणांसह ५८ नेमबाजांमध्ये १६ वे स्थान पटकावले. सहा नेमबाजांना अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी आवश्यक असलेल्या ११९ च्या कट-ऑफ मार्कपेक्षा तीन गुण कमी होते. परिनाज धालीवाल आणि गनेमत सेखोनने प्रत्येकी ११० गुणांसह समान गुण मिळवले आणि अनुक्रमे ४४ व्या आणि ४७ व्या स्थानावर राहिले. १२ सहभागी देशांपैकी भारत सांघिक क्रमवारीत आठव्या स्थानावर राहिला. महिलांच्या स्कीट फायनलसाठी पात्र ठरलेल्या सहा नेमबाजांमध्ये सामंथा सिमोन्टन (अमेरिका), गॅब्रिएला रॉड्रिग्ज (मेक्सिको), कॉन्स्टँटिया निकोलाऊ (सायप्रस), एम्मानुएला काटझौराकी (ग्रीस), जियांग यिटिंग (चीन) आणि व्हिक्टोरिया लार्सन (चीन) यांचा समावेश होता. पुरुषांच्या स्कीटमध्ये, भावतेघ सिंग गिलने १२५ पैकी ११९ गुण मिळवून ११६ स्पर्धकांच्या मजबूत क्षेत्रात ३८ वे स्थान मिळवले.

अनुभवी मोहीमपटू मैराज अहमद खान ११७ गुणांसह ५३ व्या स्थानावर राहिला, तर अनंत जीत सिंग नारुका ११५ गुणांसह ८३ व्या स्थानावर राहिला. पुरुषांच्या अंतिम फेरीसाठी कट-ऑफ १२२ होता.

पुढील फेरीत पोहोचलेले सहा नेमबाज म्हणजे व्हिन्सेंट हॅनकॉक (यूएसए), अझमी मेहेल्बा (इजिप्त), डॅनियल कोरकॅक (चेक प्रजासत्ताक), एमिल केल्डगार्ड पीटरसन (डेन्मार्क), मिकोला मिलचेव्ह (युक्रेन) आणि जाकुब टोमेसेक (झेक प्रजासत्ताक) आदिंचा समावेश आहे. भारताचा पुरुष संघ वर्गीकरणात २७ देशांपैकी १६ व्या स्थानावर राहिला.

### दबंग दिल्ली-पुणेरी लढत नाट्यमयरीत्या टाय

**दिल्ली** : त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये सुरु असलेल्या बाराव्या प्रो-कबड्डी लीग हंगामात रविवारी दबंग दिल्ली व पुणेरी पलटन यांच्यादरम्यानची चुरशीची लढत ३८-३८ अशा गुणांनी नाट्यमयरीत्या बरोबरीत राहिली. आधीच प्ले-ऑफमध्ये स्थान मिळविणाऱ्या पुणेरी पलटनने गुणतालिकेत दबंग दिल्लीला खाली खेचून अव्वल स्थान मिळविले. आता दोन्ही संघांचे प्रत्येकी २४ गुण झालेले आहेत. अटीतटीच्या या सामन्यात पुणेरी पलटनकडून पंकज मोहिते (७), कर्णधार असलम इनामदार (६), अष्टपैलू (२), मोहित गोयत (५) व आदित्य शिंदेने ( ५) आक्रमक चढाया केल्या. त्यांना दबंग दिल्लीच्या अजिंक्य पवार (१०), अष्टपैलू नवीन ( ५) व नीरज नरवालने (४) तोडीस तोड प्रत्युत्तर दिले. पुणेरीकडून गरव खत्री (४) व अभिनेश नादराजनने (२) सुरेख बचाव केला. दिल्लीकडूनही सुरजीत सिंग, संदीप व सौरभ नंदालने आपली जब ाबदारी चोखपणे ब जावत सामना बरोबरीत राखण्यास मदत केली.

### चिनप्पा उपांत्य फेरीत

**योकोहामा** : येथे सुरु असलेल्या जपान ओपन पीएसए चॅलेंजर स्क्वॅश स्पर्धेत भारताची अनुभवी स्क्वॅशपटू जोशना चिनप्पाने इजिप्तच्या नार्डिन गारसचा सरळ गेममध्ये पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. ३९ वर्षीय जोशना चिनप्पाने उपांत्यपूर्व फेरीत इजिप्तच्या दुसऱ्या मानांकित गारसचा ११-८, १५-१३, ११-९ असा पराभव केला. जोशना आता अंतिम चार टप्प्यात चौथ्या मानांकित इजिप्तच्या राणा इस्माईलशी लढेल. यापूर्वी, माजी आशियाई विजेती आणि जागतिक दुहेरी विजेतीने दुसऱ्या फेरीत फ्रेंच पाचव्या मानांकित लॉरेन बाल्टायनचा ११-७, ११-४, ११-९ असा पराभव केला आणि पहिल्या फेरीत मलेशियन अँरी गोहचा ११-६, ११-६, ११-६ असा पराभव केला. भारताच्या अभय सिंगने सिलिकॉन व्हॅली ओपन स्क्वॅशमध्ये विजयी सुरुवात केली, पण अमेरिकेतील रेडवुड सिटी येथे झालेल्या पीएसए गोल्ड स्पर्धेत त्याचे सहकारी वेलावन सेंथिलकुमार आणि रमित टंडन यांनी आपले सुरुवातीचे सामने गमावले.

# फॉलोऑननंतर विंडीजची मुसंडी

### होप, कॅम्पबेलची चिवट झुंज ● तरीही ९७ धावांनी पिछाडीवर ● कुलदीप यादवचे ५ बळी

◆ **नवी दिल्ली, १२ ऑक्टोबर**

अरुण जेटली स्टेडियमवर सुरु असलेल्या भारताविरुद्धच्या दुसऱ्या व शेवटच्या कसोटी क्रिकेट सामन्यात तिसऱ्या दिवशी कुलदीप यादवच्या (८२ धावांत ५ बळी) प्रभावी फिरकी गोलंदाजीमुळे पाहुण्या वेस्ट इंडीजचा पहिला डाव ८१.५ षटकांत २४८ धावांवर आटोपला. त्यामुळे ८ बाद ५१८ धावांवर आपला पहिला डाव घोषित करणाऱ्या भारतीय संघाने २७० धावांची आघाडी मिळविली. भारताने फॉलोऑन लादल्यानंतर वेस्ट इंडीजची दुसऱ्या डावातही डळमळीत सुरुवात झाली, परंतु त्यानंतर शाय होप व जॉन कॅम्पबेलने केलेल्या चिवट झुंजीमुळे वेस्ट इंडीजने जोरदार मुसंडी मारली व दिवस अखेर दुसऱ्या डावात ४९ षटकांत २ बाद १७३ धावा नोंदविल्या, तरीही वेस्ट इंडीज अजून ९७ धावांनी पिछाडीवर आहे.

जॉन कॅम्पबेल व शायने तिसऱ्या गड्यासाठी नाबाद १३८ धावांची भागीदारी केली. कॅम्पबेलने कारकिर्दीतील सर्वोत्तम नाबाद ८७ धावा काढत मालिकेतील आपले पहिले अर्धशतक झळकावले. होपने ३१ डावात पहिले अर्धशतक झळकावले, परंतु या सर्व चांगल्या कामगिरीनंतरही त्यांना भारताला पुन्हा फलंदाजी करायला लावण्यासाठी ९७ धावांची आवश्यकता होती.

कुलदीप यादवने पाचव्या कसोटीत पाच बळी टिपून भारताला वेस्ट इंडीजवर फॉलो-ऑन लादण्यास भाग पाडले. एकूणच, दिल्लीच्या या खेळपट्टीवर एका दिवसात आठ बळी घेणे हे सामान्य प्रयत्न नव्हते. हे मुख्यतः कुलदीपचेच काम होते.

वेस्ट इंडीजने ४ बाद १४० धावांवरून आपल्या पहिल्या डावास पुढे खेळण्यास सुरुवात केली, मात्र कालचे नाबादवीर शाय होप (३६) व तेव्हिन इमलाच (२१) कुलदीपच्या फिरकीच्या जाळ्यात अडकले. खरी पियरे (२३) व अॅण्डरसन फिलीपने (नाबाद २४) तेवढी विंडीजची धावसंख्या वाढवण्याची प्रयत्न केला, उर्वरित फलंदाज भारतीय वेगवान व फिरकी गोलंदाजांसमोर फार वेळ टिकाव धरू शकले नाहीत. भारताकडून कुलदीप यादवने ८२ धावांत ५ बळी, रवींद्र जडेजाने ४६ धावांत ३ बळी, तर जसप्रीत ब ुमराह व मोहम्मद सिराजने प्रत्येकी १ बळी टिपला.

फॉलोऑन लादल्यानंतर वेस्ट इंडीजच्या दुसऱ्या डावाची सुरुवातही निराशाजनक झाली. मोहम्मद सिराजने तगेमरीन चंद्रपॉलला गिलकडून झेलबाद केले, तर वॉशिंग्टन सुंदरने अॅलिक अथानाथेचा त्रिफळा उडविला. वेस्ट इंडीजने १४.३ षटकांत ३५ धावांत २ गडी गमावले, परंतु त्यानंतर सलामीवीर जॉन कॅम्पबेल व शाय होपने चिवट झुंज देत संघाची पिछाडी भरून काढण्याचा प्रयत्न केला. या दोघांनी नाबाद खेळी करत वेस्ट इंडीजला दुसऱ्या डावांत ४९ षटकांत २ बाद १७३ धावांपर्यंत मजल मारून दिली. खेळ थांबला तेव्हा कॅम्पबेल नाबाद ८७ धावांवर, तर शाय होप नाबाद ६६ धावांवर खेळत होते. (वृत्तसंस्था)



नवी दिल्ली येथे दुसऱ्या आणि शेवटच्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडीजच्या जेडेन सील्सला बाद करून पाचवा बळी घेतल्याचा आनंद साजरा करताना भारताचा फिरकीपटू कुलदीप यादव



शाय होपसोबत आपले अर्धशतक साजरे करताना वेस्ट इंडीजचा जॉन कॅम्पबेल (डावीकडे)

# दक्षिण आफ्रिका विजयाची लय कायम राखण्यास उत्सुक

### महिला वन-डे विश्वचषक

◆ **विशाखापट्टणम्, १२ ऑक्टोबर**

दोन विजयांसह पुन्हा एकदा शर्यतीत उतरल्यानंतर आत्मविश्वास बळावलेला दक्षिण आफ्रिकेचा संघ सोमवारी येथे होणाऱ्या महिला एकदिवसीय विश्वचषक सामन्यात बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात आपली विजयी घोडदौड कायम राखण्यास उत्सुक असेल.

पहिल्या सामन्यात इंग्लंडकडून १० गड्यांनी पराभव पत्करल्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाने जोरदार मुसंडी मारत न्यूझीलंड व यजमान भारतावर विजय मिळवून लय मिळवली. सध्या ते -०.८८८ नेट रन रेटसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहेत.

कागदावर, कर्णधार लॉरा वोल्वाड्र्ट, मॅरिझाने कॅप, टॅझमिन ब्रिट्स, सून लुस आणि अयाबोंगा खाका यांच्यासारख्या खेळाडूंचा अभिमान बाळगणारा दक्षिण आफ्रिका संघ अधिक मजबूत दिसतो. न्यूझीलंडविरुद्ध ब्रिट्स व लुसने जबरदस्त कामगिरी केली व वोल्वाड्र्टने भारताविरुद्ध आपल्या दर्जेदार खेळाचे प्रदर्शन केले. भारताविरुद्धच्या विजयात तळाच्या फळीतील फलंदाजांचे विशेषतः नादिन डी क्लार्क व खाकाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. बांगलादेशविरुद्ध अनुभवी खेळाडू मॅरिझाने कॅप व बॉशने अतिरिक्त गोलंदाजी करण्याची अपेक्षा दक्षिण आफ्रिकेला असेल. दक्षिण आफ्रिकेने या स्पर्धेत परिस्थितीशी परिचित असलेल्या या मैदानावर दोन सामने खेळले आहेत.

दुसरीकडे, बांगलादेशने आपल्या स्पर्धेची सुरुवात चांगली केली, त्यांनी पाकिस्तानवर सात गड्यांनी विजय मिळवला. तथापि, इंग्लंड आणि न्यूझीलंडविरुद्धच्या सलग पराभवांमुळे त्यांची गती मंदावली आहे. त्यांचा काही कमकुवतपणा उघडकीस आला आहेत. त्यांच्या गोलंदाजी विभागामध्ये प्राथमिक सकारात्मकता आहे, त्याचे नेतृत्व २० वर्षीय आशादायक वेगवान गोलंदाज मारुफा अक्तर करीत आहे. मारुफाने आतापर्यंत पाच बळी घेतले आहे व तिला फिरकीपटूंनी चांगली साथ दिली आहे.

बांगलादेशची डळमळीत अव्वल फळी ही एक महत्त्वाची चिंता आहे. यष्टिरक्षक म्हणून काम करणारी कर्णधार निगार सुलताना धावांसाठी संघर्ष करत आहे.

अव्वल फळीने धावा काढल्या नाही, तर तळाच्या फळीने जे काही केले ते निरुपयोगी ठरते, असे बांगलादेशची अष्टपैलू खेळाडू राबेया खान म्हणाली. न्यूझीलंडविरुद्धच्या पराभवानंतर तिने बांगलादेशच्या फलंदाजीबाबत चिंता व्यक्त केली.

नोनकुलुलेको म्लाबा, अयाबोंगा खाका, मॅरिझाने कॅप, मसाबता क्लास आणि क्लो ट्रायॉन यांचा समावेश असलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या जबरदस्त गोलंदाजी विभागाविरुद्ध, बांगलादेशच्या फलंदाजी संघाला कठीण लढाईचा सामना करावा लागेल.

बांगलादेशला असाधारण काहीतरी घडवण्यासाठी सुलताना, रुबिया हैदर, निशिता अक्तर निशी आणि सुमैया अक्तर सारख्या प्रमुख खेळाडूंकडून मोठ्या योगदानाची आवश्यकता असेल. (वृत्तसंस्था)



लॉरगा वोल्व्हार्ट



निगर सुलताना

**आजचा सामना**

**दक्षिण आफ्रिका वि. बांगलादेश**
**स्थळ** : डॉ.वाय.एस. राजशेखर रेड्डी एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियम, विशाखापट्टणम्
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# व्हॅलेंटाईन वाचेरोट शांघाय मास्टर्स विजेता

◆ **शांघाय, १२ ऑक्टोबर**


रविवारी, चीनमधील शांघाय येथील किझोंग फॉरेस्ट स्पोर्ट्स सिटी टेनिस सेंटरमध्ये शांघाय मास्टर्स टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत मोनॅकोचा व्हॅलेंटाईन वाचेरोटने फ्रान्सच्या आर्थर रिंडरक्नेचला हरवून विजेतेपदाचा मान मिळविला.

जागतिक क्रमवारीत २०४ व्या क्रमांकावर असलेल्या व्हॅलेंटाईन वाचेरोटने रविवारी आपला चुलत भाऊ आर्थर रिंडरक्नेचला हरवून शांघाय मास्टर्स जिंकले. इतिहासातील सर्वात कमी मानांकित मास्टर्स १००० अंतिम फेरीत वाचेरोटने ४-६, ६-३, ६-३ असा विजय मिळवला.

५४ व्या क्रमांकावर असलेल्या फ्रान्सचा खेळाडू रिंडरक्नेच आणि मोनॅकोचा २०४ व्या क्रमांकावर असलेल्या वाचेरोट यांच्यातील संपूर्ण कुटुंबाचा अंतिम सामना हा स्पर्धेतील आतापर्यंतच्या सर्वात असामान्य शेवटांपैकी एक आहे. त्याचे प्रशिक्षक आणि सावत्र भाऊ बेंजामिन बॅलेरेट यांनी या लढतीचे कौतुक केले. इतिहासातील ही तिसरी एटीपी मास्टर्स १००० अंतिम फेरी होती जिथे दोन अमानांकित खेळाडू सहभागी झाले होते.

**वाचेरोटकडून जोकोविचला पराभवाचा धक्का**

व्हॅलेंटाईन वाचेरोटने सर्बियाचा दिग्गज ३८ वर्षीय नोवाक जोकोविचला पराभवाचा धक्का दिला आणि शांघाय मास्टर्स टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. वाचेरोटने जोकोविचला ६-३, ६-४ असे हरवून त्याच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा विजय मिळवला. वाचेरोटच्या चुलत भावाने रशियन दिग्गज डॅनिल मेदवेदेववर ४-६, ६-२, ६-४ असा विजय साजरा केला. (वृत्तसंस्था)



चषकासह आनंद साजरा करताना व्हॅलेंटाईन वाचेरोट

# भारताचा सलग दुसरा विजय

### सुल्तान ऑफ जोहोर चषक हॉकी ● न्यूझीलंडवर ४-२ गोलने मात



न्यूझीलंडच्या खेळाडूला हुलकावणी देत आगेकूच करताना भारतीय हॉकीपटू

◆ **जोहोर बहरू, १२ ऑक्टोबर**

भारतीय कनिष्ठ पुरुष हॉकी संघाने रविवारी न्यूझीलंडविरुद्ध ४-२ असा सहज विजय मिळवत सुल्तान ऑफ जोहोर चशक हॉकी स्पर्धेत आपली अपराजित घोडदौड कायम ठेवली.

भारताने यापूर्वी स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात ग्रेट ब्रिटनचा ३-२ असा पराभव केला होता. भारताचा पुढील सामना मंगळवारी पाकिस्तानशी होईल.

भारताकडून अर्शदीप सिंग (दुसऱ्या मिनिटाला), पी. बी. सुनील (१५ व्या मिनिटाला), अराईजित सिंग हुंडल (२६व्या मिनिटाला) आणि रोमन कुमुरने (४७ व्या मिनिटाला) गोल केले, तर न्यूझीलंडकडून गस नेल्सन (४१ व्या मिनिटाला) व एडन मॅक्सने (५२व्या मिनिटाला) गोल केले.

पहिल्या चरणारच्या दुसऱ्या मिनिटालाच भारताचा पहिला गोल झाला, न्यूझीलंडच्या सर्कलमध्ये वाईट बचावानंतर अर्शदीपने एका सैल चेंडूवर गोल केला.

पहिल्या चरणाच्या शेवटच्या मिनिटाला सुनीलने पेनॉल्टी कॉर्नर गोल केला तेव्हा भारताने आपली आघाडी दुप्पट केली. ड्रॅगफ्लिकर आणि कर्णधार रोहितने सुनीलला चेंडू पास केला.

२-० अशी आरामदायी आघाडी घेऊन, भारताने दुसऱ्या चरणाची सुरुवात योग्य संयोजनांचा वापर करून चांगल्या आक्रमक संधी निर्माण केल्या. तिसऱ्या चरणामध्ये अखेर न्यूझीलंडने ४१ व्या मिनिटाला गोल करून भारताची आघाडी ३-१ अशी कमी केली. ४७ व्या मिनिटाला रोमनने पेनॉल्टी कॉर्नरवर गोल करून भारताला शेवटच्या चरणात ४-१ अशी आघाडी मिळवून दिली. ५२ व्या मिनिटाला न्यूझीलंडसाठी मॅक्सने एक गोल केला. न्यूझीलंडने सामन्यात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु भारतीय बचाव मजबूत राहिला. (वृत्तसंस्था)

### स्मृती मंधानाच्या वन-डेत सर्वात जलद ५००० धावा

**विशाखापट्टणम्** : भारतीय सलामीवीर स्मृती मंधाना रविवारी महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये ५००० धावांचा टप्पा गाठणारी सर्वात तरुण आणि सर्वात जलद खेळाडू ठरली. विशाखापट्टणम् येथील डॉ. वाय.एस. राजशेखर रेड्डी एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या महिला विश्वचषक सामन्यात तिने हा टप्पा गाठला. २९ वर्षीय स्मृतीने आपल्या ११२ व्या महिला एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या किम गार्थला २१ व्या षटकात षट्कार मारून हा टप्पा गाठला आणि १२९ सामन्यांमध्ये ५००० धावांचा टप्पा गाठणाऱ्या वेस्ट इंडीजच्या स्टेफनी टेलरचा विक्रम मोडला. महिला वन-डे क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५००० धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत आता स्मृती मंधाना (११२ सामने) आणि स्टेफनी टेलर (वेस्ट इंडीज) यांचा विक्रम १२९ सामन्यांमध्ये आहे. सुझी बेट्स (न्यूझीलंड) १३६ सामन्यांमध्ये आहे; मिताली राजने (भारत) १४४ सामन्यात आणि चार्लोट एडवर्ड्स (इंग्लंड) ने १५६ सामन्यात असेच केले.

### शाह यांच्याकडून मिताली स्टॅण्ड, कल्पना प्रवेशद्वाराचे कौतुक

**विशाखापट्टणम** : रविवारी एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियममध्ये राज्याच्या दोन सर्वात यशस्वी महिला क्रिकेटपटू - मिताली राज आणि रवी कल्पना यांचे नाव अनुक्रमे स्टॅण्ड आणि प्रवेशद्वाराला देऊन त्यांच्या खेळातील योगदानाची दखल घेतली, याबद्दल आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी आंध्र प्रदेश क्रिकेट संघटनेचे कौतुक केले. ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताच्या महत्त्वपूर्ण महिला एकदिवसीय विश्वचषक सामन्याच्या सुरुवातीच्या अगदी आधी, रविवारी स्टँड आणि गेटचा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी बोलताना आयसीसीचे अध्यक्ष जय शाह म्हणाले, या कौतुकास्पद कामगिरीबद्दल मी आंध्र सरकार आणि एसीएचे अभिनंदन करतो.

# जेसिकाला नमवून कोको गॉफ वुहान ओपन विजेती



◆ **वुहान, १२ ऑक्टोबर**

रविवारी कोको गॉफने जेसिका पेगुलावर ६-४, ७-५ असा विजय मिळवत वुहान ओपनमध्ये ऑल-अमेरिकन फायनलमध्ये आपल्या कारकिर्दीतील तिसरे १००० जेतेपद पटकावले. तिसरी मानांकित गॉफने मध्य चिनी शहरात १ तास ४२ मिनिटांच्या लढतीत एकही सेट न गमावता ट्रॉफी जिंकली. माजी दुहेरी भागीदारांमधील पहिल्या अंतिम सामन्यात गॉफने दुसऱ्या सेटमध्ये अनेक कमतरता दूर करून पेगुलाविरुद्धचा आपल्या विजयाचा रेकॉर्ड ३-४ असा सुधारला. या प्रक्रियेत २१ वर्षीय गॉफ ओपन युगातील तिचे पहिले नऊ हार्ड-कोर्ट फायनल जिंकणारी पहिली खेळाडू ठरली. सामन्याच्या अखेरीस पेगुला एका फटका वाया घालविला. पुढे कोको गॉफने सलग १० गुण घेत आपली स्थिती मजबूत केली. थोड्याच वेळात पेगुलाची व्हॉली मॅच पॉइंटवर घसरण झाली, गॉफने विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी हात वर केले. (वृत्तसंस्था)

# भारतीय बॅडमिंटनपटूंचे लक्ष्य वैयक्तिक विजेतेपद

### जागतिक कनिष्ठ बॅडमिंटन

◆ **गुवाहाटी, १२ ऑक्टोबर**

मिश्र सांघिक स्पर्धेत ऐतिहासिक कांस्यपदक मिळविल्यानंतर भारतीय संघ सोमवारपासून येथे सुरू होणाऱ्या बीडब्ल्यूएफ जागतिक कनिष्ठ बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या वैयक्तिक स्पर्धांमध्ये आपली विजयाची लय कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल.

या स्पर्धेत भारताची सर्वोत्तम कामगिरी १७ वर्षांपूर्वी पुण्यात झाली होती जेव्हा सायना नेहवालने मुलींच्या एकेरीत सुवर्णपदक जिंकले होते, तर आरएमव्ही गुरु साई दत्तने मुलांच्या एकेरीत कांस्यपदक जिंकले होते.

आतापर्यंत, भारताने स्पर्धेच्या इतिहासात एकूण ११ वैयक्तिक पदके जिंकली आहेत, ज्यात चार रौप्यपदकांचा समावेश आहे.


या आवृत्तीत भारताला आणखी एक सुवर्णपदक मिळवण्याची सर्वोत्तम संधी म्हणजे ज्युनियर जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावणारी तन्वी शर्मा आणि चायना ओपनची उपांत्यपूर्व फेरी गाठणारी उन्नती हुडा यांच्यासह मुलींच्या एकेरीत सुवर्णपदक मिळवणे. दोन्ही खेळाडूंना ड्रॉच्या वेगवेगळ्या भागात ठेवण्यात आले आहे, त्यामुळे ऑल इंडियन फायनल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आशियाई अंडर-१९ कांस्यपदक विजेती तन्वीला पहिल्या फेरीत बाय मिळाला आहे आणि इंडोनेशियाच्या सातव्या मानांकित थालिता विर्यावानविरुद्धची उपांत्यपूर्व फेरीतील लढत ही तिची मोहिमेतील पहिली मोठी परीक्षा असू शकते.

दरम्यान, आठव्या मानांकित उन्नती दुसऱ्या फेरीत हाँगकाँगच्या लिऊ होई किऊ अॅनाविरुद्ध आणि दुसऱ्या मानांकित थायलंडच्या अन्यपत फिचितप्रीचसाकविरुद्ध अंतिम आठमध्ये संभाव्य लढत खेळण्याची शक्यता आहे.

भारताची दुसरी आशियाई १९ वर्षांखालील कांस्यपदक विजेती वेनाला के. आणि जागतिक क्रमवारीत ४१ व्या क्रमांकावर असलेली रक्षिता श्री यांना त्याच गटामध्ये स्थान देण्यात आले आहे, परंतु अंतिम चार टप्प्यात पोहोचण्याची संधी निर्माण करण्यासाठी त्यांना काही कठीण सामन्यांमधून जावे लागेल.

उप-उपांत्यपूर्व फेरीत रक्षिताचा सामना चौथ्या मानांकित श्रीलंकेच्या रानीथमा लियानागेशी होऊ शकतो, तर वेनालाला त्याच टप्प्यात चीनच्या लिऊ सी याशी मात करावी लागेल. मुलांच्या एकेरीच्या दावेदारांना पदक फेरीत पोहोचण्याचा मार्ग अधिक कठीण असेल. लालथाझुआला हमारला ३२ व्या फेरीत प्रथम विश्वमानांकित व अव्वल मानांकित इंडोनेशियाचा मोहम्मद झाकी उबैदिल्लाहशी सामना करावा लागण्याची शक्यता आहे. ११ व्या मानांकित रौनक चौहानला त्याच टप्प्यात चीनच्या ली झी हांगविरुद्ध कठीण आव्हानाला सामोरे जावे लागेल. (वृत्तसंस्था)





# मंद्रुपमध्ये महर्षी वाल्मिकी जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

रामायणाचे आद्यकवी असणारे महर्षी वाल्मिकी यांची जयंती मंद्रुपमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पाच दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जयंतीची समारोप पूजा युवा नेते सुदर्शन हसापूरे यांच्या हस्ते पार पडली. यावेळी सरपंच अनिता कोरे, विक्रम झाडबुके, जयंती उत्सव अध्यक्ष मळसिध्द कोळी, उपाध्यक्ष संदेश कोळी , खजिनदार अप्पु कोळी, सुरेश कोळी, दशरथ कोळी, राजकुमार कोळी, चतुरसेन कोळी , कोळी समाजाचे अध्यक्ष बाबुराव कोळी, शबीर लिगेवान आदी उपस्थित होते. यावेळी सुदर्शन हसापूरे यांनी महर्षी वाल्मिकी यांच्या कार्याला उजाळा देऊन तरूणांनी महर्षी वाल्मिकी यांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन केले.

# पंढरपुरात दिवाळीनिमित्त सजली किराणा दुकाने; ग्राहकांची होतेय गर्दी

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.१२ ऑक्टोबर -**

दिवाळीचा सण अगदी तोंडावर येऊन ठेपल्यामुळे शहरातील किराणा मालाच्या दुकानांमधून सध्या किराणा साहित्याच्या खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. शहरातील बऱ्याच किराणा मालाच्या दुकानदारांनी आपल्या दुकानापुढे मंडप टाकून खास विद्युत रोषणाई देखील केलेली दिसत आहे.

सणांचा राजा म्हणजे दिपावलीचा सण. दिवाळीच्या सणात सगळीकडे गोडधोड खाणे, फराळ आदींची मौजमजा असते. पाहुणे, मित्रपरिवाराची एकमेकांना फराळांसाठीची निमंत्रणे देणे, घेणे सुरु असते. एरव्ही वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी, कामानिमित्त असलेले कुटुंबातील सर्व सदस्य दिवाळी सणासाठी आपआपल्या गावी एकत्र येतात. त्यामुळे घराघरांम धून खमंग चिवडा,पोहे, चकली, शेव, अनारसे, बेसनलाडू, रवा खवा लाडू, बालुशाही, करंज्या आदी विविध पदार्थ बनविले जातात. मात्र हे सर्व करण्यासाठी किराणा साहित्याची आवश्यकता असते. साधारणपणे दिवाळीच्या अगोदर एक महिन्यापासून स्थानिक किराणा मालाचे दुकानदार शेंगादाणे, डाळी, तेल, तुप, चिरमुरे, साखर, पोहे, रवा, मैदा आदी विविध भागातून घाऊक व्यापाऱ्यांकडून मागवित असतात. या बरोबरच दिवाळी सणासाठी खास सुंगधी उटणे, सुवासिक तेल, वेगवेगळी साबणे, स्प्रे, अत्तर, रांगोळ्या, सुवासिक अगरबत्या, धुप आदींना देखील ग्राहकांकडून मागणी असते. त्यामुळे याही मालाच्या त्या त्या घाऊक व्यापाऱ्यांकडून अगोदरच ऑर्डर्स द्याव्या लागत असतात. घाऊक बाजारातून कट्यांनी अर्थात पोत्यांनी किराणा माल उपलब्ध झाल्यावर तो स्वच्छ करुन ग्राहकांच्या मागणी प्रमाणे वेगवेगळ्या वजनांची पाकिटे बनवुन ती



विक्रीस ठेवण्यात येतात. ग्राहक दोन पैसे जास्त द्यावयास तयार असतात मात्र किराणा स्वच्छ, ताजा आणि चांगला तसेज दर्जेदार बघुनच खरेदी करतात. त्यामुळे सणाच्या अगोदरच डाळी, तांदूळ, गहू, रवा, पोहे, चिरमुरे आदी मालांची स्वच्छता करुन त्याचे वेगवेगळ्या वजनांचे पँकेट तयार करुन ठेवलेली असतात. ही सर्व तयारी करुन शहरातील किराणा मालाच्या विक्रीची दुकाने सध्या ग्राहकांना दर्जेदार किराणा माल विक्रीसाठी सज्ज झालेली दिसत आहेत. दरम्यान सध्या महागाईमुळे शेंगादाणे, साखर, डाळी, तुप, तेल आदींचे भाव गगनाला भिडलेले असले तरी प्रत्येक जण वर्षातून एकदा येणाऱ्या दिवाळी सणाच्या निमित्ताने आपआपल्या घरातून वेगवेगळे पदार्थ तयार करीत असतो. येणाऱ्या आप्तस्वकीय, पै,पाहुण्यांना फराळाची निमंत्रणे देत असतो. दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने सर्व कुटुंब एकत्रित येत असते. त्यामुळे एरव्हीपेक्षा या सणाला किराणा मालाला ग्राहकांकडून जादा मागणी असते अशी माहिती येथील किराणा मालाच्या व्यापाऱ्यांनी दिली.

गेल्या दोन,चार दिवसांपासून दुकानात गर्दी सुरु आहे. सध्या ग्राहक दोन पैसे जास्त द्यावयास तयार असतात. मात्र किराणा माल स्वच्छ, ताजा, दर्जेदार बघुनच खरेदी करतात. विशेष म्हणजे या वर्षी देखील आम्ही आमच्या दुकाना मध्ये ठराविक किंमतीचा किराणा माल खरेदी केल्यावर ग्राहकांना आमच्यातर्फे खास दिवापली निमित्त गिफ्ट देखील देत आहोत.

**- अमित गडम, गोविंद आण्णा गडम फर्मचे मालक**

वर्षातून एकदाच दिवाळीचा सण येतो. महागाई देखील आहे. कुटुंबातील सर्व सदस्य या सणाच्या निमित्तानेच एकत्र येतात. त्यामुळे आनंद, उत्साह वाटतो. लहान मुलांची देखील हौस असते. मित्रमंडळींसाठी गोडधोड फराळाचे पदार्थ करावे लागतात.त्यामुळे इतर सणांपेक्षा या महिन्यात जादा किराणा माल लागतो.

**- संजय लिगाडे, ग्राहक**





# चौदा कमानी येथील नाल्याचे मूळ प्रवाह पूर्वत करण्याची कार्यवाही सुरु

- **पोलीस बंदोबस्तात तगडी यंत्रणा कार्यरत; नाला रुंदीकरण, खोलीकरणाच्या कामास प्रारंभ**
- **महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली प्रत्यक्ष पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

अवंती नगर व यश नगर परिसरातील सहा कमानी व चौदा कमानी नाल्याचे मूळ प्रवाह पूर्वत करण्याची कार्यवाही मोठ्या पोलीस बंदोबस्तात सुरू करण्यात आली. नाले रुंदीकरण व खोलीकरणाची कामे प्रत्यक्ष सुरू करण्यात आली. दरम्यान, आज आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी नाल्याच्या परिसरातील स्थितीची पाहणी करून संबंधित विभागाला नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. पालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार ६ कमान व १४ कमान येथे नाल्याचा प्रवाह वळवल्याप्रकरणी त्या परिसरातील शेतकरी व त्यांचे प्लॉट धारक यांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या. यामध्ये सहा शेतकरी आणि तीन लेआउट धारक यांचा समावेश आहे.

त्यामध्ये उत्तमराव निकाळजे, सुधाकर चिट्ठ्याल, गंगाई सपाटे, रामचंद्र हत्तुरे, सुरेश सपाटे, मनोहर सपाटे, प्रसन्न निकाळजे, प्रशांत निकाळजे, सुधीर देशमुख, प्रवीण निकाळजे, उल्हावा निकाळजे, पूनम निकाळजे, वर्षा कांबळे, विजय जानकर, मीनाक्षी जानकर, जयदेवी जानकर आणि शिवानंद धूम्मा या नागरिकांना नाल्याचा प्रवाह वळविणे अथवा नाल्यावर अतिक्रमण केल्याबाबत नोटिसा देण्यात आल्या आहेत.या संदर्भात महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सोमवारी ६ आक्टोबर रोजी लेखी आदेश काढले होते. यानुसार सहा कमान येथील नाल्याच्या प्रवाहात बदल करुन वळवण्यात आल्याने, नुकत्याचं झालेल्या अतिवृष्टीमुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती. नाल्याच्या प्रवाहातील अडथळे हे यास कारणीभूत ठरत असल्याने, संबंधितांनी हे अडथळे स्वतः हून तीन दिवसांत स्वखर्चाने काढून घेऊन नाल्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करावा. त्याचे छायाचित्र काढून या संदर्भात अहवाल सादर करावा,असे आदेश पालिका आयुक्तांनी काढले होते.

दरम्यान, आज रविवारी सकाळीच दहा वाजता आंवती नगर व यश नगर परिसरातील सहा कमानी व चौदा कमानी नाल्याच्या खोलीकरण व रुंदीकरण कामास प्रारंभ करण्यात आला.महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या परिसरातील नाल्याची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित विभागाला नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.या कारवाईदरम्यान उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकुलवार, किशोर सातपुते, विभागीय अधिकारी जावेद पानगल तसेच संबंधित विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

**▸ नाल्यावर अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई : आयुक्त**
आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले की, ''शहरातील सर्व प्रमुख नाले प्रवाही ठेवणे, त्यांचे रुंदीकरण व खोलीकरण करणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. नाल्यावर अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल. नाल्याचा प्रवाह रोखणारी कोणतीही कृती करू नये. स्वच्छ व प्रवाही नाला व्यवस्थापनासाठी सहकार्य करण्याचे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

**▸ अशी होती यंत्रणा तैनात : उपायुक्त लोकरे हे तळ ठोकून उपस्थित**
या नाला रुंदीकरण व खोलीकरणाची कामे प्रत्यक्ष सुरू करण्यात आली आहेत. कार्यवाहीसाठी आज महानगरपालिकेकडून पोलीस बंदोबस्तासह ३ मोठे पोकलेन, ४ जेसीबी आणि ६ डंपर यंत्रणा तैनात करण्यात आले होते. २५ पोलीस बंदोबस्त, ४० महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थिती होते. तीन पथके कार्यरत होती. या कार्यवाहीदरम्यान महापालिका उपायुक्त आशिष लोकरे हे तळ ठोकून होते. तिन्ही पथकास त्यांनी आवश्यक त्या सूचना देऊन ही मोहीम राबविली.

**▸ घुसमटलेला श्वास अखेर झाला मोकळा**
गेल्या अनेक वर्षापासून अवंती नगर आणि यश नगर परिसरातील सहा कमानी आणि १४ कमानी नाल्याच्या प्रवाहात अडथळे निर्माण झाले होते. त्याचा फटका अतिवृष्टी काळात बसला. या परिसरातील अनेक घरात पाणी शिरले. नगरांना पाण्याचा वेढा दिला होता. महापालिकेने आज राबविलेल्या कारवाईमुळे नाले प्रवाहातील घुसमटलेला श्वास अखेर मोकळा झाला.



# संगमेश्वर कॉलेजची कराटे स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

शालेय शहर कराटे स्पर्धेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा. संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा. प्रसाद कुंटे यांनी अभिनंदन केले

**कामगिरी : मुली :** आर्य यादव (४८-५२ किलो, सुवर्ण), संस्कृती अंजिखाने (४४-४८ किलो, सुवर्ण), नक्षत्रा भोसले (३२-३६ किलो, सुवर्ण), मोहिनी अडकी (६४-६८ किलो, सुवर्ण), आनंदी सारंगमठ (३६-४० किलो, रौप्य), धनलक्ष्मी बिराजदार (४०-४४ किलो, रौप्य), तनिष्का पवार (६०-६४ किलो, कांस्य).

**मुले :** श्रावण वालीकर (४५-५० किलो, सुवर्ण), नैतिक खुर्द (५०-५४ किलो, सुवर्ण), विश्वजित महावरकर ( ६२-६६ किलो, रौप्य) , संगमेश्वर शिरोडकर (५८-६२ किलो, कांस्य).



# स्वामी विवेकानंद पोलीस पब्लिक स्कूलच्या मुलींना हँडबॉल स्पर्धेत उपविजेतेपद

**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

शालेय शहर हँडबॉल स्पर्धेत स्वामी विवेकानंद पोलीस पब्लिक स्कूलने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात उपविजेतेपद संपादिले. राजीव गांधी इंडो स्टेडियमवर झालेल्या स्पर्धेतीन विद्यार्थिनींची विभागीय चाचणी स्पर्धेसाठी निवड झाली. शहर स्पर्धेत रितिका बिजर्गी , मधुरा भरले, रचना काळे,आरोही अर्जुन, प्राजक्ता असादे, अश्मिरा शेख, विश्वांजली माळवे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. संघास क्रीडा शिक्षक प्रमोद म्हेत्रे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शाळेचे कमिटी सदस्य पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त हसन गौहर, सहायक पोलीस आयुक्त सुरेंद्र माळाळे, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, आय.एम.एस. ग्रुप ऑफ स्कूलचे सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, ममता बसवंती व मुख्याध्यापिका स्वाती कारंडे यांनी अभिनंदन केले.

# उज्वला सोमा व राहूल शेरखाने यांची राज्य व विभागीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

मार्कंडेय जलतरण तलाव येथे झालेल्या विभागीय जलतरण स्पर्धेमध्ये स्वामी विवेकानंद पोलीस पब्लिक स्कूल मॅनेज्ड बाय इंडियन मॉडेल स्कूलच्या उज्वला विनोद सोमा हिची राज्य डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड झाली. विभागीय स्पर्धेत तिने १४ वर्षाखालील १ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग प्रकारात तिने द्वितीय स्थान मिळविले. तसेच शालेय शहर कराटे स्पर्धेत स्कूलच्या खेळाडूंनी कराटे स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. १७ वर्षाखालील वयोगटात सागर राहुल शेरखाने याने ८२ किलो वजन गटावरील यामध्ये प्रथम क्रमांक व सोनाक्षी राजशेखर माळी ५० किलो वजनगटामध्ये तृतीय क्रमांक संपादिला. सागरची या कामगिरीवर पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रमोद म्हेत्रे सर यांचे मार्गदर्शन लाभले. या कामगिरीवर तिची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. तिचे शाळेचे कमिटी सदस्य पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त हसन गौहर, सहायक पोलीस आयुक्त सुरेंद्र माळाळे, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, आय.एम.एस. ग्रुप ऑफ स्कूलचे सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी मॅडम, ममता बसवंती व मुख्याध्यापिका स्वाती कारंडे यांनी अभिनंदन केले.





# विभाग डायव्हिंग स्पर्धेत वालचंदची हर्षदा गोली द्वितीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

पुणे विभागीय शालेय डायव्हिंग स्पर्धेत वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या हर्षदा गोली हिने १९ वर्षाखालील गटात डायव्हिंग स्पर्धेत १मी., ३मी. व हायबोर्ड प्रकारात द्वितीय स्थान संपादिले. तिला क्रीडाशिक्षक राहुल हजारे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ.जीवराज कस्तुरे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.



# क्रिकेट प्रशिक्षक प्रकाश कंपली नेशन बिल्डर पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

हरिभाई देवकरण प्रशालेचे क्रीडाशिक्षक व क्रिकेटचे मार्गदर्शक प्रकाश कंपली यांना रोटरी क्लब ऑफ सोलापूर तर्फे नेशन बिल्डर अवॉर्ड या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. हा सन्मान सोहळा रंगभवन येथील मेसानिक हॉलमध्ये पार पडला.

शिक्षण व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सन २०२५ चा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. रोटरीच्या अध्यक्षा धनश्री केळकर, सचिव निलेश फोफलिया आणि रो. उपरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



कंपली यांनी केलेल्या कार्याबद्दल माहिती ऐकताना त्यांच्या डोळ्यांत अभिमानाचे तेज आणि उपस्थितांच्या हृदयात उत्साहाचे तरंग दाटून आले., गेली अनेक दशके क्रीडाक्षेत्रातील असंख्य विद्यार्थ्यांना शिस्त, परिश्रम, संघभावना आणि आत्मविश्वास यांचे अमूल्य संस्कार यामुळेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी राज्य आणि राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर विजयीची पताका फडकवत आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे शिस्तीचे मंदिर, प्रामाणिकतेचे प्रतिक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# उमा महाविद्यालयाचा श्रीनाथ गोरे महाविद्यालीन कुस्ती स्पर्धेत अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ ऑक्टोबर-**

दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा येथे झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवील होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेत उमा महाविद्यालयाच्या श्रीनाथ गोरे याने ९२ किलो वजनी गटात अजिंक्यपद पटकाविले. त्यास डॉ. आनंद ढवण, कार्यालयीन अधीक्षक एस.एस.लोंढे, व पी.एस शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे संथेचे अध्यक्ष माजी आमदार प्रशांत परिचारक, उपाध्यक्ष मुकुंद परिचारक, खजिनदार रमेश लाड, सचिव राजगोपाल भट्टड, माजी प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक, युवा नेते प्रणव परिचारक तसेच इतर संस्था पदाधिकारी, प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड यांनी कौतुक व अभिनंदन केले.

# इंडियन मॉडेल स्कूलला शालेय हँडबॉल स्पर्धेत विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

शालेय शहर हँडबॉल स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कुल सीबीएसई विभागाने १४ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले. या कामगिरीवर संघाची पुणे विभागीय स्पर्धेकरिता निवड झाली.

राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे झालेल्या या स्पर्धेत त्यांनी अंतिम सामन्यात पोलिस पब्लिक स्कूलला ४- १ ने पराभव केला. सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक राजकुमार माने, वैष्णवी गडदे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष ए. डी.जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिकाअपर्णा कुलकर्णी, ममता बसवंती, अचला रचर्ला मॅडम यांनी अभिनंदन केले.



**विजयी संघ :** कनक राचर्ला, अद्विती चडचणकर, श्रेया सलगरे, रिद्धी शहा, आरोही पाटील, नभा वायचळ, श्रुती कोणदे, अमृता रामशेट्टी, स्वरा शेळके, वैष्णवी बुरूंग, अवंतिका सुरवसे, दर्शना ममनाबद, खुशी दर्बी, अपूर्वा बोंदर, कन्यकापरमेश्वरी हळकुडे, ईश्वरी धवन.

# राज स्कूलला नेहरू हॉकी स्पर्धेत उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

जुनी मिल कंपाऊंड मुरारजी पेठ येथील राज मेमोरियल इंग्लिश स्कूलने शालेय नेहरू हॉकी स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात उपविजेतेपद संपादिले.

संघास क्रीडा शिक्षक अतुल सोनके, आशुतोष जाधव सहाय्यक मार्गदर्शक आकाश मकाई यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी संघाचे संस्थेचे डॉ. राधिकाताई चिलका, डॉक्टर सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका. रोहिणी सुरा आदींनी अभिनंदन केले.




**उपविजेता संघः** आर्यन पाटोळे, सुदर्शन मगरूमखाणे ,वरद दळवी, राज बेलूर, आदर्श व्यवहारे, ओंकार तोरवी, मंगेश कोरे, मो. जैद शेख ,समर्थ कबाडे, ओंकार नरवडे, फैज शेख, केदार ताकभाते, रयान शेख, आरुष चव्हाण, वर्धन सुरवसे, श्रीपाद साळुंखे.

## महत्वाचे...

### घरगुती कारणावरून तरूणाचा गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.१२ ऑक्टोबर-**

घरगुती कारणावरून शिरापूर (ता. मोहोळ) येथे तरूणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना रविवारी दुपारी उघडकीस आली. सोमनाथ बाळू मदने (वय २७, रा. शिरापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या तरूणाचे नाव आहे. सोमनाथ मदने याने रविवारी दुपारी दीडच्या सुमारास राहत्या घरी घरगुती कारणावरून लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी नातेवाईकांनी सोमनाथ यास गळफासातून सोडवून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली.

### गॅसचा भडका उडून तरूण जखमी

**सोलापूर, दि.१२ ऑक्टोबर-**

घरी गॅसवर अंडा ऑम्लेट करीत असतना गॅसचा भडका उडाल्याने तरूण जखमी झाला. सिध्देश्वर काशिनाथ तरटे (वय २६, रा. वाफळे, ता. मोहोळ) असे जखमीचे नाव असून त्यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सिध्देश्वर तरटे हा ११ ऑक्टोबर रोजी रात्री राहत्या घरी गॅसवर अंडा ऑम्लेट करीत असताना अचानक गॅसचा भडका उडाल्याने त्यात भाजून सिध्देश्वर हा जखमी झाला. त्यामुळे त्याला उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शेतीच्या वादातून पती-पत्नीस लोखंडी पाईपने मारहाण

**सोलापूर, दि.१२ ऑक्टोबर-**

शेतीच्या वादातून पती-पत्नीस लोखंडी पाईपने मारहाण करण्यात आली.तात्या महादेव समिंदर (वय ५०) आणि सुनिता तात्या समिंदर (वय ४०, रा. उमरे दहेगाव, ता. माळशिरस) अशी जखमींची नावे आहेत. ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घरी असताना शेतीच्या वादातून शिवाजी महादेव समिंदर, सोनाथ समिंदर, अभिजित तानाजी समिंदर यांनी मिळून लोखंडी पाईप,



लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. त्यात तात्या व सुनिता यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### भांडण सोडविण्यास आलेल्यास मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१२ ऑक्टोबर-**

भांडण सोडविण्यास आलेल्यास मारहाण करणाऱ्यांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत आरती अश्वजीत व्हटकर (वय २५, रा. क्षिरसागर नगर, बार्शी रोड, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन तिवारी, तिवारी यांची पत्नी व सासू (रा. नंदी मठ, बार्शी रोड) यांच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० ऑक्टोबर रोजी दुपारी नंदी मठाजवळ आरती व्हटकर यांचे दीर अभिजित यांचे बांधकामाच्या शेजारी राहणाऱ्या तिवारी यांनी पाण्याच्या कारणावरून व्हटकर यांच्या पतीशी वाद घालून भांडण काढले. यावेळी तिवारी, त्यांची पत्नी व सासू हे व्हटकर यांच्या पतीस शिवीगाळ करून मारहाण करीत असताना आरती व्हटकर या मध्ये गेल्या असता तिवारी यांनी त्यांनाही दगडाने डोक्यात मारून जखमी केले. हवालदार ढोबळे पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकी आडवी आल्याने पती-पत्नी जखमी

सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-

दुचाकी आडवी आल्याने दुचाकीवरून पडून पती-पत्नी जखमी झाले. ही घटना कामती येथे रविवारी दुपारी घडली. शिवाजी गणपती कोळी (वय ६५) आणि कलावती शिवाजी कोळी (वय ४०, रा. अकंलगी तडवळ, ता. अक्कलकोट) अशी जखमींची नावे असून त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. रविवारी सकाळी शिवाजी कोळी व त्यांची पत्नी कलावती काळी हे दोघे मोंडलिंब येथून दुचाकीवरून तडवळकडे डबलसीट जात होते. त्यावेळी कामती गावातील बलराज कृषी केंद्राजवळ दुचाकी समोर अज्ञात दुचाकी अचानक आडवी आल्याने कोळी यांची दुचाकी धडकून ते दुचाकीवरून खाली पडले. यामध्ये शिवाजी कोळी व कलावती कोळी हे दोघेही जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

---

**▸▸ गुप्तधनाचे आमिष दाखवून पावणे दोन कोटींची फसवणूक प्रकरण**

# वकिलासह आणखी चौघांना अटक; मंगळवारपर्यंत पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर -**

जमिनीतून गुप्त धनाचा हंडा काढून देतो असे सांगून ऑनलाईन सेवा केंद्रचालकाची १ कोटी ८७ हजार रुपयांची फसवणुक प्रकरणात शहर गुन्हे शाखेच्या पथकाने वकिलासह आणखी चौघांना अटक केली आहे. याप्रकरणात यापूर्वी भोंदूबाबास अटक केलेली आहे.

आयुब साहेबलाल रचभरे (वय ५०, रा. तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर), दाऊद इब्राहीम पठाण (वय ५०, रा. दक्षिण सदर बझार, सोलापूर), सादीक बाबा उर्फ सादीक हुसेनी फुलारी (वय ३८, रा. अन्सारी चौक, सोलापूर) आणि सचिन रंगनाथ गायकवाड (वय ४६, रा. शिवाजी चौक, दक्षिण कसबा, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे असून त्यांना न्यायालयाने मंगळवारपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याच आदेश दिलेले आहेत. यापूर्वी या गुन्ह्यात मोहम्मद कादरसाब शेख (रा. आदिलशाही नगर, जर्मन बेकरीजवळ, विजापूर, कर्नाटक) या भोंदूबाबाला अटक करण्यात आली असून त्याला सोमवारपर्यंत पोलिस कोठडी मिळालेली आहे. याबाबत गोविंद मल्लिकार्जुन वंगारी (वय ४२, रा. प्लॉट नं. २९, रा. कोंडा नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फसवणुक व महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ नुसार जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



गोविंद वंगारी यांच्या कोंडा नगर येथील घरात गुप्तधानाचा हंडा असल्याचे आमिष दाखवून मोहम्मद शेख याने वंगारी यांना वेळोवेळी मंत्र-तंत्राचा वापर करून वंगारी व त्यांच्या कुटुंबातील लोकांना कोणतेतरी द्रव्य पिण्यास देऊन जादूटोणा करून गुप्तधन दाखवून ते काढण्यासाठी वंगारी यांच्याकडून ७ जून २०२३ ते ३० नाव्हेंबर २०२३ या कालावधीत १ कोटी ८७ लाख ३१ हजार ३०० रुपये घेतले. फेब्रुवारी २०२४ मध्ये शेख याने काढून ठेवलेले दोन हांडे वंगारी यांनी उघडून पाहिले असता त्यामध्ये फक्त माती असल्याचे दिसून आले. घरातील जमिनीमध्ये शेख याने दाखविलेले हांडे काढून पाहिले असता तिथे फक्त पितळ धातूची झाकणे मिळून आली. ॲल्युमिनियमची पेटी काढून पाहिली असता त्यामध्येही काहीही मिळून आले नाही. त्यावेळी वंगारी यांना आपली फसवणुक झाल्याचे समजले. त्यामुळे वंगारी यांच्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन याचा तपास शहर गुन्हे शाखेकडून सुरु आहे. या गुन्ह्यात मोहम्मद कादरसाब शेख भोंदू बाबाचा शोध घेऊन पोलिसांनी त्यास अटक केली. त्याच्याकडे करण्यात आलेल्या तपासामध्ये पोलिसांना सचिन गायकवाड यास वकिलाला ४० लाख रुपये व ९ तोळे सोने दिलेले असल्याचे निष्पन्न झाले. तसेच हा भोंदूबाबा ज्याच्या घरात रहायचा तो आयुब रचभरे, दाऊद पठाण, सादीक बाबा फुलारी यांनीदेखील भोंदूबाबा मोहम्मद शेख याच्याकडून पैसे वाटून घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या सर्वांना अटक करण्यात येऊन रविवारी न्यायालयात हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने चौघांनाही मंगळवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक अरविंद माने, सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय काळे यांच्या पथकाकडून सुरु आहे.

**भोंदूबाबा मोहम्मद शेख याच्या घराचे करारपत्र सचिनच्या नावाने...**

या गुन्ह्यात अटक करण्यात आलेला भोंदूबाबा मोहम्मद शेख हा तेलंगी पाच्छा पेठेतील घर सोडून होटगी रोडवरील घरामध्ये राहण्यास गेला होता. शेख राहात असलेल्या होटगी रोडवरील घराचा भाडेकरार हा सचिन गायकवाड या वकिलाच्या नावे असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. भोंदूबाबा मोहम्मद शेख यास यापूर्वी सन २०२२ मध्ये मंगळवेढा पोलिसांकडून अशाच प्रकारच्या गुन्ह्यात अटक केली होती. त्यावेळी शेख याचा जामीन सचिन गायकवाड यानेच केला होता.

**भोंदूबाबाची टोळीच असण्याची शक्यता...**

या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्यांकडे चौकशी दरम्यान हे सर्व एक टोळी बनून काम करीत असून गिऱ्हाईक शोधून भोंदूबाबा मोहम्मद शेख याच्याकडे घेऊन येत असल्याचे दिसून आले. वंगारी यांचा भाऊजी अंबादास गुर्रम हे देखील या टोळीकडून काही रुपयांचा फसले गेलेले असून गुर्रम यांनीच वंगारी यांना या भोंदूबाबाकडे नेले आहे. त्यामुळे गिऱ्हाईक शोधून आणून द्यायचे आणि सर्वांनी मिळून मलीदा खायचा हाच उद्योग यातून सुरु असल्याचे दिसून येतो. त्यामुळे भोंदूबाबा शेख याच्याकडून आणखी कोणीकोणी पैसे कमविले आहेत हे पोलिस तपासात निष्पन्न होईलच.

---

**▸ सरकार पक्षाने दाखल केलेला साक्षीदाराचा**

# पूर्ण तपास फेरतपासाचा अर्ज जिल्हा न्यायालयात नामंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१२ ऑक्टोबर-**

अक्कलकोट येथील अपहरण व मारहाण या प्रकरणातील फिर्यादी पक्षाने फार विलंबाने दाखल केलेला साक्षीदाराचा पूर्णतपास /फेरतपासाचा अर्ज प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अक्कलकोट यांनी मंजूर केला. सदर आदेशावर नाराज होवून आरोपीने जिल्हा अति सत्र न्यायाधीश, सोलापुर येथे पूर्ण अवलोकन (रिव्हिजन) अर्ज दाखल केला. यात मूळ फिर्यादी हा हरकतदार म्हणून स्वतः वकिलामार्फत हजर झाला.

सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. अनिकेत गुंड यांनी या प्रकरणात विशेष कुशल युक्तिवाद मांडला. सदर यूक्तिवादामध्ये वादग्रस्त ताबा साठेखत हे चौकशीचे वेळी पोलिसांनी त्यांच्या ताब्यात घेतले व ते कोर्टात दाखल देखील होते. परंतु सरकार पक्षाने पुरावा चालू असताना सदर साठेखत (प्रूव) करण्याचे परिश्रम घेतले नाही. परंतु पुरावा संपलेनंतर सरकार पक्षाने त्यांच्या पुराव्या मधील कमतरता भरुन काढण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला होता. यातील सरकार पक्षाने यापूर्वी दोन वेळेस पुर्नवलोकन अर्ज दिला तो मे.कोर्टाने मंजूरदेखील केला होता व नंतर क्रिमिनल प्रोसिजर कोडचे कलम ३१३ नुसार आरोपीचे जबाब झालेनंतर विलंबाने सदरचा अर्ज दिला. आरोपीचेवतीने ॲड. ए. एस. गुंड यांनी बारकावे न्यायालयाचे निदर्शनास आणून दिल्याने जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी अक्कलकोट कोर्टाने मंजूर केलेला साक्षीदार फेरतपासणी आदेश सेट असाइड केला. तसेच सदर खटला सहा महिन्याचे आत पूर्ण करावेत असे आदेश दिले आहेत. या प्रकरणात आरोपींच्यावतीने ॲड. अनिकेत सहदेव गुंड यांनी न्यायालयीन रणनीती आणि कुशल युक्तिवाद मांडून आरोपींना न्याय मिळवून दिला. विशेषतः त्यांनी तपासातील त्रुटी व पुरावे न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडले. या युक्तिवादा मुळेच न्यायालयाने आरोपीचा अर्ज मंजूर केला.

---

# मंगळवेढ्यातील ‘त्या’ २६ पोलीस पाटलांच्या नियुक्तीला हायकोर्टात आव्हान

**● परीक्षा न घेता केलेल्या नियुक्त्या रद्द करण्याची जनहित याचिकेद्वारे मागणी**

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १२ ऑक्टोंबर-**

मंगळवेढा तालुक्यातील २६ गावच्या पोलीस पाटलांना कोणतीही परीक्षा न घेता थेट नियुक्त करण्याचे पत्र उपविभागीय अधिकारी मंगळवेढा यांनी देऊन शासकीय नियमाचा भंग केल्याप्रकरणी कोल्हापूर खंडपीठांमध्ये जनहित याचिका दाखल करण्यात आली असून हंगामीना परीक्षा न घेता मुदतवाद आदेश दिलेल्या त्या २६ पोलीस पाटलांवर सध्या टांगती तलवार निर्माण झाली आहे.

मुंबई हायकोर्टच्या कोल्हापूर सर्किट बेंच मध्ये जनहित याचिकेमध्ये असे म्हटले आहे की,मंगळवेढा तालुक्यामध्ये २६ गावात २०१८मध्ये कोणतीही लेखी व तोंडी परीक्षा न घेता थेट नियुक्ती आदेश देऊन पोलीस पाटलांची नियुक्ती करण्यात आली होती,ती नियुक्ती जास्तीत जास्त पाच वर्षासाठी किंवा वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत जे होईल त्यासाठी होती. मात्र त्यानंतरही त्यांनाच २०२३-२४ मध्ये कोणतीही परीक्षा न घेता वाढीव नियुक्ती देऊन मंगळवेढा उपविभागीय अधिकायांनी नियमाचा भंग केला आहे. त्यामुळे सुशिक्षित पात्र असणाऱ्या तरुणांवर अन्याय झाल्याच्या प्रतिक्रीया आहेत. २८ जून २०११च्या शासन निर्णयामध्ये सोलापूरसह काही जिल्ह्यामध्ये



अपवादात्मक काळात दीर्घकाळ सेवा देणाऱ्या तात्पुरत्या पोलीस पाटलांची एक वेळ उपाय म्हणून नियुक्ती करण्याचा आदेश झाला होता. त्यामध्ये ठरावानुसार दोन वर्षाहून अधिक काळ सेवा बजावलेल्या तात्पुरत्या पोलीस पाटलांना सामान्य वय आणि शैक्षणिक आवश्यकता मध्ये सवलतींसह पाच वर्षाच्या निश्चित कालावधीसाठी किंवा साठ वर्षे वयापर्यंत जे आधी असेल तोपर्यंत नियुक्ती देण्यात आली होती. मात्र, या शासन निर्णयाचा मंगळवेढा प्रांत अधिकाऱ्यांनी भंग करून बेकायदेशीर पुन्हा मुदतवाढ देऊन त्याच पोलीस पाटलांना मुदतवाढ केली आहे. मुदतवाढ देताना कोणतीही लेखी परीक्षा घेण्यात आली नाही, तसेच मुलाखतीही घेण्यात आलेल्या नाहीत, गुणवत्ता यादी किंवा नवीन पॅनल तयार करण्यात आले नाही, त्यामुळे शासनाच्या नियम व अटींचा स्पष्टपणे भंग झालेला आहे असे या जनहित याचिकेमध्ये म्हटले आहे. शासन आदेशाला डावलून मंगळवेढा उपविभागीय अधिकाऱ्यांनी मनमानी पद्धतीने नियुक्ती केल्या आहेत तर तालुक्यातील काही गावच्या पोलीस पाटलांच्या लेखी व तोंडी परीक्षा घेऊन नियुक्त केले आहेत. त्या बेकायदेशीर २६ पोलीस पाटलांची नियुक्ती रद्द करून त्या ठिकाणी आरक्षणा नुसार परीक्षा घेऊन नियुक्त करण्यात याव्यात अशी मागणी मंगळवेढा तालुक्यातील अण्णासाहेब पाटील व त्यांच्या तीन सहकार्यांनी ॲड. रितेश थोबडे यांच्या मार्फत हायकोर्ट बॉम्बे सर्किट बेंच कोल्हापूर खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे.

परीक्षा न घेता २६ जणांना मुदतवाढ दिल्याने २६ गावांतील सुशिक्षित तरुणांचा अपेक्षाभंग झाला असून प्रांत अधिकार्यांनी चुकीच्या पद्धतीने नियुक्ती केल्याने आम्ही जनहित याचिका दाखल केली असून न्यायालय योग्य तो न्याय करेल अशी अपेक्षा आहे.

**- समाधान हेंबाडे,**
प्रहार संघटना तालुकाध्यक्ष मंगळवेढा

**परीक्षा न घेता थेट मुदतवाढ दिलेली २६ गावे :** भाळवणी, माचणूर, देगाव, लेंडवे चिंचाळे, लमाणतांडा, उचेठाण, सिद्धनकेरी, खडकी, सलगर (खू), भोसे, शिरसी, येड्राव, हजापूर, जित्ती, लोणार, लक्ष्मीदहिवडी, शिरनांदगी, खवे, तांडोर, येळगी, मारोळी, शेलेवाडी, खूपसंगी,ममदाबाद(हु), शिवणगी, ब्रह्मपुरी.

---

# २ कोटी १० लाख मॉर्गेज घोटाळा

**आंधळकर कुटुंबाच्या तक्रारीवरुन बार्शी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १२ ऑक्टोबर-**

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील गुंजेवाडी येथील प्रस्तावित रामगिरी शुगर लिमिटेड कारखान्याच्या जमिनीसंदर्भात फसवणुकीचा गंभीर प्रकार उजेडात आला आहे. बार्शी येथील रहिवासी सीमा भाऊसाहेब आंधळकर (वय ६०, गृहिणी) यांनी मुंबईतील सेशन कोर्टात दाखल केलेल्या साखर कारखाना ४९ टक्के शेअर्स आम्हाला मिळावा या वेळेला हा प्रकार उघडकीस आला. त्यांच्या कुटुंबाची ५१ टक्के शेअर्स असलेला साखर कारखान्याच्या जमिनीवर २ कोटी १० लाख रुपयांच्या बोगस मॉर्गेजद्वारे टेम्पो रोड ग्रुप कंपनीने व श्रेयम कंपनीने क्रिमिनल कॉन्फरन्स कंपनीचा हेतू वेगळा व कंपनीची जागा कारखान्याची जागा टेम्पो रोज ग्रुप ऑफ कंपनीला पैसे हवे म्हणून खोटी कागदपत्र खोटा ठराव करून परस्पर पैसे उचलून करोड रुपयांची विल्हेवाट लावली. हा साखर कारखाना शेतकऱ्यांचे हितासाठी चालू होणे आवश्यक आहे.

या प्रकरणात मुंबई आणि पुण्यातील रिअल इस्टेट कारोबारातील प्रमुख नावे, जसे की स्वर्गीय देविदास सजनानी, त्यांचे डायरेक्टर व श्रेयम कंपनीचे छटवाल इतर संचालक यांच्या विरोधात बार्शी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात इतर संचालकांचा समावेश आहे.आंधळकर कुटुंबाने २०११-१२ मध्ये स्व. शिवाजी डिसले यांच्याकडून कारखान्याचे ५१ टक्के शेअर्स जमिनीसह विकत घेतले होते. शेअर्स नोटराईज्ड करारानुसार इंदुबाई, सीमा, डॉ. ज्योती आणि दीपक आंधळकर यांच्याकडे हस्तांतरित झाले. उर्वरित ४९ टक्के शेअर्स मुंबईतील टेम्पल रोज रिअल इस्टेट प्रा. लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर स्व. देविदास सजनानी यांनी घेतले. शेतकऱ्यांच्या हितासाठी कारखाना उभारण्याच्या उद्देशाने आंधळकर कुटुंबाने स्थानिक शेतकऱ्यांकडून शेअर्स गोळा करणे ऊस पुरवठा करणे व व्यवस्थापन सजनानी आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडे कारखान्याचे व्यवस्थापन आणि बँकांकडून साखर कारखाना चालू करण्यासाठी इतर परवानग्या व पतपुरवठा करणे हे काम होते. या मॉर्गेजद्वारे प्रेम कंपनी छटवाल यांच्या फायनान्सकडून दोन कोटी दहा लाख रुपये जे २४ टक्के व्याज दराने होते परस्पर उचलले व त्याची विल्हेवाट लावली. मात्र हे पैसे रामगिरी शुगरच्या अधिकृत खात्यात जमा न करता सजनानी यांच्या वैयक्तिक कंपन्यांमध्ये वळवले गेले. कारखान्याचे रजिस्टर ऑफिस बार्शीत असतानाही, मुंबईतील पारसमणी टॉवर (दादर ईस्ट) येथे बनावट खाते उघडले गेले असल्याचा आरोप आहे.

या घोटाळ्यातील नितन छटवाल (श्रेयम इन्व्हेस्टमेंट, अंधेरी-कुर्ला रोड), वनिता सजनानी, दीपा सजनानी, मार्कस थोरात, केशव इड्डा आणि विनीत तापडिया यांच्याविरुद्ध फौजदारी विश्वासघाताचा वरील कलमांप्रमाणे गुन्हा बार्शी पोलीसांना गुन्हा दाखल करण्याची आंधळकर यांनी केला आहे. रामगिरी शुगरचे प्रमोटर म्हणून आंधळकर कुटुंबाने माजी पोलीस निरीक्षक भाऊसाहेब आंधळकर (एलसीबी, पुणे ग्रामीण) यांच्या माध्यमातून प्रकल्प सुरु करावयाचा आहे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रकरणाची सखोल तपासणी सुरु आहे. टेम्पल रोज रिअल इस्टेट आणि श्रेयम इन्व्हेस्टमेंटच्या दस्तऐवजांची छानणी होईल.

---

### पैशाच्या व्यवहारातून महिलेस मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

पैशाच्या व्यवहारातून महिलेस महिलांकडून मारहाण करण्यात आली. शोभा सचिन गायकवाड (वय ४०, रा. यश नगर भाग २, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

१० ऑक्टोबर रोजी रात्री राहत्या घराजवळ पैशाच्या व्यवहारातून शोभा गायकवाड यांना भाग्यश्री सुरवसे व ऐश्वर्या सुरवसे या दोघींनी लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये सर्वांगास मुका मार लागल्याने शोभा गायकवाड यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

---

# मेफेड्रॉन एमडी ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्यास अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**



**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

सोलापूर जिल्ह्यात मेफेड्रोन एमडी ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केला होता. या टोळीला मेफेड्रोन एमडी ड्रग्जचा पुरवठा करणारा मुख्य सप्लायर मिळून आलेला नव्हता. त्या मुख्य सप्लायरला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली असून त्यास १४ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

फिरोज उर्फ मस्तान रसूल शेख (रा. परंडा, जि. धाराशिव) असे अटक करण्यात आलेल्या मुख्य सप्लायरचे नाव आहे. यापूर्वी या गुन्ह्यात पोलिसांनी मोहसीन इस्माईल शेख (वय ३३, कुमारस्वामी नगर मशीदजवळ, शेळगी, सोलापूर), याकूब अली बागवान (वय ५१, रा. मम्मत पूरा, जि. कलबुर्गी, कर्नाटक), मोहम्मद मतीन हाजी शेख (वय ४९, रा. दर्गा रोड घट्टेवाडी, मोमनपूरा, कलबुर्गी, कर्नाटक), बाबा फरीद अब्दुल सलीम बागवान (वय ३७, रा. बटली अलावा, मोमीनपुरा, कलबुर्गी, कर्नाटक), मुजफ्फर अब्दुल जब्बार शेख (वय ३१, रा. गणेश पेठ, हिंगुलांबिका मंदीर, सोलापूर), इरफान इस्माईल शेख (वय २२, रा. कुमारस्वामी नगर मशिदजवळ, शेळगी, सोलापूर), मुबारक राजअहमद शेख (वय ३२, रा. आदर्श नगर, शेळगी, सोलापूर), अस्लम महम्मंद युसूफ बागवान (वय ४५, रा. ईडब्ल्युएस प्लॉट नं. ३, विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर) यांना अटक करून सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील काही जणांचा जामीन झालेला आहे तर काही जण न्यायालयीन कोठडीत आहेत.

सोलापूर जिल्ह्यात मेफेड्रोन एमडी ड्रग्जचा पुरावठा होत असल्याच्या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ६ ऑगस्ट रोजी पोलिसांना पुण्याहून सोलापूरकडे येत असलेल्य केए ०५ एमएक्स २९४२ या कारची झडती घेऊन कारमधून १८ ग्रॅम मेफेड्रोन एमडी ड्रग्ज जप्त केले होते. या कारवाईत पोलिसांनी मोहसीन शेख, याकूब बागवान, मोहम्मद शेख, बाबा बागवान या चौघांना अटक केली होती. या चौघांकडे करण्यात आलेल्या तपासामध्ये हे चौघे सोलापूर शहरातील मुजफ्फर शेख, इरफान शेख, मुबारक शेख, अस्लम बागवान यांना देऊन त्यांच्याकडून शहर व जिल्ह्यातील लोकांना मेफेड्रोन एमडी ड्रग्ज विकत असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले होते. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ हालचाल करून या गुन्ह्यात एकूण आठ आरोपींना अटक केली होती. या टोळीला ड्रग्जचा सप्लाय करणारा मुख्य सप्लायर फिरोज शेख हा पोलिसांना मिळून आला नव्हता. त्यामुळे पोलिसांचे पथक त्याच्या मागावर होते. १० ऑक्टोबर रोजी पोलिस पथकास परांडा येथील पोलिसांनी फिरोज शेख यास ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली असता पोलिसांनी तात्काळ परांडा गाठून फिरोज शेख यास ताब्यात घेऊन सोलापूर तालुका पोलिस ठाण्यातील गुन्ह्यात अटक केली. त्यास ११ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर केले असता त्यास १४ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिस निरीक्षक संजय जगताप, सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

---

# पंचनाम्यास टाळाटाळ होत असेल तर मला सांगा

**खासदार प्रणिती शिंदेचे अतिवृष्टग्रस्तांना आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१२ ऑक्टोबर**

तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्तांचे पंचनामे करण्यास शासकीय अधिकारी टाळाटाळ करत असतील, तर माझ्याशी संपर्क साधा, असे आवाहन खासदार प्रणिती शिंदे यांनी केले.

अतिवृष्टीग्रस्त हंजगी गावाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि प्रशासनाला तातडीने राहिलेले शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. त्या म्हणाल्या, गावातील अजून काही पंचनामे प्रलंबित असतील, तर ताबडतोब पूर्ण करावेत. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आम्ही तत्पर आहोत. सरकारकडून शक्य तितकी वाढीव मदत मिळवण्यासाठी प्रयत्न करू. यावेळी युवक काँग्रेस अध्यक्ष निशांत कवडे, हंजगीचे सरपंच चनमलप्पा हालोळ्ळे, अंबण्णा कोळी, प्रकाश मनुरे, विकास जाधव, राजू कोळी, निंगू पाटील, आनंदराव पाटील, महेश कोळी, संतोष पाटील, विशाल जाधव उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**आदी नदीवरील अतिक्रमण काढण्यास सुरुवात**
सोलापूर : सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आदीला नदीच्या परिसरातील अतिक्रमण हटवण्यास सुरुवात झाली आहे.



दसरा, दिवाळीनिमित्त
यल्लम्मा हॅण्डलूम 20% पर्यंत सूट
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं.1 : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो.9371289887
शाखा नं.2 : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो.९३७२३५१८६०


# यंदा दिवाळी चार दिवस; शुक्रवारपासून दिपोत्सव पर्व होणार सुरू

● २१ ऑक्टोबरला लक्ष्मीपूजन तर २२ ऑक्टोबरला पाडवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ ऑक्टोबर-**

यंदा दिवाळीतील नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा व भाऊबीज हे मुख्य दिवस स्वतंत्र असल्याने दिवाळी चार दिवसांची असून या दिवाळी पर्वाची सुरूवात शुक्रवार दि. १७ ऑक्टोबरपासून गोवत्सपूजनासह दिपोत्सवाने होत असल्याचे पंचागंकर्ते मोहन दाते यांनी सांगितले.

दिवाळी पर्वात गोवत्सपूजन अर्थात वसुबारसेपासून पौर्णिमेपर्यंत घरोघरी दिपोत्सव करण्याची परंपरा आहे. या वर्षी २० ऑक्टोबर रोजी सोमवारी नरक चतुर्दशी, २१ ऑक्टोबर रोजी मंगळवारी लक्ष्मीपूजन, २२ ऑक्टोबर रोजी बुधवारी दिवाळी पाडवा आणि २३ ऑक्टोबर रोजी गुरूवारी भाऊबीज या प्रमाणे ४ दिवस दिवाळीचे आहेत. दिवाळीच्या या चार दिवसात सर्वत्र आनंदोत्सव साजरा करावयाचा असल्याने दीपमाळ, आकाशदिवे, दिव्यांची रोषणाई करून दीपोत्सव केला जातो. म्हणून या चार दिवसांना दीपावली किंवा दिवाळी असे म्हटले जाते.



वर्षभरातील इतर सण-उत्सव यांचे प्रमाणे दिवाळीचे स्वरूप नसते. सर्व समाजाने दुःख, भेदभाव विसरून चार दिवस आनंदात रहावयाचे असते. काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंत संपूर्ण भारतात दिवाळी साजरी करण्याची पद्धत जवळजवळ सारखीच आहे. मुख्यतः घर, दुकान स्वच्छ करून, दिव्यांची रोषणाई, फराळाचे पदार्थ, गोडधोड पक्वान्न करणे, अभ्यंगस्नान, दिवाळीच्या निमित्ताने आप्तेष्टांनी एकत्र येणे इ. गोष्टी केल्या जातात. पतीने पत्नीसाठी, भावाने बहिणीसाठी, मालकांनी कर्मचाऱ्यांसाठी भेटवस्तू देणे आणि स्नेहभाव दृढ करणे यामुळे संपूर्ण समाजा- कुटुंबात एकोपा राखला जातो. प्रत्येक धर्मीयांच्या सण - उत्सवामुळे संपूर्ण भारतात खरेदी-विक्री होऊन आर्थिक उलाढाल वाढते अर्थातच त्यामुळे आर्थिक स्वास्थ्य प्राप्त होऊन भारताची प्रगति होण्यात या सण-उत्सवांचे मोठे सहकार्य लाभते ही गोष्ट निश्चितच लक्षात ठेवली पाहिजे.

**लक्ष्मीपूजन २१ ऑक्टोबरलाच**

नरक चतुर्दशीच्या दिवशी प्रदोषकाळात अमावास्या असून दुसरे दिवशी २१ ऑक्टोबर रोजी सूर्योदयापासून सायंकाळ पर्यंत अमावास्या असलेल्या दिवशी धर्मसिंधु, पुरुषार्थ चिंतामणि, तिथिनिर्णय इ. ग्रंथांमधील वचनांचा विचार करून मंगळवारी लक्ष्मीपूजन दिलेले आहे. दि.२१ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेले लक्ष्मीपूजन धर्मशास्त्रसंमत असून दिवशी सूर्यास्तापूर्वी अमावास्या संपत असली तरीही मंगळवारी नेहमी प्रमाणे सायंकाळी व प्रदोषकाळात (सूर्यास्तानंतर सुमारे २ तास २४ मिनिटे या कालावधीत) लक्ष्मीपूजन करावे असे पंचांगकर्ते मोहन दाते यांनी सांगितले. महाराष्ट्रात दाते पंचांग, कालनिर्णय, महालक्ष्मी दिनदर्शिका, महाराष्ट्रीय पंचांग नागपूर, निर्णयसागर, सोमण पंचांग, स्वामी समर्थ पंचांग तसेच भारतातील १०० पेक्षा अधिक पंचांगात आणि अन्य सर्व कॅलेंडरमध्येसुद्धा २१ ऑक्टोबर रोजी लक्ष्मीपूजन दिलेले आहे. तसेच आपण गेली अनेक वर्षे जे पंचांग किंवा कॅलेंडर वापरत आहात, त्यामध्ये दिल्याप्रमाणे सण-उत्सव साजरे करावेत, संभ्रम करून घेऊ नये असेही श्री. दाते यांनी सांगितले.

## दिवाळीतील दिवसांची माहिती

**✔ वसुबारस (१७ ऑक्टोबर, शुक्रवार)**
या दिवशी सौभाग्यवती स्त्रीया एकभुक्त राहून (एकवेळ जेवण करून) सायंकाळी सवत्स म्हणजे वासरासह असलेल्या गाईचे खालील श्लोक म्हणून सूर्यास्तानंतर पूजन करतात. या दिवशी दूध, दुधाचे पदार्थ, तळलेले पदार्थ खात नाहीत. आज शहरात अनेक ठिकाणी पूजनासाठी गाई उपलब्ध नसतात अशावेळेस गाय वासराच्या मूर्तीची देखील पूजा करता येते. ते ही शक्य नसल्यास गाईच्या चित्राची पूजा करता येते. मात्र अशा वेळेस गाईच्या गोग्रासाकरिता म्हणून आपल्या भागातील गोशाळेस शक्य ते सहकार्य करावे.

**✔ धनत्रयोदशी, यमदीपदान (१८ ऑक्टोबर, शनिवार)**
आश्विन कृष्ण त्रयोदशी म्हणजेच धनत्रयोदशी, यमराजाला प्रसन्न करण्याकरिता या दिवशी यमदीपदान केले जाते. घरातील अलंकार, सोने - नाणे स्वच्छ केले जाते. विष्णू, लक्ष्मी, कुबेर, योगिनी, गणेश, नाग, द्रव्यनिधी यांची पूजा केली जाते. अपमृत्यु म्हणजेच अकाली, अपघाताने मृत्यु येऊ नये याकरिता सायंकाळी कणकेचा दिवा दक्षिणेस ज्योत करून ठेवावा व घरातील प्रत्येकाने श्लोक म्हणून दिव्यास नमस्कार करावा.

**✔ नरक चतुर्दशी - (२० ऑक्टोबर, सोमवार)**
नरकासुराने १६ हजार १०८ स्त्रीयांना आपल्या बंदीखान्यात डांबून ठेवले होते. हा नरकासूर प्रजेचाही खूप छळ करीत असे. भगवान श्रीकृष्णांनी या नरकासुराचा वध आश्विन कृष्ण चतुर्दशीला करून स्त्रीयांची मुक्तता केली. नरकासुराने श्रीकृष्णाकडे वर मागितला की, आजच्या तिथीला जो मंगलस्नान करेल त्याला नरकाची पीडा होऊ नये. म्हणून नरक चतुर्दशीला पहाटे अभ्यंगस्नान करणे महत्त्वाचे मानले आहे. शरद् ऋतूचा शेवट आणि हेमंत ऋतूचे आगमन अशा संधीकालावर दिवाळीचा सण साजरा करताना पुढे येणाऱ्या थंडीच्या काळासाठी तेल लावून स्नान करण्याची सुरुवात नरक चतुर्दशीच्या अभ्यंगस्नानापासून होते. नरक चतुर्दशीचे दिवशी यमतर्पण करावयास सांगितले आहे. पूर्वीपेक्षा सध्याच्या काळात वेगाने चालविल्या जाणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचे भय वाढले आहे. अपघात, धावपळीचे जीवन, इ. अनेक कारणांमुळे अपमृत्यूचा संभव वाढत असल्याने नरकचतुर्दशीला यमतर्पण करून अपमृत्यु निवारणासाठी यमाची प्रार्थना सर्वांनी करणे आवश्यक आहे. अपमृत्यु येऊ नये म्हणून यमाला खालील १४ नावांनी तर्पण करून त्याची प्रार्थना करण्यास सांगितले आहे. वडील हयात असलेल्यांनी पाण्यात अक्षता (तांदूळ) घालून व नसलेल्यांनी पाण्यात तीळ घालून यम, धर्मराज, मृत्यु, अंतक, वैवस्वत, काल, सर्वभूतक्षयकर, औदुंबर, दध्न , नील, परमेष्ठिन, वृकोदर, चित्र, चित्रगुप्त या नावांनी तर्पण करावे.

**✔ लक्ष्मीकुबेर पूजन - (२१ ऑक्टोबर, मंगळवार)**
शेतकऱ्यांसाठी ज्याप्रमाणे मार्गशीर्षातील वेळा अमावास्या शुभ आहे, त्याप्रमाणे व्यापारी वर्गासाठी आश्विनातील अमावास्या शुभ आहे. पुराणातील कथेप्रमाणे आश्विन अमावास्येस रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करीत असते. जेथे स्वच्छता, शोभा, आनंद आहे अशा ठिकाणी ती आकर्षित होते. म्हणून लक्ष्मीपूजनाचे दिवशी घर, दुकान झाडून, स्वच्छ करून, सुशोभित करून सूर्यास्तानंतर लक्ष्मी व कुबेर यांचे पूजन करून ऐश्वर्य, संपत्ती, समृद्धिसाठी प्रार्थना करावयाची असते.

**✔ लक्ष्मीपूजन मुहूर्त (२१ ऑक्टोबर, मंगळवार)**
दु. ३ ते ४:३०, सायं. ६ ते ८:३०, रात्री १०:३० ते १२:००

**✔ बलिप्रतिपदा (दिवाळी पाडवा) (२२ ऑक्टोबर, बुधवार)**
कार्तिक शुक्ल प्रतिपदेला बलिप्रतिपदा असे म्हणतात. या दिवशी दानशूर अशा बळीराजाची पूजा करण्यास सांगितली आहे. ज्याप्रमाणे चैत्र शुक्ल प्रतिपदेस शालिवाहन शकाचे नवे संवत्सर सुरु होते, त्या प्रमाणे कार्तिक शुक्ल प्रतिपदेस विक्रम संवत्सर सुरु होते. व्यापारी वर्षास सुरुवात होत असल्याने वहीपूजन, दुकानाची पूजा करून नवीन वर्षाचे स्वागत केले जाते. या दिवशी पत्नीने पतीस ओवाळावे म्हणजे दोघांचे ही आयुष्य वाढते.

**✔ वहीपूजन मुहूर्त (२२ ऑक्टोबर, बुधवार)**
पहाटे ३:०० ते ६:००, सकाळी ६:३० ते ९:३०, सकाळी ११:०० ते १२:३०

**✔ यमद्वितीया (भाऊबीज)-(२३ ऑक्टोबर, गुरुवार)**
नरक चतुर्दशी, अमावास्या व बलिप्रतिपदा हे दिवाळीचे मुख्य तीन दिवस आहेत. मात्र या तीन दिवसांना जोडून येणारी भाऊबीज सुद्धा दिवाळीच्या दिवसात गणली जाते. कार्तिक शुक्ल द्वितीयेच्या दिवशी यमराज आपल्या बहिणीच्या हातचे भोजन करून बहिणीचा सत्कार करीत असे, अशी पुराणात गोष्ट आहे. म्हणून या दिवशी बहिणीने भावाला जेवावयास बोलावून त्याला ओवाळावे असे सांगितले आहे.

**▶▶ महत्वाचे...**

### गाडीस कट लागल्याने तरूण जखमी

**सोलापूर, दि.१२ ऑक्टोबर-**
गाडीस कट लागल्याने पडून तरूण जखमी झाला. याबाबत एजाज मकबूल खेड (रा. चिरागअली कब्रस्थान, भुलाभाई चौक) याच्या फिर्यादीवरुन शाहरूख नावाच्या व्यक्तीविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ४ ऑक्टोबर मोतीवाला हॉलसमोर एजाज खेड याच्या ताब्यातील एमएच १३ ईएच ७२२९ या दुचाकीस शाहरूख नावाच्या व्यक्तीने त्याच्या दुचाकीने कट मारला. त्यामध्ये एजाज याच्या उजव्या पायास किरकोळ दुखापत तसेच पोटाचे ऑपरेशन होण्यास कारणीभूत झाला. हवालदार वाघमारे तपास करीत आहेत.

### वृध्दास धडक; दुचाकी महिलास्वारावर गुन्हा

**सोलापूर, दि.१२ ऑक्टोबर-**
भरधाव दुचाकी चालवून वृध्दास धडक देऊन जखमी करणाऱ्या दुचाकी महिला स्वारावर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत लक्ष्मण यल्लप्पा गायकवाड (रा. तिल्याळ, ता. दक्षिण सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन युपी १५ सीए ९२४६ क्रमांकाच्या दुचाकीवरील महिला दिपाली उत्तर चव्हाण (रा. शेळगी) हिच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ ऑक्टोंबर रोजी लक्ष्मण गायकवाड यांचे वडील यल्लप्पा गायकवाड हे राज हाईटस हॉटेलसमोर पायी चालत रस्ता क्रॉस करीत होते. त्यावेळी या महिलेने दुचाकी (युपी-१५ सीए ९२४६) भरधाव निष्काळजीपणे चालवून गायकवाड यास धडक दिली. यामध्ये ते जखमी झाले. अपघातानंतर महिला निघून गेली. हवालदार भद्रशेट्टी तपास करीत आहेत.





सोलापूर : शहरातील विजापूरवेस ते जिल्हा परिषदेकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्ड्यामुळे दुचाकी वाहनांना खड्डा चुकवत जावे लागते. तर दुसऱ्या छायाचित्रात पोलीस मुख्यालया समोरील रस्त्यावरील १० मीटरचा पूर्ण भागातील खडी वर आली आहे. त्यामुळे किरकोळ अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. (छायाचित्रे : केवल तिवारी)

# खड्डेमय रस्त्यांकडे महापालिकचे दुर्लक्ष

सोलापूर : शहरातील विविध मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी खोल खड्डे निर्माण झाले असून अपघातांची शक्यता वाढली आहे. प्रशासनाकडून ठोस उपाययोजना न झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रस्त्यांचे तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्याची मागणी जोर धरत आहे.

# तरूणीच्या मृत्यूप्रकरणी मित्रावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर -**
सोलापूर ते पुणे महामार्गावरील एमआयटी कॉलेजजवळ दुचाकी भरधाव चालवून तरूणीच्या अपघाती मृत्यूप्रकरणी तिच्या मित्रावर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा अपघात ७ ऑक्टोबर रोजी घडला होता.

शिवानी आप्पासाहेब दळवे (वय २५, रा. वडवळ) असे मरण पावलेल्या तरूणीचे नाव आहे. याबाबत ओंकार आप्पासाहेब दळवे (वय २६, रा. वडवळ) याच्या फिर्यादीवरुन प्रथमेश गायकवाड (रा. वडवळ) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ ऑक्टोबर रोजी दुपारी ओंकार याची बहिण शिवानी ही तिचा मित्र प्रथमेश गायकवाड याच्यासोबत त्याच्या एमएच १३ ईए ७६८९ क्रमांकाच्या दुचाकीवर बसून सोलापूर ते पुणे महामार्गावरून जात होती. त्यावेळी एमआयटी कॉलेजजवळ प्रथमेश गायकवाड याने त्याच्या ताब्यातील दुचाकी ही निष्काळजीपणे भरधाव चालविल्याने दुचाकी डिव्हायडरला धडकून अपघात झाला. या अपघातात दोघेही खाली पडून गंभीर जखमी झाले. या अपघातात शिवानी हिचा मृत्यू झाला. शिवानीच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी प्रथमेश गायकवाड याच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक सुतार पुढील तपास करीत आहेत.

# कमी पटसंख्येच्या शाळा होणार बंद!

● जिल्ह्यातील ३५ शाळांचा समावेश
● हजारो शिक्षक होणार अतिरिक्त
● शाळांच्या गुणवत्तेवर परिणाम

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

राज्य शासनाने शून्य पट, एक ते पाच पटसंख्या असणाऱ्या शाळा तात्काळ बंद करण्याचा आदेश दिला आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ३५ शाळांचा समावेश आहे. या निर्णयानंतर शैक्षणिक संघटना संतप्त झाल्या असून, शाळा बंद करण्याच्या निर्णयावर तीव्र विरोध होत आहे.

बंद करण्यात येणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना जवळच्या शाळांमध्ये समाविष्ट करावे. तसेच, समावेश झालेल्या विद्यार्थ्यांसाठी महिन्याला सहाशे रुपये दराने वाहतूक भत्त्याची तरतूद करावी, अशी सूचना केली आहे. शिक्षण विभागाच्या या निर्णयावर शैक्षणिक संघटनेने विरोध दर्शवला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा हक्क धोक्यात येईल. बंद केलेल्या शाळांमुळे मुलांना शाळेत जाण्यासाठी जास्त अंतर पार करावे लागेल. वाहतूक भत्ता असला तरी ती अपुरी सुविधा ठरेल. शासनाने बंद करावयाच्या शाळांचा यू-डायस क्रमांक सादर करण्यासह तात्काळ प्रस्ताव पाठवण्याचे आदेशही दिले आहेत. परंतु शाळा बंद केल्यास, शिक्षकांची भरती, इमारतीची देखभाल, इतर प्रशासनिक जबाबदाऱ्यांची स्पष्ट सूचना दिली. शिक्षण हक्क कायद्यात शाळा बंद करण्याची कोणतीही तरतूद नसताना तसेच प्रत्येक गावात, वाडी-वस्ती दुर्गम भागात शिक्षण पोहोचविण्याच्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या पूर्वापार चालत असलेल्या धोरणाच्या विसंगत आहे. ५ किंवा ५ पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा प्रामुख्याने वाडी- वस्ती- तांडे अशा दुर्गम भागात आहेत.

जंगलव्याप्त भाग, ओढे-नद्या ओलांडून जाणे अशा भागातील गरीब आदिवासी, कष्टकरी वंचितांच्या त्यांच्या गावातच शिक्षणाची व्यवस्था कायम ठेवणे आवश्यक असताना अशा शाळा बंद करून तेथील बालकांचे प्रामुख्याने मुलींचे शिक्षण थांबणार आहे. गावातीत शाळा बंद करून वाहतूक व्यवस्था करण्याचा उपाय समर्थनीय नाही.

त्यातून या गावातील मुले-मुली शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडण्याची भीती असून ते कायम शाळाबाह्य होतील. येत्या काळात पुणे विभागीतील सोलापूर, पुणे, कोल्हापूर, सांगली, जिल्हा परिषद शाळा सुद्धा कमी पट संख्या मुळे शाळा बंद होणार अशी शक्यता आहे.

**शून्य तसेच एक ते पाच पटसंख्या असणाऱ्या तालुका निहाय शाळा**

| तालुका | शाळा | पटसंख्या |
|---|---|---|
| अक्कलकोट | ०५ | २२ |
| बार्शी | ०१ | ०० |
| करमाळा | ०६ | २१ |
| माढा | ०५ | १६ |
| माळशिरस | ०४ | १२ |
| मंगळवेढा | ०४ | १३ |
| मोहोळ | ०२ | ०६ |
| पंढरपूर | ०३ | ०७ |
| सांगोला | ०४ | १० |
| उत्तर सोलापूर | ०१ | ०४ |
| एकूण | ३५ | १११ |

**करमाळा तालुक्यातील सर्वात जास्त शाळा**
शून्य ते पाच पटसंख्या असणाऱ्या जिल्ह्यातील ३५ शाळांचा समावेश आहे. यामध्ये करमाळा तालुक्यातील सर्वाधिक सहा शाळा आहेत, तर सर्वात कमी प्रत्येकी एक शाळा बार्शी आणि उत्तर तालुक्यात आहेत. दक्षिण तालुक्यात एकही शून्य ते पाच पटसंख्या असणाऱ्या शाळा नाहीत.

**विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहातून बाहेर फेकले जाणार**
एक ते पाच पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद करण्याचा निर्णय दुर्दैवी आहे. या प्रकाराने त्या शाळेत असणारे विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहातून बाहेर फेकले जाणार आहेत. ज्या शाळेत विद्यार्थ्यांचे समायोजन करण्यात येणार आहे. त्या शाळा दूर असल्यामुळे त्या शाळेत पालक आपल्या पाल्यांना पाठविणार नाहीत. शाळा बंद करण्यापूर्वी शिक्षकांना पटसंख्या वाढीसाठी संधी देण्याची गरज आहे.
**-भिमाशंकर बबलेश्वर, सरपंच, भंडारकवठे**

# अर्हन मिठारीला पद्माकर देव स्मृती गौरव पुरस्कार प्रदान

▶▶ पंडित आनंद बदामीकर आणि प्रा. सुलभा पिशवीकर यांच्या हस्ते सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

श्रुती मंदिर सोलापूरच्या वतीने गुरुवर्य स्व. पद्माकर देव यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त आयोजित स्मृती गौरव पुरस्कार प्रदान सोहळ्यात कोल्हापूर येथील तरुण गुणी कलाकार अर्हन मिठारी याला सन्मानित करण्यात आले. अवघ्या एकवीस वर्षांचा असलेला अर्हन मिठारी हा २१ विविध वाद्ये वाजवतो, ज्यात अनेक परदेशी वाद्यांचा समावेश आहे. त्याचा सप्रयोग सादरीकरण आणि मुलाखत या सोहळ्याचे खास आकर्षण ठरले.



हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात हा पुरस्कार प्रदान समारंभ पार पडला. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तबलावादक पंडित आनंद बदामीकर आणि शास्त्रीय गायिका प्रा. सुलभा पिशवीकर यांच्या हस्ते अर्हनला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत संस्थेचे अध्यक्ष ॲड. जे. जे. कुलकर्णी यांनी केले. त्यानंतर ॲड. कुलकर्णी आणि कार्यवाह विद्या काळे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेयस देशपांडे यांनी केले. समृद्धी शिंदे यांनी आभार मानले. आशिष मिठारी, पुष्पा आगरकर, विद्या लिमये, पद्माकर कुलकर्णी, मोहन सोहनी, सुधीर देव, सुहास मार्डीकर, प्रशांत देशपांडे, अमोल धाबळे यांच्यासह संगीत रसिक उपस्थित होते.

**संगीताप्रती असलेली त्याची निष्ठा**

पंडित बदामीकर म्हणाले, ''आजच्या पिढीतील कलाकारांमध्ये एवढ्या मोठ्या संख्येने आणि त्यातही परदेशी वाद्यांवर प्रभुत्व मिळवणारा अर्हन हा एक विस्मयकारक कलावंत आहे. २१ वाद्ये वाजवणे ही केवळ त्याची मेहनत नाही, तर संगीताप्रती असलेली त्याची निष्ठा आणि तीव्र ओढ दर्शवते. त्याच्या हातात जादू आहे आणि त्याचे भविष्य उज्ज्वल आहे. त्याने आपल्या कलेच्या माध्यमातून भारताचे नाव जगभर रोशन करावे.''

**प्रतिभा तरुण पिढीसाठी प्रेरणादायी**

प्रा. पिशवीकर म्हणाल्या''अर्हन मिठारी वाद्यांमधून भावना आणि आत्मा व्यक्त करतो. २१ वाद्यांमधील वैविध्य जपत त्याने प्रत्येक वाद्याचा बाज आत्मसात केला आहे. त्याची ही प्रतिभा तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे. भारतीय संगीताचा आणि इतर जागतिक संगीताचा संगम त्याच्या कलेतून दिसतो.''

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १२३६

**ज्ञाप्रीती कीर्ती तुझी असे संतजन । सांभाळा स्वजन अहर्निशी ॥**
**सेना म्हणे संत-कीर्ती अखंड । आयुष्य उदंड देई मज ॥**

संसारात अडकलेला आणि मी म्हणजे सर्वस्व म्हणणारा व स्वतःवर अतोनात प्रेम करणारा तसेच ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध, लोभ, मीपणा आदिला जवळ करणारा हा जीव संधी मिळाली तर भगवंताला काय मागेल, हे खरोखर सांगण्यापलिकडचे असेल. नाशवंत आणि भौतिक सुखाबरोबर दुसऱ्याचे वाटोळे व्हावे, अशी मागणी करण्याताही हा जीव मागे राहणार नाही. आपला देह सत्कारणी लागावा अशी सद्बुद्धी मागणारा जीव दुर्मिळच असेल. मनाभावातून निःस्वार्थ प्रेमाने चांगल्याची स्तुती, कीर्ती या जीवाकडून क्वचितच घडते. संत महात्म्यांच्या बाबतीत मात्र या जिवाच्या निश्चितच उलट घडते. संत, महात्मे नाशवंत, भौतिक सुख मागत नाहीत. तरीपण हा देह, हे आयुष्य जास्त काळ टिकावा. कारण या देहाकडून आयुष्यभर जनसेवा व्हावी. त्याचबरोबर व्यक्तिला माणूस बनवण्याचा प्रयत्न करणा-या संत, सज्जनांचे गुणगान करता यावे, त्यांची किर्ती सांगता यावी, यासाठी उदंड आयुष्य लाभावे, अशी मागणी संत, महात्मे भगवंताजवळ करतात. सेनाजींच्या बाबतीत,



**प्रीती कीर्ती तुझी असे संतजन । सांभाळा स्वजन अहर्निशी ॥,**
**सेना म्हणे संत-कीर्ती अखंड । आयुष्य उदंड देई मज ॥,**

यापेक्षा वेगळी मागणी होण्याचे कारणच नाही. संत सेवा करता येण्यासाठी, त्यांची कीर्ती इतरांना सांगता येण्यासाठी भरपूर आयुष्य मिळावे असे सेना महाराज म्हणतात. संत सेवा करण्याची, संत चरित्र सांगण्याची, संतवचनांचा प्रसार करण्याची अपेक्षा जवळपास सर्वच संतांनी केल्याचे त्यांच्या अभंगावरून दिसून येते. नामदेव महाराजही,

**हेंचि घडो मज जन्मजन्मांतरी । मागणें श्रीहरि नाहीं दुजें ।**
**मुखीं नाम सदा संतांचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव ॥,**

असे म्हटले आहे. भक्तचरित्राचा प्रसार करणारा मला खूप आवडतो. मी त्याच्याशी मैत्री करतो, त्याच्यावर खूप प्रेम करतो, असे श्रीकृष्ण भगवंतानी अर्जुनाला म्हटल्याचे श्री ज्ञानेश्वर माऊलींनी श्री ज्ञानेश्वरीत सांगताना,

**तेणेंसीं आम्हां मैत्र । एथ कायसें विचित्र ।**
**परि तयाचें चरित्र । ऐकती जे ॥, तेही प्राणापरौते ।**
**आवडती हें निरुतें । जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ॥,**

असे म्हटले आहे. आपणालाही चांगल्याबद्दल बोलण्यात आनंद वाटला पाहिजे. चांगल्यांच्या विचारांचा प्रसार केल्याने समाजातील चुकीच्या बाबी कमी होण्यास मदत होते. चांगल्यांना नांव ठेवून ते कसे वाईट आहेत, हे दाखवण्याचा प्रयत्न कर नये. जे चांगले आहे ते चांगलेच म्हटले पाहिजे. चांगले कोणाकडून हा मिळेना, त्याचा स्वीकार करता यावा. अशाने आनंद वाढतो. दुसऱ्यांना कमी लेखण्याने आपले मोठेपण वाढत नसते, हे पक्के लक्षात ठेवावे. चांगले म्हणायला पैसे लागत नाहीत. चांगल्यांना चांगले म्हणत गेलो तर आपली वृत्ती सकारात्मक होत जाते, ज्याचा फायदा आपणास होतोच.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - चांगला दिवस, कालाष्टमी, कराष्टमी, |
| दि. १३ ऑक्टोबर २०२५ | |
| विक्रम संवत् २०८२ | बिरदेव यात्रा हन्नूर |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - अश्विन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. सप्तमी (१२.२४) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - आर्द्रा (१२.३६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिघ (०८.०९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (२३.४१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# स्थानिक निवडणुकीत बसपाला चांगले यश मिळेल

### बसपा कार्यकर्ता मेळाव्यात माजी खासदार राजाराम यांनी व्यक्त केला विश्वास




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

बसपा हा एक आदर्श विचारधारा जोपासणारा पक्ष आहे. महाराष्ट्रातही आपण होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज संस्थांमध्ये सर्वत्र पाय रोवले पाहिजे. महाराष्ट्रात यंदा निवडणुकीत बसपाला चांगले यश मिळेल. त्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे, असे आवाहन बसपाचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी माजी खा. राजाराम यांनी सोलापुरात केले.

डी.एस.फोर, बामसेफ व ब.स.पा.चे संस्थापक कांशिराम यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाराष्ट्र प्रदेश युनिटच्या वतीने अभिवादन सभा व कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन सोलापुरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बसपाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश प्रभारी माजी खा. राजाराम, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अॅड.सुनिल डोंगरे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रदेश सचिव अॅड. संजीव सदाफुले, प्रदेश सचिव अप्पासाहेब लोकरे, जिल्हाध्यक्ष बबलू गायकवाड , शहर अध्यक्ष देवा उघडे, रशीद सरदार, टी. एन. लोहार, दीपक ताकतोडे, शिलवंत काळे, दत्तात्रय वाडेकर, प्रवीण कांबळे, सुभाष गायकवाड आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बसपाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश प्रभारी माजी राज्यसभा खा. राजाराम तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अॅड.सुनिल डोंगरे यांनी महाराष्ट्रातही आपण आपल्या होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज संस्थांमध्ये सर्वत्र पाय रोवले पाहिजे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात गायक विशाल मोरे यांच्या भिमगीत गायनाने झाली. याप्रसंगी कार्यकर्ते, पदाधिकारी, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. आयेशा पठाण यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या भाषा व वाङ्मय संकुल या विभागात कार्यरत असलेल्या डॉ. आयेशा पठाण यांना २०२२-२३ सालाकरिता राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार महाराष्ट्र सरकारच्या अल्पसंख्यांक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. त्यांना हा पुरस्कार विद्यापीठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या श्रेणीमध्ये देण्यात आला.

डॉ. आयेशा पठाण यांनी आतापर्यंत राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय सेमिनारमध्ये ४० लेख प्रकाशित केले आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव डॉ. अतुल लकडे व भाषा संकुलचे संचालक, डॉ. अंजना लावंड, डॉ. असिफ इक्बाल शेख, डॉ. इ.जा. तांबोळी व डॉ. गौस शेख आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.

# जैन तत्वज्ञान म्हणजे खऱ्या भारतीयत्वाची ओळख

### डॉ. ऋतुराज बुवा; क्षमावली पर्व उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

क्षमा हेच वीरत्वाचं लक्षण असं जैन धर्म आपल्याला शिकवतो. सोलापूर नगरीनं आज पर्यंत अनेक क्षमाशील महापुरुष भारताला दिले आहेत. शेठ वालचंदजींचा समृद्ध असा, धार्मिक आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचा वसा अविरतपणे चालविण्याचं पवित्र काम वालचंद शिक्षण समूह करीत आहे. अप्पासाहेब काडादिंचीही हीच शिकवण होती. क्षमावली पर्वाच्या निमित्ताने मी आज वालचंद महाविद्यालयात स्वतःला तपासण्यासाठी आलो आहे. असे गौरवोद्गार, संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा यांनी काढले. समारंभाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी भूषविले. यावेळी पर्युषण-पर्व काळात श्री रवींद्र काळे यांच्या मार्गदर्शनातआयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धांमध्ये विशेष प्राविण्य संपादित केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कशिश पुजारी, सौंदर्या सोगळे, गायत्री धोत्रे, लक्ष्मी श्रीनाळे, कृष्णा सोनवणे, मंजुळा लोणीया विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. डॉ. दिपाली राजमाने यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. महावीर साबळे यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. सिद्राम सलवदे, डॉ. संगमेश्वर नीला, डॉ. चंद्रकांत चव्हाण, डॉ. आनंद महाजन, डॉ नागनाथ धायगोडे, डॉ महादेव आसबे, डॉ स्मिता ढावरे, डॉ माधुरी शास्त्री, डॉ पद्मावती पाटील, डॉ मनीषा चवरे, डॉ मेघा मुळूजकर, डॉ. राधिका म्हेत्रे उपस्थित होते.

## सप्टेंबरमध्ये रेल्वे मालवाहतुकीत ८६.२१ टक्के इतकी वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने सप्टेंबर २०२५ मध्ये मालवाहतुकीत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे, ज्यामुळे मालवाहतुकीचे प्रमाण आणि महसूल निर्मिती दोन्हींमध्ये चांगली वाढ दिसून आली आहे.

मालधक्का अरग, बाळे, भिगवण, धाराशिव, कुर्डुवाडी, लातूर, पंढरपूर, सोलापूर, ताज सुलतानपूर, तिलाटी आणि वाडी याठिकाणी आहे. एसीसी सिमेंट/वाडी, अल्ट्राटेक सिमेंट/होटगी, चेट्टीनाड सिमेंट/तिलाटी, झुआरी सिमेंट/तिलाटी, एनटीपीसी/होटगी आणि आयओसीएल (पेट्रोलियम) हिरेनदुरु आणि पाकणी येथे आहे.

सप्टेंबर २०२५ मध्ये, विभागाने गेल्या वर्षीच्या याच कालावधीत सप्टेंबर २०२४मध्ये २९०००० मेट्रिक टन माल लोडिंगच्या तुलनेत ५४०००० मेट्रिक टन माल लोडिंग साध्य केले, ज्यामुळे ८६.२१% ची अभूतपूर्व वाढ झाली. मालवाहतुकीतून मिळणारे उत्पन्न देखील प्रभावीपणे वाढून ३५.९९ कोटी झाले, जे गेल्या वर्षीच्या तुलनेत ७०.९९% ने वाढले आहे. यातून विभागाच्या ऑपरेशनल कार्यक्षमता आणि ग्राहक-केंद्रित दृष्टिकोनाची पुष्टी होते.

सोलापुर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटिल यांनी सोलापूर, कलबुरगि, लातूर, धाराशिव, सांगली आणि पुणे जिल्ह्यातील उद्योग, कारखाने आणि व्यापाऱ्यांना, विशेषतः सोलापूरमधील साखर कारखाने आणि शेतकरी उत्पादकांना, रेल्वेने पुरवलेल्या मालवाहतुकीच्या सुविधांचा वापर करून देशाच्या विविध भागात त्यांचा व्यापार वाढवावा असे यांनी आवाहन केले आहे.

## पहिला सब-५० एचपी कॅबिन ट्रॅक्टर सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

ग्रोमॅक्स अॅग्री इक्विपमेंट लिमिटेड (पूर्वीचे महिंद्रा गुजरात ट्रॅक्टर लिमिटेड), जे महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड आणि गुजरात सरकार यांच्यातील संयुक्त उद्यम आहे. यांनी ४डब्लू.डी आणि २ डब्लू.डी कॅटेगिरीमध्ये ८ नवे ट्रॅक्टर लॉन्च केले आहेत. यामध्ये भारतातील पहिली फॅक्टरी-फिटेड कॅबिन सिरीज (सब-५० एचपी सेगमेंट) समाविष्ट आहे.हे ट्रॅक्टर बागायती शेती, सुपारी शेती, इंटर-कल्टिव्हेशन, पडलिंग आणि हॉलेज यांसारख्या विविध शेती गरजांसाठी उपयुक्त ठरणार आहेत. लॉन्चच्या वेळी बोलताना विजय नाकरा-प्रेसिडेंट, फार्म इक्विपमेंट बिझनेस, महिंद्रा अँन्ड महिंद्रा लिमिटेड म्हणाले, ग्रोमॅक्समध्ये आमचे ध्येय म्हणजे भारतीय शेतीच्या बदलत्या गरजांना अनुरूप, विश्वासार्ह उत्पादने उपलब्ध करून मॅक्सिमम ग्रोथ साध्य करणे.

# श्यामची आई हे पुस्तक सर्वांनीच वाचावे : डॉ. ठकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**



श्यामची आई हे पुस्तक सर्वांनीच वाचावे. आई व शिक्षक दोघांच्याही भूमिका तितक्याच महत्त्वाच्या आहेत. आई जन्म देते तर, शिक्षक संस्कार देतात, असे विचार औसा येथील निवृत्त प्राचार्या डॉ. कमल ठकार यांनी व्यक्त केले.

अ.भा. साने गुरुजी कथामाला, जिल्हा समिती सोलापूरच्या वतीने आयोजित बालसाहित्य, गुणवंत शिक्षक व किशोरी पुरस्कार, पुस्तक प्रकाशन, समारंभात त्या अध्यक्ष पदावरून बोलत होत्या. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून, गुलाब पाटील, श्रुती वडगावकर, राजेंद्र भोसले, ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, अशोक खानापुरे, यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

अरुण धुमाळ, डॉ. रामचंद्र धर्मसाले, सुनील पुजारी व ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी साने गुरुजींच्या प्रार्थनेचे, म. गांधींच्या भजनाचे गायन केले. कथामाला अध्यक्ष अशोक खानापुरे, यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मान्यवरांचा सत्कार झाल्यानंतर परभणीचे प्रा. केशव वसेकर यांना प्रकाश भाई मोहाडीकर स्मृति-बाल सेवा साहित्य पुरस्कार, तर म होळच्या डॉ. स्मिता पाटील यांना निर्मला मठपती स्मृति-साहित्य पुरस्कार, सन्मान चिन्ह, सन्मान पत्र शाल, ग्रंथ व प्रत्येकी २५०० रु. रोख देऊन प्रदान करण्यात आला. डॉ. अंजली शिरसी, प्रा. जगन्नाथ पांढरे, प्रभानंद पाटील, प्रशांत रायचुरे, अनिल गावडे, सिद्धेश्वर घुगरे, शहाजी देशमुख, शावरसिद्ध पाटील, गौरादेवी स्वामी, अंबु गुळवे या गुणवंत शिक्षकांचा, आणि चुनीलाल दगडूशेठ स्मृति- प्रीत्यर्थ देण्यात येणारा किशोरी पुरस्कार, श्रावणी सूर्यवंशी यांना प्रदान करण्यात आला.

राजेंद्र भोसले लिखित घालू गवसणी आकाशाला आणि आधार या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा परिचय कार्यवाह डॉ. धर्मसाले यांनी तर गुणवंत शिक्षकांचा परिचय प्रा. अशोक म्हमाणे यांनी करून दिला. कथामालेच्या उपाध्यक्षा आरती काळे यांनी सूत्रसंचालन केले. कोषाध्यक्ष सुनील पुजारी यांनी आभार मानले.

## सुगम गायन स्पर्धेत स्वरदा मोहोळकर प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आयोजित युवा महोत्सवातील सुगम गायन स्पर्धेत स्वरदा उमेश मोहोळकर हिने प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत तिने चुकचुकली पाल एक कालचक्र क्षण चुकले नकळत या रात्रीला मी माझे दिन विकले हे गीत सादर केले. गानकोकिळा लता मंगेशकर यांनी हे गीत गायले असून ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे यांनी संगीतबद्ध केले आहे.



तसेच स्वरदाला शास्त्रीय गायनातही तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तीने मारुबिहाग हा राग सादर केला. त्यात यासाठी तिला तिच्या गायन गुरु सौ. शर्वरी झंकार कुलकर्णी तसेच श्री.झंकार कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. पारंपरिक भजन (अभंग) गायन स्पर्धेतही तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. त्यात तीने संपती सोहळा नावडे रे मनाला हा संत तुकाराम महाराज यांनी रचलेला अभंग सादर केला. या अभंगाला सोलापूर येथील रंजन पंचवाडकर स्वरबद्ध केला असून मनोज अंकुश यांनी पखवाज साथ केली आहे.




## सोलापूर हेड पोस्ट ऑफिसतर्फे जवानांसाठी दिवाळी फराळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

देशाच्या सीमेवर दिवसरात्र सज्ज राहून राष्ट्ररक्षणाची जबाबदारी पार पाडणाऱ्या आपल्या जवानांसाठी सोलापूर हेड पोस्ट ऑफिसतर्फे दिवाळी फराळ प्रेषित करण्याचा उपक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमांतर्गत कै. वि. मो. मेहता विद्यालय, हरिभाई देवकरण विद्यालय, एस. पी. एम. इंग्लिश स्कूल, नूतन मराठी प्रशाला, एन. व्ही. एम. शिशु शाळा या शाळांनी मिळून जवळपास ६६३ किलो वजनाचा दिवाळी फराळ ५१ पार्सलद्वारे देशाच्या सीमावर्ती भागातील सैनिकांना पाठविला. फराळामध्ये चकली, लाडू, करंजी, शेव, चिवडा, अनारसे यांसारख्या पारंपरिक पदार्थांचा समावेश करण्यात आला होता.

विद्यार्थ्यांनी स्वतः प्रेमाने फराळ तयार करून सुंदर पॅकिंगद्वारे हे पार्सल सजविले. या प्रत्येक पार्सलसोबत विद्यार्थ्यांनी जवानांसाठी दिवाळी शुभेच्छा पत्र सुद्धा जोडले. या उपक्रमाबद्दल सुकदेव मोरे, वरिष्ठ पोस्टमास्तर, सोलापूर प्रधान डाक घर, सोलापूर यांनी सर्व शाळा, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांचे आभार मानले.

जर कोणाला असे पार्सल पार्सल जवानांना किंवा परदेशात राहत असलेल्या नातेवाईकांना पाठवायचे असेल तर पोस्ट ऑफिस मध्ये पार्सल बॉक्सेस वेगवेगळ्या आकारात उपलब्ध असून नागरिकांनी ह्या सेवेचा लाभ घ्यावा व सोलापूर प्रधान डाक घर येथे संपर्क साधावा.

# विधायक कार्य राष्ट्र उभारणीसाठी प्रेरक

### डॉ. वडकबाळकर : नेशन बिल्डर पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**




विधायक दृष्टीकोनातून होणारे मानवतेचे कार्य हे नव राष्ट्राच्या उभारणी प्रेरक आहे. त्या दृष्टीने काम करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांसह सामाजिक संस्थेला एकाच व्यासपीठावर आणून त्यांचा सन्मान करीत त्यांना प्रोत्साहन देण्यासह इतरांना प्रेरणा देण्याची विधायकता रोटरी क्लब ऑफ सोलापूर मेट्रोने केली आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. श्रतीश्री वडकबाळकर यांनी केले.

जुळे सोलापुरातील विद्या कॉम्प्युटर्स व रोटरी क्लब ऑफ सोलापूर मेट्रो यांच्या तर्फे शनिवारी (दि. ११) 'नेशन बिल्डर' पुरस्कारांचे वितरण रामलाल चौकातील साईप्रसाद हॉटेल येथे झाले. त्याप्रसंगी डॉ. वडकबाळकर बोलत होत्या. प्रवर डाकपाल सुखदेव मोरे, निसर्गोपचार तज्ज्ञ हेमंत खेडेकर, रोटरी क्लब ऑफ मेट्रोचे अध्यक्ष अमित कामतकर, सचिव डॉ. नील अंजुटगी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्तविक अध्यक्ष अमित कामतकर यांनी केले. सचिव डॉ. अंजुटगी यांनी रोटरीच्या कार्य, उपक्रमांची माहिती दिली. आदिती कामतकर यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी मोरे, अॅड. अग्निहोत्री, खेडेकर यांची भाषणं झाली.

नितीन वैद्य यंना बाळकृष्ण कामतकर स्मृती पुरस्कार सोलापुरातील प्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक नितीन वैद्य यांना विद्या फाउंडेशनतर्फे देण्यात येणाऱ्या (स्व.) बाळकृष्ण रंगनाथ काम तकर पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. पाच हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

गौरवपत्राचे वाचन अॅड. अग्निहोत्री यांनी केले. तर, सूत्रसंचालन आदित्य कामतकर यांनी केले.

**नेशन बिल्डर अवॉर्डने यांचा झाला सन्मान**
**शैक्षणिक क्षेत्र :** गगन अंकुशे, माधवी पांचाळ, सिद्धराया मेत्री
**कला, नाट्य क्षेत्र :** अॅड. सारिका अग्निहोत्री
**वैद्यकीय :** डॉ. विद्याधर चव्हाण
**सामाजिक :** रानवेध फाउंडेशन, मंद्रूप



## माळकवठे येथे महर्षी वाल्मिक जंयती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

माळकवठे (ता. दक्षिण सोलापूर) येथे महर्षी वाल्मिक जंयती साजरी साजरी करण्यात आली.

वाल्मिक जंयतीनिमित्त मंडळाकडून मिरवणुकीचा खर्च टाळून ते पूरग्रस्त निधी म्हणून देण्यात येणार आहे, असे घोषित केले. मंडळाकडून सलग पाच दिवस महाप्रसादाचा वाटप करण्यात आला. उत्राठा गटाचे उपनेते शरदा कोळी यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास नागेश बिराजदार सोलापूर जिल्हा समाज सेवा मंडळ सचिव, सोलापूर जिल्हा मार्केट काय कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चंद्रकांत खुपसांगे, उबाठा गटाचे तालुकाप्रमुख रविशंकर घंटे, हनुमंतराव कुलकर्णी, कपिल कोळी, माजी जि.प. सदस्य अप्पासाहेब काळे, सरपंच जयश्री सगरे, अमोगसिद्ध थोरात, पंचाक्षरी स्वामी, कुतब शेख, सिद्धाराम बगले, अजित स्वामी, अनिल थोरात, हणमंत बगले, प्रकाश शेतसंदी, प्रकाश कोळी, दयानंद कोळी, उमेश शेतसंदी, अभिजीत कोळी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# सर्व्हर डाऊनमुळे लाडक्या बहिणी वैतागल्या; ई-केवायसी करताना होतोय मनस्ताप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

राज्य सरकारकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत लाडक्या बहीणींना दरमहा एक हजार पाचशे रूपये देण्यात येतात. मात्र या योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या महिलांना दोन महिन्याच्या मुदतीमध्ये ई- केवायसी बंधनकारक केले आहे. त्यामुळे सध्या पात्र लाभार्थी महिलांना ई-केवायसी करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. पहिल्या दिवसापासूनच सर्व्हर डाऊन आणि ओटीपी मिळण्यातील तांत्रिक अडचणींमुळे लाडक्या बहीणी वैतागल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील 'लाडक्या बहिणींमध्ये नाराजी आहे.

जिल्ह्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दोन महिन्यांच्या आत ई-केवायसी करणे अनिवार्य असल्याने लाडक्या बहिणी ई- केवायसीसाठी सीएससी सेंटर्स, सेतू केंद्रावर गर्दी करत आहेत. मात्र, ई-केवायसीसाठी असलेले पोर्टल चालत नसल्याने ओटीपी येण्यास अडथळे येत आहेत. याशिवाय सतत एरर, योजनेसाठी पात्र नाहीत, संकेतस्थळावर खूप लोड आहे, असे संदेश येत असल्याने ई-केवायसी होत नाही. एका ई-केवायसीसाठी दोन ते तीन दिवस लागत असल्याने लाडक्या बहिणी वैतागल्या आहेत. वेबसाइट अपडेशनकडे लक्ष दिले जात नसल्याचे दिसून येते. सरकारी पोर्टल्सना नेहमीच तांत्रिक अडचण येते, तर ई-कॉमर्स साइटस मात्र सुरळीत चालतात. त्यामुळे संकेतस्थळाच्या मजबुतीकरणाला प्राधान्य देण्याची गरज आहे.

### पती-वडील नसलेल्यांचे काय?

ई-केवायसी करताना केवळ तांत्रिक अडचणीच नाही तर इतरही अनेक समस्या लाडक्या बहिणींसाठी डोकेदुखी ठरत आहेत. ज्यांचे वडील किंवा पती नाहीत अशा महिलांनी काय करावे? महिलांमध्ये संभ्रमावस्था दिसून येत आहे.

### महिलांना दिवसभर थांबावे लागतेय

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या महिला लाभार्थ्यांची ई-केवायसी करताना तांत्रिक अडचणी येत आहेत. अनेक दिवसांपासून सर्वर बंद आहे. शिवाय ओटीपी येताना अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे दिवसभर महिला थांबावे लागकत आहे. **- राम गोसावी, केंद्रचालक, महा ई सेवा केंद्र, मंद्रूप.**

# पत्नीच्या क्रूरतेमुळे पतीने केलेला घटस्फोटाचा दावा कोर्टाने फेटाळला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १२ ऑक्टोबर -**

पतीने एका महिलेच्या विरुद्ध दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर कोर्टामध्ये घटस्फोट मिळण्यासाठी दावा दाखल केला होता. पतीने पत्नीच्या विरुद्ध स्वतःहून त्याग करणे, घर सोडून निघून जाणे व मानसिक त्रास करणे असे आरोप केले होते. पत्नी न सांगता माहेरी जाते, मुलांकडे लक्ष देत नाही, मुलांच्या शिक्षणामध्ये बाधा निर्माण करते, पती किंवा इतर घरातील सदस्य आजारी असतील तर त्यांना बघायला येत नाही हे व इतर आरोप करुन घटस्फोटाची मागणी केली होती.

पत्नीने पतीचे सर्व आरोप फेटाळून लावले होते. पतीला मानसिक त्रास दिला नाहीच परंतु पतीने मात्र दुसरा विवाह करण्यासाठी पत्नीचा अतोनात छळ केला. पत्नीच्या माहेरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने तिने सर्व जाच-हाट सहन करुन पतीचा संसार केला. दोन मुलांना जन्म घातला आणि आता वृद्धापकाळकडे जात असताना शिक्षक पतीला मात्र पत्नीचा कंटाळा आला असल्याने दुसरा विवाह करण्यासाठी घटस्फोट हवा आहे अशा प्रकारचे आरोप पत्नीने केले होते. पतीच्यावतीने स्वतः पती, पतीचे वडील, पंधरा वर्षाचा मुलगा, अठरा वर्षाची मुलगी यांची साक्ष घेण्यात आली. पत्नीच्यावतीने फक्त पत्नीचा जबाब नोंदवण्यात आला. पत्नीच्यावतीने ॲड. शिवाजी क्षीरसागर, बार्शी यांनी युक्तिवाद करुन पत्नीने नव्हे तर पतीनेच मानसिक छळ केला आहे, असा युक्तीवाद केला. वकिलांचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने पतीचा घटस्फोटाचा अर्ज फेटाळून लावला. पत्नीतर्फे ॲड. शिवाजी क्षीरसागर बार्शी यांनी काम पाहिले. त्यांना पवन क्षीरसागर व अक्षय बिडबाग वकील यांनी सहकार्य केले.

## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात माता-पालक मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १२ ऑक्टोबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे राष्ट्रीय बालिका दिनाचे औचित्य साधून माता पालक मेळावा व महिला तक्रार निवारण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मी वहीनी यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करुन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक बागल होते. यावेळी पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर विलास जाधव यांनी किशोरवयीन मुलींना पोषण आहार व आरोग्य विषयक समस्या याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या अजित पवार गटाच्या शहराध्यक्ष पुनम भैस, विद्यालयाच्या माजी शिक्षिका सातपुते, पर्यवेक्षक किरगत, शेवाळे उपस्थित होते.



## मेहता शाळेत इको फ्रेंडली दिवाळी कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

कै. वि. मो. मेहता शाळेमध्ये इको फ्रेंडली दिवाळी हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून इको फ्रेंडली क्लबचे अध्यक्ष परशुराम कोकणे व डॉ. मधुरा बुरटे उपस्थित होते

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने तसेच प्रतिमा पूजनाने झाली. डॉ. बुरटे यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टिकचा वापर करू नका, कापडी पिशव्यांचा वापर करा, वाढदिवसाला फुग्यांची सजावट करू नका, जेवढं आवश्यक आहे तेवढेच खरेदी करा, नैसर्गिक पद्धतीने बनवलेले अन्नपदार्थांचे सेवन करा असे मार्गदर्शन केले.


प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी केले. वैशाली दुनगे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## पटसंख्या वाढीसाठी भर देणार; मंगरूळ शालेय समितीचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

मंगरूळ (ता. अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेत व्यवस्थापन समितीच्या बैठकीत शाळेतील इमारतीची देखभाल, विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य, डिजिटल शिक्षणसुविधा, स्वच्छता अभियान, परिसर सुशोभीकरण, तसेच विद्यार्थ्यांच्या हजेरीत वाढ करण्याचे निर्णय घेण्यात आले.

या बैठकीस मुख्याध्यापक, शिक्षक, पालक प्रतिनिधी, शिक्षणप्रेमी ग्रामस्थ तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. अध्यक्षपदी उपसरपंच मलिक मुजावर होते. मुख्याध्यापिका रुखसाना सय्यद यांनी आढावा सादर केला. अध्यक्ष मुजावर, उपाध्यक्ष रेश्मा घाटे यांची निवड करण्यात आली. प्रमुख



पाहुणे म्हणून केंद्र प्रमुख महादेव पाटील, अकबर मुजावर, रुकमोद्दिन मुजावर, पैगंबर मुजावर, जैनोद्दिन मंद्रूप, दाऊद मुतवल्ली, हुजुर मुजावर, अश्फाक मुजावर, रेहाना मुजावर, आमिर शेख, समीना दाऊद, वसीम घाटे, जलाल मुजावर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका रुकसाना सय्यद, सहशिक्षिका निलोफर बल्लारी, सहशिक्षिका महेर अफरोज कोटी यांनी परिश्रम घेतले.

## शेतकऱ्यांसाठी कॅशबॅक जिंकण्याची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

भारतातील आघाडीच्या विविध कृषी व्यवसायांपैकी एक गोदरेज ॲग्रोव्हेट लि.ने अलीकडेच 'माय ग्रेशिया, माय प्राइड' या देशव्यापी मोहिमेचा शुभारंभ केला. यात शेतीची समृद्धी वाढविण्यासाठी आरोग्यदायी बियाण्यांचे महत्त्व अधोरेखित केले गेले आहे.या मोहिमेचा एक भाग म्हणून तसेच शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि उत्पादनाच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांना शिक्षित करण्यासाठी कंपनीने 'स्पिन अँड विन' स्पर्धा देखील सुरू केली आहे. ही स्पर्धा मार्च २०२६ पर्यंत चालेल आणि ती इंग्रजी, हिंदी, मराठी, तेलुगू, कन्नड, गुजराती, पंजाबी, ओड़िया, बंगाली आणि तमिळ अशा १० भाषांमध्ये उपलब्ध आहे. यावेळी रजवेलू एन.के.म्हणाले,बाजारात उपलब्ध असलेल्या पारंपरिक उपायांसह ग्रेशिया हा एक किफायतशीर आणि प्रभावी उपाय आहे.शेतकऱ्यांना या ग्रेशिया पॅकमधील क्यूआर कोड स्कॅन करून उत्पादनाचा प्रामाणिकपणा तपासण्याची संधी देतो.याद्वारे कॅशबॅक जिंकण्याची शेतकऱ्यांना संधी मिळते.जेणेकरून ते २०० रुपयांपर्यंत कॅशबॅक जिंकता येईल.

# माळशिरस भाजपाचे नेतृत्व राम सातपुतेंकडेच

### पालकमंत्री जयकुमार गोरे; अकलूज येथे पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १२ ऑक्टोबर-**

माळशिरस तालुक्यात भाजपाचे नेतृत्व हे माजी आमदार राम सातपुते यांच्याकडेच असेल. आगामी काळात भाजपासाठी प्रामाणिक काम करणाऱ्या कर्तुत्ववानांकडेच माळशिरस तालुक्यातील भाजपाचे नेतृत्व असेल, असे राज्याचे ग्रामविकास, पर्यटन तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी बोलताना सांगितले.

ते अकलूज येथे अकलूजचे भाजपा मंडळ अध्यक्ष सुजयसिंह माने-पाटील यांच्या निवासस्थानी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधताना बोलत होते यावेळी विचारपीठावर माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते, सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष फत्तेसिंह माने पाटील, शशिकांत उर्फ बाळासाहेब माने पाटील,



हिंदुराव माने पाटील माळशिरस चे माजी नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख,संजय देशमुख,महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी ,माने पाटील, माने देशमुख परिवार उपस्थित होते. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, आगामी काळ हा निवडणुकांचा काळ असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद, स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वच निवडणुकांमध्ये सर्वसामान्यांसाठी काम करणाऱ्या भाजपाला अग्रभागी ठेवण्याचे आवाहन केले. यावेळी हिंदुराव माने-पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सुजयसिंह माने-पाटील यांनी करून स्वागत केले सूत्रसंचालन संतोष साठे तर आभार अमरसिंह माने-देशमुख यांनी मानले

> माने पाटील परिवाराने गत लोकसभा व विधानसभा निवडणुकीत भाजपासाठी अहोरात्र काम केले असून माळशिरस तालुक्यात माने-पाटील परिवाराकडे श्रद्धेने व निष्ठेने पाहिले जाते आपली श्रद्धा व निष्ठा व प्रामाणिकपणा अशी ओळख असणारा माने-पाटील परिवार हा भाजपाच्या स्मरणात कायमच असेल यामुळे माने पाटील परिवारासोबत राज्याचे मुख्यमंत्री, पालकमंत्री व स्वतः राम सातपुते असतील. **- राम सातपुते, माजी आमदार**

## महत्वाचे...



## उडान फाउंडेशनकडून अतिवृष्टी आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबास ३१ हजारांची मदत

**बार्शी, दि. १२ ऑक्टोबर-**

उडान फाउंडेशनच्या वतीने मोहम्मद पैगंबर कर्तव्य निधी अंतर्गत अतिवृष्टीमुळे पुरात वाहून गेलेल्या आणि आत्महत्या केलेल्या कुटुंबास रोख स्वरुपात रुपये ३१ हजार आर्थिक मदत प्रदान करण्यात आली. याप्रसंगी उडान फाउंडेशनचे अध्यक्ष इरफान शेख, उपाध्यक्ष जाफर शेख, सचिव जमील खान, सल्लागार युन्नूस शेख, कार्याध्यक्ष शकील मुलानी तसेच जाणीव फाउंडेशनचे अध्यक्ष तुळशीदास मस्के, साजन शेख, गणेश गोडसे, ॲड. रियाज शेख, वसीम पठाण, मोहसीन पठाण, सादिक काझी, शोहेब काझी, शहाबाज मुलानी, पांगरीचे माजी सरपंच विलास लांडे, वैरागचे नगरसेवक वैजीनाथ आदमाने, रियाज बागवान, वसीम मुलाणी, शोहेब सय्यद, रॉनी सय्यद उपस्थित होते.



## सुस्ते येथील प्रशालेत बायोमेट्रिक डिजिटल फेस मशीनचे उद्घाटन

**सुस्ते, दि. १२ ऑक्टोबर-**

सुस्ते येथील श्री दत्त विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बायोमेट्रिक डिजीटल फेस मशीनचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदन क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन उपस्थिती व अनुपस्थितीसाठी बायोमेट्रिक डिजिटल फेस रिडींग मशीन हे प्रशालेत बसवल्याचे जिल्ह्यातील पहिलेच उदाहरण असल्याचे संस्थेचे संचालक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक दिलीप घाडगे यांनी सांगितले. आधुनिक मशीन बसवल्याने विद्यार्थी प्रशालेत कोणत्या वेळी आला व प्रशालेतून कोणत्यावेळी बाहेर पडला याबद्दलची माहिती व्हाट्सॲप मेसेजद्वारे पालकांना कळत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावेल, असे प्रतिपादन संस्थेचे जेष्ठ संचालक अनिरुद्ध सालविठ्ठल यांनी केले. यावेळी प्रशालेचे प्राचार्य अविनाश कटकधोंड यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पर्यवेक्षक सुरेश कट्टे, ज्येष्ठ लिपिक राजकुमार ढगे, श्रीकांत चंदनशिवे, नागनाथ मैंदर्गी,अमोल हुंगे, राजाराम घोडके उपस्थित होते.



## केंद्रीय मंत्री मोहोळ यांच्या हस्ते प्रमोद अवताडे यांना महाराष्ट्ररत्न पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत लोकशाही या संस्थेकडून दिला जाणारा प्रतिष्ठित महाराष्ट्र रत्न पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष प्रमोद आवताडे यांना पुण्यातील कार्यक्रमात देण्यात आला. सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. लोकशाही संस्थेकडून दरवर्षी समाजाच्या विविध स्तरांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'महाराष्ट्र रत्न' पुरस्काराने सन्मानित केले जाते. प्रा. प्रमोद आवताडे यांनी शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या अथक प्रयत्नांची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.



## उपळेदुमाला येथील शितल उलभगत यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान

**बार्शी, दि.१२ ऑक्टोबर-**

येथील शोभाताई सोपल प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था यांच्याकडून मान्यवरांच्या हस्ते उपक्रमशील शिक्षिका शितल उलभगत यांना आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले. शितल उलभगत या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उपळे दुमाला मुली या शाळेत उपशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांचा गुणवत्तापूर्ण विकास करण्यासाठी त्या सातत्याने नवनवीन उपक्रम राबवत असतात. शितल उलभगत यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उपळे दुमाला शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले.



## विश्व हिंदू परिषद बजरंग दलातर्फे पूरग्रस्त गावांना चारा वाटप

**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्ह्यातील पूर परिस्थितीचा आढावा घेऊन जिल्ह्यातील प्रामुख्याने दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर या दोन तालुक्यातील अतिसंवेदनशील गावांना चारा वाटप (मुरघास) करण्याचे नियोजन विश्व हिंदू परिषद बजरंग दल यांनी केले आहे. त्यापैकी मदतीचा पहिला टप्पा म्हणून शहर उत्तर मधील पाकणी या गावात अडीच टन चारा (मुरघास) सुमारे (२५०० किलो )गावचे पोलीस पाटील तुकाराम पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. लवकरच उर्वरित शहर उत्तर मधील आणखीन दहा गावांना आणि दक्षिण मधील तेरा गावांना प्रति दोन टन चारा याप्रमाणे वाटप करण्याचे नियोजन करणार असल्याचे विश्व हिंदू परिषद बजरंग दलाचे अभय कुलथे यांनी सांगितले.



## सीना-दारफळ येथील पूरग्रस्त मुलांना शालेय साहित्याचे मोफत वाटप

**पिलीव, दि. १२ ऑक्टोबर-**

महाराष्ट्रा मध्ये पुराच्या पाण्याने शेती पिकांचे अचानक पाणी घरात शिरल्याने अन्न धान्याचे तसेच मुलांच्या शालेय साहित्याचे आतोनात नुकसान झाले ही बाब लक्षात घेऊन मगराचे निमगाव तालुका माळशिरस येथील ग्रामस्थांनी सामाजिक बांधलकी जोपासत सीना दारफळ व सुलतानपूर राहुलनगर (ता. माढा) येथे जाऊन जि प शाळेतील २०० विद्यार्थ्यांना दर्जेदार स्कुल बॅग, वह्या, शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.यामुळे शालेय साहित्य पाहुन मुले भारावून गेली. यावेळी माजी मुख्याध्यापक संभाजीराव मगर सामाजिक कार्यकर्ते महादेव मगर, भारत मगर, प्रकाश पवार, लक्ष्मण पवार, रामभाऊ मगर, मोहन मगर, सुरेश कुंभार, कालिदास मगर, नवनाथ पराडे यांच्या उपस्थितीत विद्यार्थयांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात सीना दारफळ येथील जि.प. शाळेतील शिक्षक पालक उपस्थित होते.

## प्रा. सिद्धाराम धनशेट्टी यांना पीएच. डी.

**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**



येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयातील प्रा. सिद्धाराम धनशेट्टी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची इंग्रजी विषयातून पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी ऑन एक्सप्लोरेशन ऑफ फेमिनाइन कॉन्शयसनेस इन द सिलेक्ट नॉवेल्स ऑफ अनिता नायर या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. त्यांना दयानंद महाविद्यालय सोलापूर येथील प्रा. डॉ. तानाजी कोळेकर यांनी मार्गदर्शन केले. प्रा. धनशेट्टी यांनी पीएच.डी. पदवी मिळवल्याबद्दल सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे पदाधिकारी व संचालक नागेश बिराजदार, प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप यांनी अभिनंदन केले आहे.

## साप चावल्याने जिल्ह्यात विविध ठिकाणी पाच जण उपचारासाठी दाखल

**सोलापूर, दि.१२ ऑक्टोबर-**

जिल्ह्यात विविध ठिकाणी साप चावल्याने पाच जण उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल झाले.सुनिता शंकर पवार (वय ५५, रा. ढिगेवाडी, ता. अक्कलकोट) या रविवारी सकाळी ढिगेवाडी येथील शेतात लाकडे काढत असताना त्यांच्या उजव्या हाताच्या बोटाला साप चावल्याने त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. देवप्पा हरि मोरे (वय ४०, रा. ब्रम्हपुरी, ता. मंगळवेढा) हे रविवारी सकाळी साडेदहाच्या सुमारस ब्रम्हपुरी येथील स्वतःच्या हॉटेलमधील टेबलचा ड्रॉव्हर उघडत असताना उजव्या हातास साप चावल्याने त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. रिजवाना अजिज सय्यद (वय ४५, रा. टाकळी सिकंदर, ता. मोहोळ) या शनिवारी रात्री घरी झोपल्या असताना रविवारी पहाटे तीनच्या सुमारास त्यांच्या उजव्या पायास साप चावल्याने त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. कार्तिक म्हाळाप्पा सलगर (वय २२. रा. वटवटे, ता. मोहोळ) हा रविवारी सकाळी ९ च्या सुमारास घराच्या अंगणात खेळत असताना त्याच्या उजव्या पायास साप चावल्याने त्यास उपचारासाठी दाखल करण्यात आले. श्रीकृष्ण दत्तात्रय मेठकरी (वय ११, रा. पाटकळ, ता. मंगळवेढा) हा रविवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास राहत्या घरी झोपला असताना उजव्या हातास काहीतरी चावल्याने त्यास उपचारासाठी दाखल करण्यात आले. या सर्व घटनांची नोंद सिव्हील पोलिस चौकीत करण्यात आली आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : कोल्हापूरचे माजी महापौर सागर चव्हाण कोल्हापुरातील सर्व क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तिमत्व सचिन चव्हाण, मल्हार चव्हाण, दीपेश भोसले यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांचा सत्कार करताना विश्वकर्मा बिल्डरचे सर्वेसर्वा मधुकर सुरवसे यांचे बंधू सुधाकर सुरवसे, अन्नछत्राचे विश्वस्त व पालखी परिक्रमा संयोजक संतोष भोसले, शिवराज स्वामी, प्रशांत साठे, संतोष माने, रमेश हल्संगी.



## महत्त्वाचे



### राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कारने डॉ. विद्याराणी क्षीरसागर सन्मानित

**सांगोला, दि. १२ ऑक्टोबर-**

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील उपप्राचार्या डॉ.विद्याराणी क्षीरसागर यांना स्त्री प्रतिष्ठा राज्यस्तरीय शिक्षणरत्न पुरस्कार सांगली येथे ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्रा.राजहंस डुणे, प्रा. तानाजी जाधव उपस्थित होते. शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन प्रतिष्ठा फौंडेशन यांच्या वतीने डॉ. विद्याराणी क्षीरसागर यांना शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, प्राचार्य तानाजी बुरूंगले, प्राचार्य डॉ. संजय बैस, प्राचार्य सिकंदर पाटील यांनी डॉ. क्षीरसागर यांचे अभिनंदन केले.



### संभाजीनगर येथील सोनवणे परिवाराकडून श्री विठ्ठल-रुक्मिणीस सोने तुळशी माळ अर्पण

**पंढरपूर, दि. १२ ऑक्टोबर-**

संभाजीनगर येथील भाविक सौ. कहूबाई पांडुरंग सोनवणे यांनी श्री विठ्ठल चरणी स्नेहपूर्वक मौल्यवान सुवर्ण अर्पण केले आहे. सोनवणे परिवाराने सोने तुळशी माळ अर्पण केली असून तिचे वजन १०.००० मिली ग्रॅम इतके असून किंमत रु. १,१४,०००/- इतकी आहे. तसेच सोने तुळशी हार अर्पण केला असून त्याचे वजन १३.०३० मिली ग्रॅम इतके असून किंमत रु. १,४४,०००/- इतकी झाली आहे. या भाविकांचा सत्कार विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य हभ प ज्ञानेश्वर जळगावकर महाराज तसेच शकुंतला नडगिरी यांच्या हस्ते करण्यात आला.



### तांबवे येथे आज श्री स्वामी समर्थ मूर्ती प्राणप्रतिष्ठा महायज्ञ

**अकलूज, दि.१२ ऑक्टोबर-**

माळशिरस तालुक्यातील पायरीचा पूल तांबवे येथे एकमुखी श्री दत्त मंदिर समितीच्या वतीने सोमवार दि.१३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.४५ वाजताच्या अमृतलाभ मुहूर्तावर श्री स्वामी समर्थ महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, महायज्ञ होणार आहे. यावेळी मयूरपंत कुलकर्णी यांच्या किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी सर्वांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमामुळे उत्साहाचे वातावरण आहे.

### माझ्या वाढदिवसानिमित्त अतिवृष्टीतील नुकसानग्रस्तांना मदत करा : शहाजीबापू

**सांगोला, दि. १२ ऑक्टोबर-**

माझ्यावर प्रेम करणारे नेते मंडळी, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मित्रपरिवार यांनी माझ्या वाढदिवसानिमित्त कोणतेही बॅनर लावू नयेत व हार-तुरे, सत्कार साहित्य आणू नये. वाढदिवसासाठी होणारा खर्च हा तालुक्यातील व जिल्ह्यातील नुकसानग्रस्तांना सढळ हाताने मदत म्हणून देण्याचे आवाहन सांगोल्याचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी केले आहे. सोलापूर जिल्ह्यासह राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकरी व नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. याचा विचार करून वाढदिवसावर खर्च करण्यापेक्षा नुकसानग्रस्तांना मदत करण्याच्या उद्देशाने शहाजीबापू पाटील यांनी दि. १४ ऑक्टोबर रोजी आपला वाढदिवस साजरा न करण्याचे जाहीर केले आहे. लोकांनी आपत्तीग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन शहाजीबापूंनी केले आहे.

# निकृष्ट रस्त्यांमुळे पंढरपुरात धुळीचे लोट

## प्रशासनातील अधिकारी आणि ठेकेदाराच्या निकृष्ट कामाचा परिणाम





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ ऑक्टोंबर -**

पंढरपूर शहरातील खड्यांच्या समस्येबाबत दै. सोलापूर तरुण भारत ने या अगोदरच खड्डेच खड्डे चहुकडे रस्ता शोधायचा कुणीकडे या मथळख्याली बातमी प्रसिध्द केली होती. त्यानंतर प्रशासनाने खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले आहे. मात्र प्रशासन आणि ठेकेदाराच्या कृपेने शहरातील नागरिकांना एकाच रस्त्यावर येतो आहे चक्क सिमेंट, डांबरी तसेच मातीच्या रस्त्यांचा अनुभव.

यावर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शहरात खड्डे नसलेला एकही रस्ता दिसत नव्हता. यावर्षी पावसाचे आयते कोलित प्रशासन आणि ठेकेदारांना मिळाले. नाहीतर दरवर्षी पावसाळ्यात पाऊस पडो किंवा न पडो शहरातील रस्त्यांवर खड्ड्यांची बाहुगर्दी दिसत असतेच. मात्र तरी देखील या वर्षी प्रशासनाकडून आषाढी यात्रेअगोदर शहरातील रस्त्यांची मलमपट्टी केली गेली. त्यानंतर पुन्हा गणपती विसर्जन मिरवणूकीमध्ये अडथळा होवू नये यासाठी पुन्हा एकदा त्याच ( पूर्वी केलेले काम किती दर्जाचे असेल ) रस्त्यांवरील खड्डे भरले गेले. त्यानंतर पुन्हा एकदा शहरातील प्रत्येक रस्त्यांवर खड्डेच खड्डे दिसू लागले. त्यामुळे सोलापूर तरुण भारत मधून खड्यांबद्दलची समस्या जहाल रित्या मांडली गेली. दरम्यान प्रशासनातील अधिकारी आणि ठेकेदारांच्या अर्थपुर्ण मैत्रीमुळे रस्त्यांची कामे सुमार दर्जाची होत आहेत. त्यामुळेच एकाच रस्त्यांची कामे वारंवार केली जातात. प्रशासनाकडून सध्या पुन्हा एकदा खड्डे भरण्याची मोहिम हाती घेतली गेली आहे.

मात्र या वेळेस प्रशासन आणि ठेकेदाराच्या कृपेमुळे पंढरपूरकर नागरिकांना एकाच रस्त्यावरुन ये-जा करीत असताना रस्त्याच्या काही भागात सिमेंट तर काही भागात डांबरी आणि त्या शेजारीच चक्क मातीच्या रस्त्यावरुन चालण्याचा आनंद (नागरिकांच्या दृष्टीने डोकेदुखी) अनुभवण्यास येत आहे. कारण खड्डे भरताना डांबरी रस्ता जेसीबीने उकरलेल्या भागात सिमेंट क्रॉंक्रीट (नावालाच सिमेंट) भरले जात आहे.

याबरोबरच त्याच रस्त्यावर कडेला खड्डे असल्यामुळे मातीचा रस्ता शिल्लक राहिलेला दिसत आहे. त्यामुळे मुळ रस्ता डांबरी, त्यामध्ये सिमेंट भरल्यामुळे क्रॉंक्रीटचा तसेच शेजारीच खड्यांमुळे मातीच्या रस्त्याचा असा थ्रीडी रस्त्याचा अनुभव एकाच रस्त्यावर अनुभवयास मिळत आहे.

शहरातील मुख्य स्टेशन रस्त्यावर भाई राऊळ पुतळ्यापासून ते आंबेडकर पुतळा आणि सावरकर पुतळा चौक या भागात एक,दोन दिवसांपूर्वी खड्डे भरण्याचे काम केले गेले आहे. त्या भागात तर अक्षरश: बारीक, मोठी खडी देखील रस्त्यावर तशीच विखुरलेली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना सणासुदीच्या खरेदीसाठी वाहनांवरुन जाताना अगदी कसरत करीत जीवमुठीत घेऊन धुळीचा त्रास सहन करीत ये-जा करावी लागत आहे.

### छत्रपती शिवाजी महाराज चौकाची स्थिती अत्यंत बिकट

शहरातील सर्वात मध्यवर्ती असलेला छत्रपती शिवाजी महाराज चौकाची तर अवस्था उघड्या डोळ्यांनी पहावत नाही अशी झालेली आहे. कारण महाराजांच्या पुतळ्या भोवती चक्क खड्यांचे साम्राज दिसून येत आहे. या भागातून नागरिकांना विशेषत: लहानमुले, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांना चालणे देखील मुश्किल झाले आहे. शहरातील महाराजांचा पुतळा असलेल्या प्रमुख चौकाची ही अवस्था असेल तर बाकीच्या रस्त्यांबाबत न बोललेलच बरे अशी प्रतिक्रिया शहरातील नागरिकांकडून आपसुकच बाहेर पडत आहे.

### सर्वत्र धुळीचे साम्राज्य

शहरातील रस्त्यांवर खड्डे पडल्यामुळे प्रशासनाच्या वतीने खड्डे बुजविण्याचे काम सुरु आहे. मात्र खड्डे दर्जेदार पध्दतीने बुजविले जात नाहीत. या मध्ये खडी,सिमेंट टाकले जात आहे. मात्र त्याचा दर्जा काय आहे हे संबंधित प्रशानातील आधिकाऱ्यांकडून पाहिले जात नाही. त्यामुळे ठेकेदाराचे उखळ पांढरे होत आहे. मात्र प्रशासन आणि ठेकेदाराच्या कृपेमुळे शहरातील प्रत्येक रस्त्यांवर धुळीचे साम्राज्य पसरले आहे.

शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था झालेली आहे. प्रशासनाकडून खड्डे बुजविण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. मात्र त्या कामाला कोणताही दर्जा दिसत नाही. सगळीकडे धुळीचे साम्राज्य आहे. नागरिकांना जीव मुठीत घेऊन रस्त्यावर ये-जा करावी लागत आहे तर दुसरीकडे मात्र प्रशासनातील अधिकारी व ठेकेदारांचे मात्र चांगभले होताना दिसत आहे.

# उंदरगाव येथील १५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



## प्रा. डॉ.राजेंद्र तांबिले यांच्यातर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १२ ऑक्टोंबर-**

माढा तालुक्यातील सीना नदीकाठच्या उंदरगाव येथे अतिवृष्टी व महापुरामुळे मोठ्या प्रमाणात शेती, जनावरे, शेतमाल व घरांसह अनेक गोष्टींचे नुकसान झाले आहे. या नुकसानीत विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य देखील वाचले नाही. त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत अडथळा होऊ नये म्हणून सध्या सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज कॉलेज येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले प्रा.डॉ राजेंद्र तांबिले यांनी उंदरगाव या आपल्या मूळ गावी सामाजिक बांधिलकी जोपासत पुरग्रस्त १५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. महापुरामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले, शाळेची पुस्तके व साहित्य वाहून गेले तरीही शिक्षणाची आस मात्र कायम राहिली. हीच विद्यार्थ्यांची तळमळ ओळखून प्रा.डॉ तांबिले यांनी न्यू इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज, जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, येथे १५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट वाटप केले. या किटमध्ये सॅक, लेखन पॅड, कंपास पेटी, वह्या यांचा समावेश होता.

साहित्य वाटप करताना तांबिले यांनी सांगितले की कोणत्याही आपत्तीत शिक्षण हे मागे राहू नये, ही माझी भूमिका आहे. मी या मातीत वाढलो, याच शाळेत शिकलो. आज या शाळेतील विद्यार्थ्यांना मदत देताना मला आत्मिक समाधान मिळाले. ही मदत नसून माझ्या शाळेचे ऋण फेडण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे. या उपक्रमात उंदरगावचे रामेश्वर मस्के, प्रतिमा साळुंखे यांनीही आर्थिक योगदान दिले असल्याचे सांगितले. यावेळी प्राचार्य विजय साठे, विकास साठे, भालचंद्र करळे, दिपाली महामुनी, जि. प. आदर्श प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक धोंडीराम कांबळे, सोमनाथ शिंदे, संतोष महामुनी, मेघा महामुनी, अमोल तांबिले, बप्पा तांबिले, ऋषिकेश तांबिले, बालाजी आरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय चव्हाण यांनी केले.



## कुरुनूरमध्ये तब्बल २१ वर्षांनी एकत्र आले माजी विद्यार्थी

**अक्कलकोट, दि.१२ ऑक्टोबर-**

कुरनूर येथील नागनाथ प्रशालेच्या २००३-०४ या वर्षातील माजी विध्यार्थीनी २१ वर्षांनी जुन्या आठवणींना शालेय जीवनातील मैत्री, प्रेम, जिव्हाळाना उजाळा देत स्नेहमेळावा उत्साहात साजरा केला.

मुख्याध्यापक हैबतराव सुरवसे यांच्या हस्ते आपरेशन सिंधूरमध्ये शाळेतील तीन विध्यार्थी मेजर सलीम शेख, प्रवीण वाघमारे, समीर कुरणे यांनी आपल्या सेवेत उत्कृष्टपणे कामगिरी केल्यामुळे त्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी सुलोचना सुरवसे, महादेव माने, हरिदास जाजनुरे, शरणप्पा ढोनसाले, सुरेश माने, परशुराम बेडगे, मदार शेख, स्वामीराव सुरवसे आदींची उपस्थिती होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित काळे यांनी केले. बाबाजान मुल्ला यांनी आभार मानले. या वेळी राहुल काळे, रियाज सय्यद, राम बिराजदार, वैभव कुलकर्णी, गणेश बारसकर, सचिन सपकाळ, संतोष काळे, नितीन सूर्यवंशी,विष्णू जाधव, राम सुरवसे, सचिन काळे, ब्रमानंद डावारे, रवी सुरवसे,लक्ष्मण शिंदे, सिद्धप्पा कुंभार, संतोष कांबळे,फारुख तांबोळी, जितेंद्र शिंदे, युन्नूस शेख, सतीश सुरवसे, एकनाथ शिंदे आल्लावदीन शेख, मैना जाधव आदी उपस्थित होते.

## पदवीधर मतदार नोंदणी प्रक्रियेमध्ये पदवीधरांनी नोंदणी करावी : ॲड. भाकरे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ ऑक्टोबर-**



पुणे विभाग पदवीधर मतदार संघासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून जास्तीत जास्त पदवीधरांनी या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन मतदार नोंदणी करावी असे आवाहन माजी नगरसेवक ॲड. गजानन भाकरे यांनी केले आहे.

पुणे विभाग पदवीधर निवडणुक येत्या काही काळामध्ये संपन्न होणार आहे. या निवडणुकीमध्ये योग्य व सक्षम प्रतिनीधी निवडून देणेसाठी मतदार यादीमध्ये नाव नोंदविणे गरजेचे आहे. या नोंदणी प्रक्रियेस सुरुवात झाली असून पात्र पदवीधरांनी स्वतःची व आपल्या कुटुंबातील सर्व पात्र पदवीधरांची नोंदणी करावी व लोकशाहीच्या या उत्सवा मध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

# पोलीसांचे जिल्ह्यात ‘हरित वारी’द्वारे दोन लाख वृक्षांचे रोपण

## सुमारे आठ हजार ठिकाणांवर केली लागवड; राज्यात अव्वल

### सोलापूर ग्रामीण पोलिसांचा हरित वारी उपक्रम

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. १२ ऑक्टोबर-**





पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतील 'हरित वारी' उपक्रम ंतर्गत सोलापूर ग्रामीण पोलिसांच्यावतीने जिल्ह्यात ८ हजार ३०० ठिकाणांवर १ लाख ९६ हजार वृक्षारोपण करून वृक्षारोपणाबाबत राज्यात नंबर एकवर राहण्याचा विक्रम केला आहे.

पंढरपूरच्या आषाढी वारीच्या अगोदरपासूनच पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात हरित वारीचा उपक्रम सुरु केला होता. ज्याचा उद्देश पर्यावरण संवर्धन आणि आषाढी वारीदरम्यान वृक्षारोपण करणे हा होता. या उपक्रमांतर्गत त्यांनी 'हरित वारी' नावाचे एक मोबाइल ॲपदेखील विकसित केले आहे, जे वृक्षारोपणाच्या कामात पारदर्शकता आणण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करते. या ॲपचचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५ जुलै २०२५ रोजी पंढरपूर येथे आषाढी वारीच्या निमित्ताने लॉंचींग करण्यात आले होते. पर्यावरण संवर्धनासाठी आषाढी वारीच्या मार्गावर वृक्षारोपण करणे आणि त्यांच्या संगोपनाची जबाबदारी पोलिसांवर असणे हे हरित वारीचा मुख्य उद्देश होता. वृक्षारोपण अभियानामध्ये पारदर्शकता, शोधक्षमता आणि विश्वासार्हता आणण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर गेला आहे. 'हरित वारी' ॲपद्वारे वृक्षारोपणाच्या कामाचे व्यवस्थापन केले गेले आणि लोकांना या उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले गेले. हा उपक्रम पोलीस आणि स्थानिक नागरिक यांच्यात पर्यावरण संवर्धनासाठी सहकार्याची भावना वाढवण्यास मदत झाली. यातून समुदाय पोलीसिंग चांगले झाले. यातून ग्रामीण जिल्ह्यातील नागरीकांनी या हरित वारी उपक्रमात भरघोस सहभाग नोंदवित मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले. त्यामुळे सोलापूर ग्रामीण पोलिसांकडून ठेवण्यात आलेले १ लाख ५० हजार वृक्षरोपनाचे उद्दीष्ठ पार करून १ लाख ९६ हजार १११ वृक्षारोपन करण्यात आले.

**सोलापूर ग्रामीण पोलिसांकडून करण्यात आलेले वृक्षारोपण (तालुकानिहाय) :**

| तालुका | ठिकाणे | झालेले वृक्षारोपण |
|---|---|---|
| अक्कलकोट | ४३९ | १२,९९२ |
| बार्शी | १,८९९ | २५,४३६ |
| करमाळा | ८६ | १२,६९७ |
| माढा | ९७५ | १,२२४ |
| माळशिरस | ३०७ | १७,२५२ |
| मंगळवेढा | २२० | १०,२११ |
| मोहोळ | १३७ | ९,११६ |
| पंढरपूर | १,७९४ | २६,१८७ |
| सांगोला | ३६६ | २२,०८८ |
| सोलापूर उत्तर | १,४८९ | ५२,५१२ |
| सोलापूर दक्षिण | ५९५ | ६,३९६ |
| **एकूण** | **८,३०७** | **१,९६,१११** |